मराठी साहित्यातला अढळ तारा : नामदेव ढसाळ । योद्धा साहित्यिक : अण्णा भाऊ साठे
तळपती तलवार... : नारायण सुर्वे । साहित्यातील अंगार : अमर शेख
सुरेश भट : रंग ह्यांचा वेगळा... । बा. सी. मर्ढेकर : नवकवितेचे जनक
ज्ञानपीठ विजेते : विंदा करंदीकर । साहित्यातील पारिजात : मंगेश पाडगावकर
वि. वा. शिरवाडकर - कुसुमाग्रज : मराठी-भाषा-वैभव । विदुषी : दुर्गा भागवत
ग्रेस : गूढ इथले संपत नाही... । नवकथा प्रणेते : गंगाधर गाडगीळ
विजय तेंडुलकर : समाजवास्तवाचे भाष्यकार । एक दुःखार्त झाड : दया पवार
महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व : पु. ल. देशपांडे

## साहित्य-सरिता...

गेल्या ५०-६० वर्षांतील; विशेषकरून १९४० ते १९८०-९० पर्यंतच्या काळातील निवडक साहित्यिकांचा परिचय करून देणारी ही पुस्तकमालिका.

ह्या साहित्यिकांची ओळख करून देताना त्यावेळचा आपला मराठी समाज, १९४२ ची 'चले जाव' चळवळ, स्वातंत्र्यलढा, १९४७ चे भारताला मिळालेले स्वातंत्र्य, त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ, अशा ऐतिहासिक ठळक घटना आपल्यासमोर ओघाने येतात. तसेच मराठी साहित्यातील नवे प्रवाह; नवकविता, नवकथा, वैचारिक वाङ्मय, विनोदप्रधान साहित्य, वंचितांची अभिव्यक्ती असलेले साहित्य असे विविध प्रवाहदेखील आपल्याला ह्या पुस्तकांतून दिसतात.

परिचयात्मक अशी ही पुस्तके आहेत. त्यांच्या साहित्याची समीक्षा नाही किंवा केवळ त्या साहित्यिकांचे चरित्र नाही. त्यांच्या साहित्याचा हा परिचय आहे. तसेच ह्या लेखकांनी लिहिलेले साहित्यही संक्षिप्तपणे ओळख होण्यासाठी यामध्ये समाविष्ट केले आहे.

*आपल्या अस्तित्वाने, आपल्या कार्यकर्तृत्वाने, आपल्या साहित्याने **नामदेव ढसाळांनी** मराठी साहित्यात, मराठी जगात एक अढळ तारा 'ध्रुव' स्थान निर्माण केले आहे.*

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# मराठी साहित्यातला अढळ तारा
# नामदेव ढसाळ

माधव जोशी



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

**साहित्य-सरिता**
**महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय**

# मराठी साहित्यातला अढळ तारा
# नामदेव ढसाळ

**माधव जोशी**

सहलेखिका : रत्ना मगरे

साहित्य-सरिता

**महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ**

एन-०२७९—१

➢ **पुस्तकाचे नाव :** साहित्य-सरिता : महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय
मराठी साहित्यातला अढळ तारा : नामदेव ढसाळ

➢ **संपादक/लेखक :** माधव जोशी

➢ **प्रथमावृत्ती :** २०२६

➢ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-७६-६

➢ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड स्टेशनजवळ,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत :** रुपये ७२/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

नमस्कार,

प्रमुख पंधरा निवडक साहित्यिकांची ओळख पंधरा पुस्तकांद्वारे करण्यात आली आहे.

या पंधराही साहित्यिकांमुळे; कवी, कथाकार, कादंबरीकारांमुळे, त्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्य-सरितेच्या प्रवाहाला वेगळे वळण प्राप्त झाले आहे. ह्या अर्थाने ह्या पंधरा साहित्यिकांची निवड ही प्रातिनिधिक स्वरूपाची आहे तशीच ती महत्त्वाची ठरते.

ह्या पंधरा साहित्यिकांचा साहित्यिक काळ ढोबळ मानाने स्वातंत्र्यपूर्व काळापासून; १९४०च्या आसपास ते १९८५ पर्यंतचा हा ४०-५० वर्षांचा कालखंड आहे. ह्या काळामध्ये मराठी समाजाच्या विश्वात अनेक उलथापालथी झाल्या. आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थित्यंतरे वेगाने घडत गेली. ह्या सर्व बाह्यपरिस्थितीचे प्रतिबिंब ह्या पंधराही साहित्यिकांच्या साहित्यामध्ये आपल्याला आढळून येते. शाहीर अमर शेख आणि अण्णाभाऊ साठे यांनी त्यावेळच्या वंचित समाजाचे विशेषकरून कामगारवर्गाचे वास्तव व भेदक चित्रण केले. तसेच ह्या कामगारवर्गाच्या, मध्यमवर्गाच्या बदलत्या जाणिवा गंगाधर गाडगीळ व बा. सी. मर्ढेकर यांच्या कृतीतून आपल्याला आढळून येतील. १९६०साली महाराष्ट्र राज्याचा उदय झाला त्याच्या आसपासच्या काळामध्ये मराठी भाषेचा अभिमान बाळगावा याचा जयजयकार कुसुमाग्रजांच्या प्रेरणादायी कृतीतून आढळतो. ‘मराठीच्या दुधाची साय’ खाणारे सुरेश भट यांनी आपल्या काव्यातून मराठी भाषेचा अभिमान बाळगण्यास वाचकाला उद्युक्त केले. महाराष्ट्राचा वैचारिक वारसा आपल्याला दुर्गाबाईंच्या साहित्यातून आढळतो तसेच मराठी भाषेचे लालित्य व सौंदर्य मंगेश पाडगावकर यांच्या कृतीतून आपल्याला दिसते. कामगारवर्गाचे चित्रण डाव्या विचारांनी व्यक्त होणारे साहित्य

विंदा करंदीकरांच्या काव्यातून आढळते. तसेच पंचावन्न ते साठसत्तर या काळातील गिरणगावातील भयावह चित्रण नारायण सुर्वे करताना आढळतात. मराठी भाषेतून गूढता व्यक्त करताना कवी ग्रेस आपल्या काव्याने वेगळीच उंची गाठतात. याच काळातील शहरी मध्यमवर्गीय माणसाचे, मराठी कुटुंबाचे भेदक चित्रण विजय तेंडुलकर आपल्या विविध नाटकांद्वारे करतात. पु. ल. देशपांडे यांचे साहित्य याच काळात बहरत होते आणि विनोदाची डूब असणारे त्यांचे साहित्य जनमानसावर संमोहिनी करून गेले. याच काळातील वंचितांच्या जाणिवा तीव्रपणे व्यक्त होऊ लागल्या, याचे प्रतिनिधित्व दया पवार आणि नामदेव ढसाळ हे करतात.

या निवडक पंधरा साहित्यिकांनी मराठी साहित्य-सरिता प्रवाहित ठेवत एकूण साहित्यविश्वाला अनमोल अशी देणगी दिली आहे. ह्या निवडक साहित्यिकांच्या साहित्यामुळे मराठी साहित्य विविध अंगांनी बहरले-फुलले. अभिजात अशी साहित्यपरंपरा त्यांच्या साहित्यामुळे अधिक सशक्तपणे प्रवाहित होत राहिली आहे.

ही पंधरा पुस्तके म्हणजे या साहित्यिकांची समीक्षा नव्हे तसेच त्यांचे चरित्रही नाही. त्यांच्या साहित्यातून त्यांची ओळख व्हावी आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करावा, त्यांचे संपूर्ण साहित्य वाचावे ही प्रेरणा मिळावी या उद्देशाने सदर पुस्तके लिहिली गेली आहेत. मराठीच्या अभ्यासकापासून ते मराठी साहित्य वाचून आनंद घेणाऱ्या वाचकापर्यंत सर्वांना ही पुस्तके उपयुक्त ठरतील.

डॉ. सदानंद मोरे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

सौ. स्वाती जोशी...

# मनोगत

नामदेव ढसाळांचे एकूण साहित्य हिमालयाच्या उंचीएवढे आहे. त्यांच्या कविता या त्यांच्या उत्तुंग प्रतिभेची साक्ष देतात आणि त्यांचे ललितगद्य त्यांची विद्वत्ता आणि व्यासंग यांची प्रचिती देतात. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेल्या ढसाळांचे साहित्य एम्.ए.च्या विद्यार्थ्यांना 'अभ्यास' म्हणून शिकवले जाते आणि त्यांच्या साहित्यावर डॉक्टरेटचे प्रबंध लिहिले जातात. यातच त्यांची महत्ता आहे.

डॉ. आंबेडकरांवर त्यांची प्रखर निष्ठा होती. आंबेडकरांच्या साहित्याचा, त्यांच्या जीवनाचा ढसाळांवर प्रभाव होता. ढसाळांनी मार्क्सवादी विचारांना, डाव्या विचारांना आपलेसे केले तसेच नंतर उजव्या विचारसरणीच्याही जवळ गेले तरीसुद्धा त्यांची आंबेडकरी निष्ठा अक्षुण्ण राहिली.

विद्रोहाचा प्रखर आविष्कार म्हणजे नामदेव ढसाळ. शोषितांच्या मुक्तीचा लढा उभारण्याच्या कार्याचा एक भाग म्हणजेच त्यांची कविता. सामाजिक अन्याय, पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली उच्चवर्णीयांची सांस्कृतिक मिरासदारी यावर त्यांनी सर्वप्रकारचे हल्ले केले. आयुष्याची सुरुवात बकाल वस्तीत झालेली. सदासर्वकाळ गरिबी आणि अस्पृश्यतेचा लागलेला कलंक, अशा वातावरणात वाढलेल्या ढसाळांनी हे सर्व झुगारून देण्यासाठी कवितेचे हत्यार उपसले. अर्थातच त्यांच्या कवितेने उग्र स्वरूप धारण केले. पांढरपेशा समाजाने कधीही न अनुभवलेले जीवन-वास्तव त्यांच्या कवितेत, साहित्यात दिसू लागले आणि संपूर्ण समाज खडबडून जागा झाला. १९६०-७०-८० ही दशकेच विलक्षण अशा सामाजिक लाटेची साक्षीदार होती. ढसाळांच्या साहित्याची लाट प्रचंड, प्रलयंकारी होती.

अशा ह्या विराट, सर्वव्यापी साहित्याचा आणि साहित्यकाचा हा अल्पसा परिचय.

नामदेव ढसाळ यांसारख्या महत्त्वाच्या साहित्यिकांची ओळख थोडक्यात व्हावी ह्या माझ्या प्रस्तावाला साहित्य संस्कृती मंडळाने रुकार दिला. प्रस्तावाचे स्वागत केले. ह्या लेखनकामात रत्ना मगरे, रूपाली शिंदे आणि कोमल दवणे यांचे मोलाचे साहाय्य झाले. प्रा. नितीन आरेकर आणि प्रा. अभिजित देशपांडे ह्यांनी महत्त्वाचे मार्गदर्शन केले. दिनेश वाडेकर यांनी मुद्रिते तपासली आणि ऑलरीचचे अतुल जोशी ह्यांनी सुरेख अक्षरजुळणी आणि मुखपृष्ठ व पृष्ठमांडणी केली; या सर्वांचे आभार.

नामदेव ढसाळांवर, त्यांच्या साहित्यावर अनेक समीक्षकांनी, अभ्यासकांनी विविध निबंध-प्रबंधातून लिहिले आहे. त्यांच्यावरील अनेक पुस्तकेही उपलब्ध आहेत. ह्या सर्व लेखनसामग्रीचा हे पुस्तक लिहिताना उपयोग झाला आहे. त्या सामग्रीतील काही संपादन करून, काही संक्षिप्त असे संदर्भ साहित्य इथे घेतले आहे. ह्या सर्व लेखक, समीक्षकांचा तसेच त्या, त्या पुस्तकांच्या प्रकाशकांचा मी अत्यंत आभारी आहे.

साहित्य संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष श्री. बाबा भांड, सचिव मीनाक्षी पाटील आणि मंडळाचे सदस्य यांचा मी आभारी आहे. हे पुस्तक सिद्ध होण्यासाठी ज्यांनी सर्वप्रकारचे सहकार्य केले त्यांचे मनापासून आभार.

❖❖❖

- संदर्भासाठी आणि लेखकाच्या साहित्याचा परिचय होण्यासाठी घेतलेले उतारे व वाक्ये त्यांच्या मूळ मजकूर बरहुकूम राखण्याचा प्रयत्न केला आहे.

# प्रास्ताविक

सत्तरच्या दशकात ज्या साहित्यिकांनी मराठी साहित्य जगात खऱ्या अर्थाने खळबळ माजवली ते म्हणजे नामदेव ढसाळ. १९४९ मध्ये जन्मलेल्या नामदेव ढसाळांना त्यावेळच्या 'सवर्ण' मंडळींच्या मुलांनी वगैरे तुच्छतापूर्व वागणूक दिली. त्यांना शिक्षण घेणे नकोसे करून सोडले. त्यातूनच त्यांचे विद्रोही मन तयार झाले. उपजत असलेली बुद्धी व जिज्ञासू-कुतूहल, अशी मानसिकता जोडीने मनातले विचार व्यक्त करण्याची कला त्यांना अवगत असल्यामुळे फारसे शिक्षण नसताना देखील ते कविता लिहू लागले. बघताबघता त्याच रचनांचा पहिला कविता संग्रह 'गोलपिठा' १९७२ला प्रकाशित झाला आणि ह्याच पहिल्या वहिल्या त्यांच्या पुस्तकामुळे साहित्यजग हादरून गेले.

त्यांचे बालपण जरी खेडेगावात गेले असले तरी मुंबईला आल्यावर ते कामाठीपुरा, जेकबसर्कल, गोलदेऊळ ह्या परिसरात वाढू लागले. इथेच त्यांना तिथल्या जीवनाचे भयाण 'दर्शन' झाले. मुळातली तीव्र संवेदनशीलता, अन्यायाविरुद्ध लढावयाची प्रचंड मानसिक शक्ती यामुळे त्यांच्या शब्दांना धार आली. कवितेमध्ये असे प्रखरतेने न आलेले विषय आणि तशी शब्दकळा यामुळे त्यांच्या अनियतकालिकांमधून प्रसिद्ध होणाऱ्या कविता, सर्व साहित्यिकांचे, चळवळीतल्या कार्यकर्त्यांचे, डाव्या पक्षातील नेत्या-कार्यकर्त्यांचे लक्ष वेधू लागल्या. विजय तेंडुलकरांसारखे साहित्यिक या कवितांकडे आकर्षिले गेले. १९७२ सालच्या त्यांच्या पहिल्याच गोलपिठा काव्यसंग्रहाला समर्पक अशी प्रस्तावना तेंडुलकरांनी लिहिली. आपल्या प्रस्तावनेत तेंडुलकर लिहितात, ''नो मॅन्स लँड' - निर्मनुष्य प्रदेश जेथून सुरू होतो, तेथून नामदेव ढसाळ यांच्या कवितेचे मुंबईतील 'गोलपिठा' नावाने ओळखले जाणारे जग सुरू होते.' हे जग कधीही न बघितलेले, न पुस्तकात वाचलेले, असे वाचक आणि

साहित्यिकदेखील हबकून, हादरून गेले. अशा भकास व भेदक वस्तीत नामदेव ढसाळांचे आयुष्य जात असल्यामुळे त्या जगाची शिसारी येण्याऱ्यांविरुद्ध ते पेटून उठले. त्यांनी निर्भयपणे त्या वस्तीतले अनुभव, तशाच प्रकारचे शब्द योजत कवितेतून व्यक्त केले. ते सगळे अनुभव, सच्ची अभिव्यक्ती त्यामुळे आजवरच्या शैलीहून भिन्न जरी त्यांची शैली असली तरी खरी असल्यामुळे कार्यकर्त्यांच्या हृदयाला भिडली. त्या कवितांमधून व्यक्त झालेला विद्रोह कार्यकर्त्यांना, त्यावेळच्या तथाकथित दलित समाजातील तरुणांना त्यांचा स्वतःचा वाटला. यातूनच 'दलित पँथर'चा उदय झाला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 'मूठभर लोकांनाच त्याचा फायदा झाला.' ह्या ढसाळांच्या आकलनाने ते अधिक तीव्रतेने अभिव्यक्त होऊ लागले तसे राजकारणातही ते उतरले.

ह्या तथाकथित दलित समाजातील संवेदनशील असलेले कार्यकर्ते-कवी त्यांच्या स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेत होते. हा शोध ते व्यक्त करत होते. तेच पुढे 'दलित' साहित्य म्हटले जाऊ लागले. १९७२ नंतरच्या काळात ढसाळ मार्क्सवादी भूमिका स्वीकारून वर्गीय लढ्याची-संघर्षाची भूमिका घेऊन आपल्या कव्यातून, लिखाणातून तशी भाषा वापरतात.

त्या काळात इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे ढसाळ त्यांच्या राजकारणाकडे राजकीय बंडखोर कार्यक्रमामुळे आकर्षिले गेले. इंदिरा गांधींवरची त्यांची कविता ही गाजलेली कविता आहे.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांची आस्था आहे, त्यांचे 'दैवत' आहे. त्यांनी डाव्या विचारसरणीतून ते काँग्रेस व पुढे शिवसेना असा जरी प्रवास केला असला तरी, बुद्ध आणि बाबासाहेब यांविषयी त्यांची निष्ठा अभंग आणि अक्षुण्ण राहिली. त्यामुळे ते 'दलित' ह्या समाज घटकांपुरतेच न राहता संपूर्ण जगाला कवेत घेणाऱ्या भाषेत अभिव्यक्त होत राहिले. ढसाळांना अस्पृश्यता तर नकोच होती परंतु तुच्छतावाददेखील नको होता. स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी आत्मसन्मानाची जागा ते ह्या दोन्ही टोकांच्या मध्ये शोधत होते. ह्यातूनच त्यांच्या काही प्रेमकविता, बौद्ध धर्मातील दार्शनिक अभ्यास व जाणिवा व्यक्त करणाऱ्या कविता त्यांनी लिहिल्या.

अद्‌भुत अशी प्रतिभा लाभलेले कवी होते नामदेव ढसाळ. डोंगरावरून झरा प्रचंड वेगाने, खळाळत खाली येतो. त्याचा वेग कमी कमी होत जाऊन स्थिरपणाने संथपणे खोल खोल होत होत पुढे पुढे जात राहतो व समुद्राला जाऊन मिळतो. नामदेव ढसाळांचे जीवन आणि त्यांचे अभिव्यक्त ललितसाहित्य तसेच कविता ही नदीच्या प्रवाहाप्रमाणे आधी प्रचंड आवेगाने मध्ये येणाऱ्या सर्व अडथळ्यांना बाजूला सारत पुढे जाणारी, स्वतःची वाट शोधत जाणारी अशी आहे. ‘गोलपिठा’ ते ‘सर्व काही समष्टीसाठी’ असा त्यांचा प्रवास आहे.

आपल्या अस्तित्वाने, आपल्या कार्यकर्तृत्वाने, आपल्या साहित्याने नामदेव ढसाळांनी मराठी साहित्यात, मराठी जगात एक अढळ तारा ‘ध्रुव’ स्थान निर्माण केले आहे.

❖❖❖

*“हातात खिळे ठोक*
*छातीत भाल्याचे भोक*
*पायांना बुलेट घुसून आलेले पोक*
*आणि तरीही या शवयात्रेत झोक*
*असा की*
*खांदा देणारे मेलेत*
*आणि हाच फक्त जिवंत आहे”*



नामदेव ढसाळ यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९४९ मध्ये पुणे जिल्ह्यातील खेडजवळील पूरकणेरसर येथे झाला.

नामदेव लक्ष्मणराव ढसाळ यांचे बालपण खेड्यात गेल्याने जातीयतेचे चटके त्यांनी अनुभवले. अस्पृश्यतेमुळे मिळणारी तुच्छतेची वागणूक त्यांच्या वाट्याला आलेली. सवर्णीय मुलांकडून होणाऱ्या उपेक्षेमुळेच शिक्षणात त्यांचे लक्ष नव्हते.

११व्या इयत्तेपासून एम.ए.एम.फिल.पर्यंत आणि पीएच.डी.च्या प्रबंधापर्यंत जो कवी अभ्यासला जातो, त्या कवीचे शिक्षण मात्र केवळ एस.एस.सी.पर्यंतच झालेले होते. आयुष्याला सुरुवात मुंबईच्या बकाल वस्तीत झाली. त्यांना आलेला सामाजिक, आर्थिक विषमतेचा अनुभव आणि माणसाला मिळणारी घृणास्पद वागणूक त्यातून त्यांचा पिंड विद्रोही बनला. टॅक्सीड्रायव्हरचा व्यवसाय काही दिवस केला. त्यानंतर ते समाजकारण आणि राजकारणात आले. पुढे त्यांनी आपले आयुष्य लोकसेवेला वाहून घेतले. ‘दलित पँथर’ ही संघटना स्थापन करण्यात पुढाकार घेतला.

दलित वर्गाच्या, पीडित, शोषितांच्या मुक्तीचा लढा उभारण्याच्या कार्याचा एक भाग म्हणजेच त्यांची कविता व इतर लेखन. प्रखर

सामाजिक जाणिवेचा व विद्रोहाचा तीव्र आवाज उठवणारी त्यांची कविता म्हणजे संस्कृती आणि परंपरा, सामाजिक अन्याय व उच्चवर्णीयांचा दंभ याविरुद्ध उचललेले हत्यार आहे. त्यांची प्रारंभीची कविता मुख्यतः अ-नियतकालिकांतून प्रकाशित झाली. ढसाळांचा पहिला संग्रह 'गोलपिठा' (१९७२). यात ढसाळांनी पाहिलेल्या, अनुभवलेल्या महानगरांतील शोषण, दारिद्र्य, कुरूपता, वेदना, क्रौर्य यांनी भरलेल्या भयावह जगाचे, तसेच मध्यमवर्गीय साहित्यसंकेतांना आणि जाणिवांना हादरवून सोडणारे असे चित्रण आहे. त्यानंतर 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' (१९७५), 'तुही इयत्ता कंची' (१९८१), 'खेळ' (१९८३), 'गांडू बगीचा' (१९८६), आमच्या इतिहासातील अपरिहार्य पात्र 'प्रियदर्शिनी' (१९८६) हे काव्यसंग्रह, तसेच 'हाडकी हाडवळा' (१९८१), 'निगेटिव्ह स्पेस' (१९८७), या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. ढसाळांचे सर्वच लेखन तीव्र संवेदनशीलता, धगधगीत तरीही व्याकुळ करणारी भावनोत्कटता आणि प्रखर वैचारिकता यांच्या एकत्र मिश्रणाचे एक अनोखे रसायन आहे. 'कामाठीपुरा', 'पिला हाऊसचा मृत्यू', 'संत फॉकलंड रोड', 'भेंडीबाजार' अशा कवितांतून अधोगतीच्या विश्वाचे चित्रण करताना त्यांची आक्रमक शब्दकळा सर्व काव्यसंकेत धुडकावून लावते. अनोख्या प्रतिमांची निर्मिती हा ढसाळांच्या काव्यशैलीचा एक खास विशेष आहे. 'या सत्तेत जीव रमत नाही' (१९९५) या त्यांच्या संग्रहात त्यांची कविता केवळ सामाजिक बांधिलकीचा वा राजकीय ध्येयाचा विचार वा उच्चार करणारी न राहता स्वतःच्या अस्तित्वाची मुळे व मानवी अस्तित्वाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करते. ढसाळांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे अनेक कंगोरे आणि दुःखाच्या समृद्ध करणाऱ्या अनुभवांतून आलेली परिपक्वता त्यांच्या या संग्रहात आढळते.

नामदेव ढसाळांनी प्रसंगोपात्त वैचारिक लेखन केलेले आहे. डॉ. आंबेडकरांवरील प्रखर निष्ठा आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून आलेली तळमळ या अंगभूत प्रेरणांतून ढसाळांनी समकालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक वास्तवातील तिढे आणि प्रश्न यांचे विश्लेषण करणारे स्फुट लेखन 'आंधळे शतक' आणि 'सर्व काही समष्टीसाठी' या पुस्तकांतून केले आहे. बुद्धधर्मः काही शेष प्रश्न, आंबेडकरी चळवळ,

सोशॅलिस्ट आणि कम्युनिस्ट ही पुस्तके त्यांची वैचारिक भूमिका स्पष्ट करतात. शिसारीने भरलेल्या जगाकडे एका नव्या संवेदनशीलतेने पाहणारा एक बंडखोर कवी, संघर्ष करण्यासाठी, परिवर्तनासाठी, प्रक्षोभ व्यक्त करण्यासाठी कवितेचा प्रभावी उपयोग करणारा कवी ही नामदेव ढसाळांची ओळख आहे.

नामदेव ढसाळ हे आयुष्याची शेवटची अनेक वर्षे मायस्थेनिया ग्रॅव्हीज या दुर्धर आजाराने ग्रस्त होते. याशिवाय त्यांना कॅन्सरचा आजारही जडला होता. १३ जानेवारी २०१४ रोजी त्यांना मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. १५ जानेवारी २०१४ रोजी पहाटे चारच्या सुमारास त्यांचे निधन झाले. ते ६४ वर्षांचे होते. १६ जानेवारी २०१४ रोजी सकाळी ११ वाजता आंबेडकर महाविद्यालयाच्या प्रांगणात अंत्यदर्शनासाठी ठेवल्यानंतर चैत्यभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### विद्रोहाचे स्वरूप

समाजात काही समाजकंटकही असतात, जे समाजसुधारणेच्या नावाखाली फक्त विशिष्टांचे आसन दृढ करीत असतात. जनतेच्या हिताची ते पायमल्ली करीत असतात. जनतेला पारलौकिक मोक्षाचे आमिष कधी कधी दाखवतात. धर्म, रूढी, परंपरा, संस्कृती इ. च्या नावाखाली ते आपले आसन दृढ करीत असतात. अशा या सर्व क्षेत्रांतील अन्याय नष्ट करण्याकरिता विद्रोह अवतरतो. विद्रोह ही एक अमूर्त पण सातत्याने आढळणारी संकल्पना आहे. 'या संकल्पनेच्या बुडाशी पीडक आणि पीडित असे द्वंद असते' असे रा. ग. जाधव म्हणतात. पीडक समाज हा स्वातंत्र्य, समता, बंधुता-द्रोही असतो. पीडितांवर पीडक हे राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक संदर्भात अन्याय करीत असतात. हा होणारा अन्याय नष्ट करण्याकरिता आणि स्वतःचे हक्क मागण्याकरिता विद्रोह जन्माला येतो. जनतेच्या आयुष्याला निरर्थक समजून विशिष्टांच्या आयुष्याचे रक्षण करणाऱ्या पुराणिकांविरुद्ध आणि सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात जनतेची पिळवणूक करणाऱ्या द्रोह्यांविरुद्ध विद्रोह साकार होतो. धर्म, नीती, मंदिरेशाही ही पीडकांनी उभारलेली संरक्षक फळी असते. माणसाच्या न्याय्य प्रतिष्ठेकरिता झगडणे

हेच विद्रोहाचे कार्य असते.

विद्रोहाची जन्मस्थाने अनेक आहेत. विद्रोह ही सार्वत्रिक व स्वाभाविक जाणीव आहे. 'विद्रोहाचा संबंध नेहमी एका वैचारिक जाणिवेशी असतो. समाजातील कोणत्या थरातून तुमचा उदय होतो, त्या वस्तुस्थितीवर विद्रोह अवलंबून नसतो' असे प्रा. नरहर कुरुंदकर 'उत्थानगुंफे'च्या प्रस्तावनेत म्हणतात. विद्रोह ही एक जाणीव आहे. राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक या चारही क्षेत्रांत जनतेवर अन्याय द्रोही करीत असतात.

विद्रोहाचे खरे कार्य मानसिक परिवर्तन घडवून आणणे हे आहे. रजनीश आपल्या 'विद्रोह क्या है?' या पुस्तकात म्हणतात, ''क्रांती और बगावत (विद्रोह) के फर्क को थोडा समझ लेना उपयोगी हैं। विद्रोह का मतलब है कि जिसे लगता है वह तत्काल गलत से विदा हो जाये।'' क्रांती सफल होण्याकरिता तिला विद्रोहाचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

''सर्वजनहिताय - सर्वजनसुखाय'' असे विद्रोहाचे स्वरूप असते. यशवंत मनोहर यांनी केलेली विद्रोहाची व्याख्या- 'जन्मला तिथेच न थांबता आजवर तोडत घडवत आलेला हा माणूस म्हणजे विद्रोह. विद्रोह कविता ही सामाजिक जाणिवेतून अवतरते. कविता ही जेव्हा मृत संकेतांचा व नवतेचा आभास निर्माण करण्यात गुंतलेली असते, तेव्हा विद्रोही कवितेचा जन्म होतो. चालत आलेल्या अंधरूढी, श्रद्धा याविरुद्धचा तो आवाज असतो. जाणीवलक्ष्यी आणि अभिव्यक्तीलक्ष्यी विद्रोह असे काव्यक्षेत्रातील विद्रोहाचे दोन प्रकार आहेत.

कलावंताला जे जे अनुभव येतात ते तो ज्या परिस्थितीत वाढतो त्या परिस्थितीवर आणि मनाची आंतरिक घडण यावर अवलंबून असतात. जगताना त्याला स्वतःला ते येणारे अनुभवच तो उत्कटतेने व्यक्त करीत असतो. अनुभवाचे तीन घटक

१) विचार, २) संवेदना, ३) भावना. विद्रोही कवितेत विचार येतो. विद्रोही कविता ही वैचारिक कविता आहे. विद्रोही कवितेत मानवतेचा उद्‌गार असतो. ज्या गोष्टी जनहितास मारक असतात, त्यांना विद्रोही कवितेत नकार दिला जातो.

विद्रोही कवितेत कथात्मक नाट्यही असते. विद्रोही काव्य हे व्यक्तीपुरते

किंवा काळापुरते मर्यादित नसते. येथे भावनिक अनुभव आणि विचार एकात्म अवस्थेत प्रकट होत असतात. वैचारिकतासुद्धा काव्यात्मकतेला मारक कशी ठरत नाही याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे नामदेव ढसाळ यांची विद्रोही कविता आहे. ढसाळांच्या काव्यात परिस्थितीवर आक्रमण करण्याची वृत्ती दिसून, मानवी जीवनातील हे भकास वास्तव कवी परकेपणाने रेखाटतो असे नाही. हे आक्रमण नामदेवी कवितेचा एक अपरिहार्य भाग बनून आलेले असते. आक्रमण अर्थातच वैचारिक व भौतिक पातळीवरील संघर्षमय स्वरूपाचे असते. आपल्या कवितेचा व कवितेतून आविष्कृत होत राहणाऱ्या आशयाचा कवी स्वतः एक अविभाज्य घटक बनून राहतो. कवीला जे अनुभव येतात ते कवी तटस्थपणे घेत नसतो. त्या अनुभवाशी त्याची भावनात्मक गुंतवणूक झालेली असते. म्हणून त्याच्या कवितेला कलात्मक रूप प्राप्त होते.

## जडणघडण

नामदेव ढसाळांची कविता वाचताना कवितेमागे दडलेले, अन्यायाशी झुंज घेणारे झुंजार व्यक्तित्व आपल्या डोळ्यांपुढे साकार होत जाते...

ज्या वस्तीत हे कविमन घडले त्या वस्तीचे नाव 'गोलपिठा' असे आहे. ही वस्ती मुंबईतील वेश्यांची प्रसिद्ध वस्ती आहे. विजय तेंडुलकर 'गोलपिठा'च्या प्रस्तावनेत म्हणतात, '''नो मॅन्स लँड' - निर्मनुष्य प्रदेश जेथून सुरू होतो, तेथून नामदेव ढसाळ यांच्या कवितेचे मुंबईतील 'गोलपिठा' नावाने ओळखले जाणारे जग सुरू होते. हे जग रात्रीच्या दिवसाचे, रिकाम्या किंवा अर्धभरल्या पोटांचे, मरणाच्या खस्तांचे, उद्याच्या चिंतांचे, शरम आणि संवेदना जळून उरणाऱ्या मनुष्य देहाचे, असोशी वाहणाऱ्या गटारांचे, गटाराशेजारी मरणाची थंडी निवारीत पोटाशी पाय मुडपून झोपणाऱ्या तरुण रोगी देहांचे, बेकारांचे, भिकाऱ्यांचे, खिसेकापूंचे, बैराग्यांचे, दादांचे आणि भडव्यांचे, दर्ग्याचे आणि क्रूसाचे, कुरकुरणाऱ्या पलंगालगतच्या पोपडे गेलेल्या भिंतीवरच्या देवांचे आणि राजेश खन्नाचे, गांजाच्या 'खाटांचे', त्याच खाटल्यावर कोपऱ्यात झोपलेल्या गोजिरवाण्या मुलाचे व त्या मुलाला शरीफ बनवण्याची महत्त्वाकांक्षा बाळगीत शेजारच्या कुंटणखान्याची रखवाली करणाऱ्या बापाचे, हिजड्यांचे, हातभट्ट्यांचे,

आध्यात्मिक कव्वाल्यांच्या तबकड्यांचे, कोणत्याही क्षणी पाण्याच्या भावाने वाहणाऱ्या ऊन चिकट रक्ताचे, वाफा ओकणाऱ्या पाणचट लालभडक चहाचे, स्मगलिंगचे, नागव्या चाकूचे, अफूचे...''

....अशा गोलपिठ्यातील भकास वस्तीत ढसाळांचे व्यक्तित्व घडले. भोवतीच्या समाजजीवनाचे वास्तव त्यांना विलक्षण हिडीस, कुरूप आणि जीवघेणे वाटायला लागले. त्यांची कविता मशाल झालेल्या मनाची कविता आहे.

गोलपिठातील वेश्यांच्या संघटनेचे एक नेते म्हणून ढसाळांनी कार्य केले. नामदेव ढसाळांनी आपल्या लेखनाला सुरुवात अ-नियतकालिकातूनच केली. रूढी, परंपरा, ईश्वर अस्तित्ववाद नाकारणारी ही अ-नियतकालिकांमधली मंडळी. एका बाजूने लैंगिक विषयक भावसृष्टीत शिरली परंतु यांना कधी शोषितांचे दुःख दिसलेच नाही. या कवींमधील काहींनी स्वतःला अभिमानाने 'गांडू' म्हणवून घेतले. इंद्रियवाचक लैंगिक शब्द बिनबोभाटपणे वापरले. त्याचा परिणाम ढसाळ यांच्या कवितेवरही झाला. परंतु ढसाळांच्या कवितेत हे शब्द उपरे वाटत नाहीत. ते जे जीवन जगले त्या जीवनाशी निगडित त्या जीवनातीलच ते शब्द आहेत असे सतत वाटते. त्यांचे व्यक्तिमत्त्वच मुळी प्रखर अन्यायाला जाब विचारणारे आहे.

वर्णव्यवस्थेत, वर्गव्यवस्थेत सामाजिक स्थान निर्माण करण्याकरिता दलित तरुणांनी ९ जुलै, १९७२ रोजी दलित पँथरची स्थापना केली. त्यात नामदेव ढसाळ हे प्रमुख होते. जाहीरनामा सादर केला. नामदेव ढसाळांनीच तो सादर केला. त्यात पँथरची व्यापक भूमिका आपल्याला दिसते.

ढसाळांच्या गंभीर कवितेचे मूल्य काय हे लिहिताना एका कॉलेजमधून आणलेल्या नामदेव ढसाळ ह्यांच्या कवितासंग्रहावर (मूर्ख म्हाताऱ्याने) गेल्या सव्वीस वर्षात फक्त दोघांनी हे पुस्तक नेल्याची नोंद आहे. आयुष्य जगताना भूतकाळ समजून घेण्याची गरज संपली आहे का? ढसाळांचा बुद्ध हा आंबेडकरांनी प्रोजेक्ट केलेल्या बुद्धाशी काय नाते सांगतो? ढसाळांची कविता व गद्य समजून घेताना पाश्चात्त्य काव्यक्षेत्र फारसे उपयोगी पडत नाही.

●दलित म्हणजे अनुसूचित जातीजमाती, बौद्ध कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन, शेतमजूर, गरीब, शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी.

- वर्णव्यवस्था, वर्गव्यवस्था मोडणारे क्रांतिकारक पक्ष, खऱ्या अर्थाचे क्रांतिकारक पक्ष.

- आर्थिक, राजकीय दडपशाहीला बळी पडलेले इतर सर्व सामाजिक घटक.

- सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा

- जमीनदार, भांडवलदार, सरकार आणि त्यांचे पित्ते.

- धार्मिक, जातीय राजकारण करणारे पक्ष या सर्वांना पाठीशी घालणारे सरकार.

''आम्हांला ब्राह्मण आळीत जागा नको, आम्हांला साऱ्या देशाचे राज्य पाहिजे. आमचे लक्ष केवळ व्यक्ती नसून व्यवस्था आहे. हृदय परिवर्तनाने, शिक्षणातील उदारमतवादाने आमच्यावरला अन्याय, शोषण थांबणार नाही. आम्ही क्रांतिकारक समूह जागे करू, संघटित करू. या प्रचंड समूहातील संघर्षामधून क्रांतीची लाट येईल'' असा जाहीरनामा पँथरने जाहीर केला. सत्याग्रहाने समाज बदलणार नाही. त्याकरिता क्रांतीच हवी. दलितांचे राज्य स्थापन करण्याचे दलित पँथरचे ध्येय आहे. क्रांतीच्याच मार्गाने हे होऊ शकते असा पँथरचा आत्मविश्वास आहे. नामदेव ढसाळांनी घेतलेली भूमिका ही आंबेडकरवादापेक्षा मार्क्सवादाशी जवळीक साधते, आंबेडकरवाद रोटीपेक्षा इज्जतीला जास्त महत्त्व देतो. मार्क्सवाद रोटीचाच प्रश्न महान समजतो.

लिट्ल मॅगेझिन्सच्या फॅशनेबल सर्व नकारवादाचा परिणाम नामदेव ढसाळ यांच्या 'गोलपिठा'तील काही कवितांवर झालेला आहे -

''माणसाने प्लेटो, आइन्स्टाइन, आर्किमिडिज, सॉक्रेटिस, मार्क्स, अशोक, हिटलर-बिटलर, कामू, सार्ग, काफ्फा बोदलेअर, रम्बो, पाउंड, हापकिन्स, गटे, दोस्तोव्हस्की, मायकोव्हस्की, मॅक्झीम गॉर्की, एडिसन, मेडिसन, कालिदास, तुकाराम, व्यास, शेक्सपिअर, ज्ञानेश्वर वगैरेंना त्यांच्या शवासकट गटाराचे मेनहोल उघडून त्यात सलग सडत ठेवावे. येशूच्या, पैगंबराच्या, बुद्धाच्या, विष्णुच्या वंशजांना फाशी द्यावे.''-

- अशी त्यांची सर्व नकारवादी वृत्ती प्रकट होते. १९७२ नंतर त्यांच्या विचाराची दिशा बदलली. ते काही स्वीकारायला लागले. ‘गोलपिठा’तीलच काही शेवटच्या कवितांमधून ही बदललेली भूमिका आपल्याला दिसते.

*‘‘मांजर आडवं गेलं तरी थांबणार नाहीयत आता या भिंती*
*आणि हाडापेरातून उचल खाणारी ही सर्वत्र चित्रं*
*पहिलं, आंबेडकरांचं म्हंजे माझ्या लढाऊ पेशीचे*
*दुसरं, मार्क्सचं म्हंजे माझ्या मूलभूत प्रगल्भ आत्म्याचं*
*तिसरं, माओचं म्हंजे माझ्या सर्वयुक्त त्वचेचं*
*रंग नाही धारणा*
*नग्नता नाही क्रियाशीलता*
*आपण सर्व नव्या अस्तित्वाचे चितारी लढारी*
*हा आपल्या उमेदीचा लाँगमार्च’’*

हा संग्रह १९७२ मध्येच प्रकाशित झाला. बऱ्याचशा कविता अ-नियतकालिकातून प्रसिद्ध झालेल्या आहेत. नामदेव ढसाळ ‘लिट्ल मॅगेझिन्स’च्या चळवळीत फक्त कविता प्रसिद्ध करण्याकरिताच गेले. अस्तित्वाचा शोध घेण्याकरिता केलेला प्रयत्न म्हणजे दलित साहित्य. लोकशाहीत धर्माचे स्तोम माजवले जाते. राजकीय पुढारी प्रचाराला नारळ फोडून सुरुवात करतात. या लोकशाहीत सामाजिक विषमतेला जन्म दिला जातो. दलितांचे शोषण करणाऱ्यांना संरक्षण दिले जाते. दलितांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते.

येथील लोकशाही कुचकामी आहे. ती फक्त राजकीय पुढाऱ्यांचीच पोटे भरते, बाकी जनतेला उपाशी ठेवते असे म्हणणारे ढसाळ नंतर पँथर, शिवसेना असा प्रवास करतात.

१९७५ मध्ये त्यांचा दुसरा काव्यसंग्रह ‘मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले’ प्रकाशित झाला. त्यात ते मार्क्सवादी भूमिका स्वीकारतात. दलित पँथरच्या विघटनानंतर हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्यांनी ‘मी माझ्या कवितेला वर्गीय हत्यार मानतो’ असे म्हटले आहे. सर्व शोषितांना एकत्र करून क्रांतिद्वारे शासनव्यवस्था उलथून पाडण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आढळतो.

तिसरा काव्यसंग्रह 'आपल्या इतिहासातील अपरिहार्य पात्र, प्रियदर्शिनी' हे इंदिरा गांधी यांच्यावर लिहिलेले काव्य आहे. हा काव्यसंग्रह १९७६ मध्ये प्रकाशित झाला. एका वर्षातच नामदेव ढसाळ राजकीय पातळीवर पूर्णपणे बदललेले दिसतात. कधी कधी कॉम्रेड, कधी काँग्रेस, तर कधी जनता...

*''तुझ्या युद्धाचा होम पवित्र आहे*
*सारी जनता ते रणकुंड धगधगत ठेवील*
*प्रियदर्शिनी तू होऊन बसली आहेस*
*आमच्या इतिहासातले एक अपरिहार्य पात्र''*

असे इंदिराजींना ते म्हणतात.

जवळजवळ पाच वर्षांनी नामदेव ढसाळ यांचा चौथा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. 'तुही इयत्ता कंची' (१९८१) या काव्यसंग्रहात कुठल्याही पक्षाची बांधिलकी आढळत नाही.

*''कारण आम्हाभोवती पसरलेले परमिटरूम आहेत*
*आणि सत्तेला विकलेले लोकप्रतिनिधी''*

नामदेव ढसाळ यांचा विवाह सुधारणावादी शाहीर अमरशेख यांची कन्या मल्लिका अमरशेख यांच्याशी झाला. हा आंतरजातीय विवाह ढसाळांच्या अमरशेखांच्या मानवतावादी दृष्टिकोनावर प्रकाश टाकतो.

नामदेव ढसाळ यांचे इतर प्रकाशित साहित्य 'हाडकी हाडवळा' कादंबरी आहे. यात ते खेड्यात असतानाचे त्यांचे बालपण साकार झालेले आहे. या कादंबरीत लेखक जातीयतेमुळे होणारे हाल व्यक्त करतात.

## नामदेव ढसाळांची कविता


### खेळ

ढसाळांनी 'खेळ' ह्या काव्यसंग्रहात 'काम' ह्या जीवनार्थाचा शोध घेतला आहे. स्त्रीच्या शरीरापासून मुंबईच्या शरीरापर्यंतचे सौष्ठव उकलत स्वतःची कविता घडवतात. ढसाळ जडवादी डायलेक्टिक्ससाठी अप्रतिमरीत्या उकल करतात. उदा. 'लक्ष्मी, सरस्वती पक्षपाती रांडा. आम्ही या म्हटलो त्या आल्या नाहीत. आमच्या खाली निजा म्हटले,

त्या निजल्या नाहीत. तू आमच्याशी इमान राख, तू आमच्या विधानांना जागव, अनंताची मुरली वाजव. तू आमच्या स्वप्नांना खेळव. तू आमच्या रेतांना अंकुर फोड. हे भटकभवाने, हे अतिशूद्रे, हे खंडोबाच्या मुरळे हे नाचनारणे, हे हमदर्दी रांडे, मी तुझ्यातून फाटक्या भणंगासारखा निघून जाणार नाही. तुझं सत्य फेडून घेईन. तू अल्लखनंदाचे दरवाजे वेडझव्यासाठी खुले कर. मुंबई, मुंबई, माझ्या प्रिय रांडे, मी तुला खेळवून जाईन. मी तुला असा खिळवून जाईन.' ह्या ओळीत लक्ष्मी, सरस्वती चिद्‌विलासी पण पुढच्या ओळी त्यांना जडवादी करून टाकतात. मुंबईची भटकभवाने, हे खंडोबाच्या मुरळे, ह्या चिद्‌विलासी, पण हे अतिशूद्रे हे हमदर्दी रांडे ही संबोधने त्यांनाही सामाजिक करून टाकतात. तुझे सत्त्व फेडून घेईन. तू अल्लखनंदाचे दरवाजे वेडझव्यासाठी खुले कर. हे तर पूर्णच चिद्‌विलासी, पण मुंबई, मुंबई माझ्या प्रिय रांडे... ह्या ओळी त्यांना पूर्ण जडवादी करतात. संपूर्ण संग्रहभर हाच युग्मीय खेळ चाललेला दिसतो. ''स्त्रीचा काम हाच दलितांच्या मुक्तीचा झरा. त्यांच्या वेदनेचा, सृजनाचा तो आखरी आसरा. त्यामुळेच तुझ्या हवेचं दार उघडं असू दे.''

## गांडू बगीचा

ढसाळांचा हा काव्यसंग्रह भौगोलिक अभिधेपासून पूर्ण तुटलेला नसला तरी भौगोलिक लक्षणा व व्यंजना ह्यांची वाढलेली व्याप्ती हे त्याचे वैशिष्ट्य आहे. 'किती तरी दिवसांनी मी स्वतःचेच करू लागलो आहे निरीक्षण' असे त्यांनी म्हटलेच आहे. आत्मपरीक्षण, आत्मनिरीक्षण, 'देव आणि देवाची भानगड गेली गाढवाच्या गांडीत. मला आवडते, महापाप करायला, मला आवडतं माणसासारखं वागायला' असं एकीकडे म्हणत असतानाच 'आत्मरौरवाच्या नरकातून मला बाहेर पडू द्या' असेही ते म्हणतात. ते म्हणतात, 'मी जाणतो माझ्यातल्या अनात्म्याला. अनिश्वराच्या शेतात जो वाढला मुबलक, क्रोधाला शांती, हिंसेला अहिंसा, असत्याला सत्य कस्सं जिंकतं, माझ्याजवळ याचं कुठलंही उत्तर नाही,' असे ते म्हणतात. (माझ्या ज्ञानदेवाची भिंत जमिनीतच रुतून राहिली. माझ्या अस्पृश्य अंगणात काहीच फुलू शकले नाही. ना मोगरा फुल्ला ना जाईजुई) 'आता आमच्या इच्छेच्या शेतात सर्व काही उगवतं, स्टेनगन नि गुलाबाची




फुलं', 'अन्नपाणी नि कपडालत्ता' आम्हासाठी नाही दुर्मीळ आणि ते दोन मांड्यांमधलं अद्‌भुताचं संगीत, कस्तुरीची गाठ पडलेय उघडी, प्रत्येकजण शोधतोय आपापली मादी, 'कधीकाळी अंतरंगी साचला होता नरक, फिरवली यक्षिणीची कांडी... आम्ही झालोत जीतीजागती माणसं.'

हा संग्रह व्यवस्थेविषयी व स्वतःविषयी अधिक जागृत आहे. 'शिक्षण' आणि 'संघटन' ह्या क्रियांवरचा जोर ओसरला आहे. मात्र परिवर्तनाचा जोर कायम आहे...

### सामाजिक विद्रोह

कलावंत हा समाजातच जन्माला येत असतो. कलावंताची सर्व स्वप्ने समाजातच फुलत असतात, कोमेजत असतात. त्याच्या सगळ्या इच्छा समाजातच पूर्ण होत असतात. समाजाने दलिताला दिलेली वागणूक याचे भेदक चित्रण ते सतत आपल्या कवितेतून करतात. समाज संपूर्ण विषमतेने भरलेला आहे. देव, धर्म, रूढी, अंधश्रद्धा, संस्कृती यांच्या नावाखाली दलितांना पिळले जात आहे. समाज हा ईश्वरनिर्मित आहे आणि दलित या जन्मी दास आहेत. दलितांनी मरमरेस्तोवर वेठबिगारीची कामे करायची, तेही न बोलता आणि मालकांनी आज्ञा करायच्या असतात. हे शिकविणारी येथील संस्कृती आहे. मेल्यानंतर हिंदूंच्या मते आत्मा अनंतात विलीन होतो; पण जात ही मेल्यानंतरही चिकटून राहते. समाजात पाण्याला जाती-धर्म शिकविला जातो...

समाजातील ह्या अनिष्ट रूढी, परंपरा, मंदिरशाही, संस्कृती इत्यादींविरुद्ध त्यांनी विद्रोह पुकारला आणि समता, बंधुता व स्वातंत्र्य

या तत्त्वत्रयींची मागणी केली. या कवितेतील सामाजिक विद्रोह रूढी, अंधश्रद्धा यांविरुद्ध साकारतो.

ढसाळ काव्यप्रांतातील दुसरे केशवसुतच आहेत. त्यांनीही मराठी कवितेला नवा आशय दिला. नामदेव ढसाळांच्या समाजातील वास्तव हे इतके भयानक आहे की, ते अभिव्यक्त करताना कवी बंडखोरीची भाषा वापरतो. ''केशवसुतांप्रमाणे ढसाळांच्या कवितेला जे म्हणायचे आहे ते दलित समाजाच्या मनात धुमसते आहे.'' दलित कवितेतील 'मी' जेव्हा बोलतो, तेव्हा तो 'आम्ही' असतो. समाजातील विषमताच तो कवी साकार करीत असतो...

नामदेव ढसाळांची कविता तिच्यातील दाहक वास्तवामुळे बंडखोरीची भाषा बोलते. ती फॅशन म्हणून नाही तर अनुभवविश्वाला साजेशीच भाषा आहे. हे सभोवतालच्या परिस्थितीमुळेच घडले आहे. आयुष्यात साधा फूटपाथदेखील आपला नाही. प्रकाशदेखील आपला नाही, तो सामंतशहांनी लाच देऊन लॉक केलेला आहे. या जाणिवेपोटी ती बंडखोरी येते. कवी शोषकांना परखडपणे सांगतो आहे, 'आमच्या अब्रूचे धिंडवडे काढणाऱ्यांनो, आमची अब्रू गोलपिठावर नागविणाऱ्या सामंतशहांनो, तुमचा ऱ्हास जवळ आलाय.'

*''मुक्तछंदाच्या संजीवनीने*
*आम्ही जिवंत झालो आहोत*
*तुमच्या पायाचे छिनाल घर फोडण्यासाठी.*
*शब्द म्हणाले.*
*अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा..''*

ह्या सूर्याचे दर्शन अस्पृश्यांना बाबासाहेबांमुळे घडले. आपली होणारी कुचंबणा कवी शब्दातून व्यक्त करू लागले.

शहरातील बकाल वस्त्या, भयानक जीवन, समाजसुधारकांना कधी दिसलेच नाही. सुधारकांनी फक्त भाषणबाजीने या वस्त्यांचा उद्धार केला. इथे माणसामाणसांत भिंती उभ्या केल्या जातात. किड्यामुंगीसारखे जीवन जगावे लागते. हाच जीवनाचा अर्थ काय? असे कवी आपल्या समाजालाच विचारतो. मी तसा जगणार नाही आणि तुम्हांलाही तसा लाचारीने जगू देणार नाही. कारण-

*''सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर*
*हजारो वर्षांनंतर लाभला.*
*आता सूर्यफूलासारखे सूर्योन्मुख*
*झालेच पाहिजे''*

येथील समाज, सामंतशहांनी त्यांच्या सोयीकरिता करवून घेतला. या समाजात पाण्यालाही चातुर्वर्ण्य शिकवला जातो.

*''वर्ल्या अंगाला तुमी पाणी भरायचं*
*खाल्ल्या अंगाला आमी*
*वाहव्वा वाहव्वा कसा सोवळ्यानं शिकविला*
*जातो पाण्यालाही चातुर्वर्ण्य.''*

येथील ईश्वराने पाण्याच्या रंगालाही जातीचा रंग दिला. पुरुषजातीने तिला भोगदासी म्हणून नेहमीच गौण लेखले. बरोबरीच्या नात्याने कधी वागविलेच नाही. संस्कृत पंडित कवींनी तिच्या बाह्यांग सौंदर्याचे वर्णन केले. संतांनी मोक्षाच्या मार्गातील धोंड, मोहमय वस्तू म्हणून उपेक्षिले. दलित साहित्यात जेव्हा स्त्री येते तेव्हा ती सहकारी या नात्यानेच येते. ढसाळांच्या कवितेत प्रेयसी येते तीही या समाजातील विषमतेने पोळलेली. पोटाकरिता वाट्टेल तो व्यवसाय करणारी. नशिबाचा खेळ म्हणून तुला राबवणारे चूप राहतात. पण कवी म्हणतो,

*''तू म्हणजे अबला नाहीस*
*तू चंदनाचं लाकूड आणि बाभळीची औषधी साल*
*तू तलवार आणि मानेतून गळणारं रक्त*
*तू हाडातून खेळणारी वीज आणि पाणी''*

तू मूर्तिमंत क्रांतीच आहेस, असे कवी तिला म्हणतो.

वेश्यांना कवी म्हणतो की,

*''तुम्हाला या स्थितीत ज्यांनी आणले,*
*त्यांच्या नाशासाठी मी पिळू घातलीय आळी*
*तुम्ही छिन्नभिन्न पंखांनी पिसारत या''*

गोलपिठ्यातून प्रामुख्याने सामाजिक अवस्थेचेच वर्णन कवीने केले.

## तुही इयत्ता कंची? तुही इयत्ता...

नामदेव ढसाळ यांच्या ‘गोलपिठा’ संग्रहाने मराठी कवितेला एक अस्पर्श-अनोखे क्षितिज सर्वार्थाने खुले करून दिले. सांकेतिक शब्दसारणीचे सर्व साचे तोडून मोडून टाकले. ह्या दशकातील ताकदीचा जो अनुलंघ्य मानदंड होता. इतका की, ढसाळांनाही त्यापुढे जाणे शक्य झाले नाही. त्यामुळेच ‘मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले’ आणि ‘आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्रः प्रियदर्शनी’ ह्या दोन पुस्तकांकडे फारसे चोखंदळ व चिकित्सक दृष्टीने पाहिले गेले नाही.


एक गोष्ट स्पष्ट आहे की, विवक्षित सामाजिक तत्त्वज्ञानाच्या पुरस्काराचा इतका ठळक गंडा बांधून वावरणे मराठी काव्यरसिकाला त्याज्य वाटते. पण कलादृष्टीने ते सारे काव्यच, तिरस्काराचा टिळा लावून, टाकावू ठरवून, निकालात काढणेही त्याज्यच ठरावे.

‘तुही इयत्ता कंची तुही इयत्ता’ हा श्री. नामदेव ढसाळ यांचा नवा चवथा काव्यसंग्रह, एकावन्न कवितांच्या ह्या संग्रहात ढसाळांच्या सर्वगामी प्रवासाचे विविध समृद्ध रंग प्रकट झाले आहेत. स्वतःच्या अनोख्या ढंगाने आणि शैलीने उपरोक्त संग्रह, संस्मरणीय असाच झाला आहे.

नामदेव ढसाळ हे सामाजिक प्रश्नावर ज्या पोटतिडकीने, आक्रमकपणे पेटून उठतात त्याच्या अगदी उलट टोकाला जाऊन हळुवारपणे मानवी मनःकोशातील भावनांची जपणूकही करतात. शब्दांच्या कठोर लाठ्याकाठ्यांनी अन्याय करणाऱ्या घटकांवर तुटून पडतात. तसेच अंतर्मुख होऊन दुःखकारणांचा बुद्धांच्या कणवेने शोध घेऊन विधायक आशावादालाही पेरीत जातात.

ह्या संग्रहातील त्यांचे चिंतनविषय सर्वसमावेशक आहेत. स्वतःचे चित्रविचित्र विसंगत वागणे, आपल्या व आपल्या समाजावर लादल्या गेलेल्या सर्वांगीण गुलामी ओझ्याचे आदिकारण शोधणे, जग, माणसांची अतर्क्य मैफल, माणूस व त्यांचे चिरंतन विकारचक्र, शिव्याशाप आणि परवड, ऋतुचक्रांची पतझड, स्वातंत्र्य, मानवी मनाला पडणारे मुक्ततेचे संगमरवरी स्वप्न, त्याच्या कस्पटासारख्या चिरडल्या जाणाऱ्या पण पुनःपुन्हा सजग होणाऱ्या भावना. एकदुसऱ्याशी, विचारसंसारातील गुंतागुंतीची नाती, ‘छबुकल्या दारिद्र्याची विरूपे आणि शरीरवासनांची

व पोटाच्या कुरतडणाऱ्या भुकेची लळिते', ढसाळांना सैरभैर करून सोडतात. मग पुराने फुंफाटलेली गढूळगाळ नदी वेगाआवेगाने रोंरावत निघावी, असे शब्द त्यांना सुचतात. त्यांना वेग असतो बंदुकीच्या गोळीचा, त्यांची धार असते खंजिरासारखी तीक्ष्ण. पण हे सगळे घडत असतानाही ढसाळ वैचारिकतेच्या व भावनात्मकतेच्या किनाऱ्यांचे भान ठेवून असतात. आणि हेच त्यांच्यातील कवीचे मोठेपण आहे. कारण कार्यकर्त्यांवर मात करून, शब्दातला प्रचारगंज घासूनपुसून तो लख्ख निरामय करण्याचे काम, त्यांच्यातील कवी पार पाडीत असतो.




ही नामदेव ढसाळांच्या मनातील उसळती लाट आहे. शब्दांच्या विविध विभ्रमांचा केशवसुतांपेक्षाही अधिक सुजाणपणे व धिटाईने त्यांनी विचार केला आहे. आपल्या प्रत्येक अनुभवात व पडझडीतही शब्दांची सोबत त्यांना प्रिय आहे. रक्त आणि दारूपेक्षाही आपल्या सोबतच शब्दांना ते जनरल वॉर्डात विश्रांतीला बोलावतात.

*हे शब्दांनो, या ना इथे विश्रांतीला*
*पायांना चक्रे बांधून चिकार वणवण केलीत*
*जरा याही धडधडणाऱ्या हृदयाला पाहून घ्याना*
*जरा याही धमणीचा रिदम ऐकून घ्या ना*
*जरा याही पुत्रवती वृक्षाच्या छायेत बसून घ्या ना*
*कदाचित तुमच्या वांझ गर्भाशयाला पालवी फुटेल'*

(जनरल वॉर्ड)

आतापर्यंतचे शब्द स्पेशल वॉर्डातले होते. वेद, उपनिषदे, संतमहंतांनी

व पोटभरू पंडितांनी त्यांची नसबंदी केली होती. माणुसकीचा, भूतमात्रांचा कोरडा गहिवर त्यांना मढवला होता. त्यामुळे ते गावाबाहेरच्या गर्दीकडे व गावकुसाबाहेरच्या तृष्णार्तांकडे वळलेच नाहीत.

ही जाणीव ढसाळांना पोखरून काढते. सतत तळपत्या उन्हात पोळत्या अनवाणी पायांची आपली बापुडवाणी माणसे बघताना, त्यांच्या मनाची तगमग होते. आणि ते लिहितात -

*‘शब्दांनी हरवून जायला हवंय*
*फक्त वेड्यांच्या जत्रेत*
*वेड्यांच्या*
*हा आमच्या नव्या जन्मठेपेचा दिवस.’*

(या अखंड ग्रीष्मात)

प्रत्येक दिवस साधा असो, रजेचा असो की, स्वातंत्र्याचा असो. तो घेऊन येतो अपेक्षाभंगाचा कडकडीत उन्हाळा. अशा आयुष्याच्या निरर्थक चौकटीला तरी अर्थ काय ?...

शब्द आणि कविता याबद्दलची नामदेव ढसाळांची मनोगते खूप बोलकी, व्यापक व आशयसंपन्न अशीच आहेत. ‘कविता’ नावाच्या छोट्या कवितेत त्यांना कवितेचा रंग म्हणजे -

*‘मरणावर चढणारा*
*चतुरंग’*

वाटतो. अजून मराठीची ओटी भरली गेलीच नाही, अशी त्यांची धारणा आहे. म्हणून तर ते म्हणतात -

*‘हे बहिणाबाईच्या बहिणाबाई*
*मरण्यापूर्वी एकदा तरी तुझे*
*गाणे ऐकवशील काय ?*
*या रांडाव मराठी भाषेला*
*पुन्हा सवाष्ण होताना पाहायचंय मला’*

(रमाबाई आंबेडकर)

भाषा सवाष्ण-समृद्ध व्हायची असेल, तर ती बोलणाऱ्या दीन दलितांच्या जीवनमानात प्रगतिपर परिवर्तन घडले पाहिजे. पण त्यांची अवस्था अधिकच बिकट व त्रिशंकूसारखी झाली आहे. म्हणूनच नामदेव

ढसाळ ‘कसा विहरू’मध्ये -

*धड पहाटेचा उदय होत नाही*
*धड पाखरे निवांत झोपी जात नाहीत*
*कंच्या शहाण्यांनी लिहून ठेवलीय*
*ही लोफर मेलडी.*

प्रापंचिक कुटुंबवत्सल माणूस आणि न्यायासाठी उपलब्ध असलेल्या शक्तिसाधनांनी लढा उभारणाऱ्या पँथरमध्ये वावरणारा नेता ह्या दोन रूपाची ओढाताण त्यांच्या आरंभीच्या कवितात दिसते. ‘छबुकलं दारिद्र्य’ खेळवतांना पितृहृदय व मातृवात्सल्याचा समन्वय त्यांच्यात झालेला दिसतो. दोन्ही पातळ्यांवर ही कविता मनाला भिडत जाते. स्वतःच्या अपत्याकडे पाहणारा पिता आणि यातनेलाच अर्भकाचे प्रतीक मानून केलेली जोजवणूक या कवितेत दिसते.

*‘नेत्राचा दिवा हाताचा पाळणा करता आला नाही तुम्हांला*
*तरी म्हणा ना तुम्ही*
*पडू पडू माल वाढू...’*

किंवा -

*‘बाळाला जपून उचला भावबंदांनो*
*ते अंगावर सू करील बरं का*
*आपल्या यातनांचं छबुकलं दारिद्र्य’...*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा नामदेव ढसाळ यांचा मूळ शक्तिस्रोत आहे. ह्या केंद्रमाध्यमातूनच त्यांच्या लढ्यासाठी त्यांनी स्फूर्ती, हुरूप आणि हिंमत घेतली आहे. व्यवहारात आणि जीवनकलहात माणूस म्हणून काही स्वाभाविक तडजोडी त्यांनी केल्या असतील. पण राजकीय आंबेडकरांवर कविता होणे, हा त्या त्या वर्षाचा एक संकेत त्यांनी मानला आहे. आंबेडकर १९७८, १९७९, १९८० आणि आबेडकर १९८१ या कविता व ‘रमाबाई आंबेडकर’ ही कविता या दृष्टिकोणातून वाचली तर ढसाळांच्या वैचारिक बांधिलकीचे स्वरूप खूप स्पष्टपणे ध्यानात येते. आंबेडकर १९७८ या कवितेचा आरंभ आणि अंत इंग्रजी कॅपिटल अक्षरांनी त्यांनी केला आहे.

‘EQUALITY FOR ALL
OR
DEATH FOR ALL’

कारण हे जागतिक विश्वसत्य बुद्धाच्या आर्यसत्याइतकेच त्यांना ठासून मांडायचे आहे.

*‘हा देश नुसताच*
*एरंडासारखा वाढत राहिला*
*त्याच्या फालतू विद्रूप पानावर*
*आपण अकारण लट्टू झालो’*

हे उमगल्यामुळे डॉ. आंबेडकरांशी संवाद साधताना ढसाळ सहजपणे लिहून जातात-

*‘दहशतीपेक्षा तुझा विश्वास होता जागृतीवर*
*तुझा जागृतीचा आधार होता अभ्यास-सेवा*
*ईश्वराची तू केलीस शवचिकित्सा*
*सटवीचे कापलंस नाक*
*केलेस नकटं...’*

आणि काहीही दुर्बोध यापुढे न लिहिता पुन्हा आरंभीच्या इंग्रजी ओळीची सार्थ पुनरुक्ती करून ही कविता संपते.

आपला, आपल्या चळवळ्या लोकांचा निग्रहपूर्वक शोध घेणे हे ढसाळांच्या चिंतनाचेच एक अंग आहे. ‘त्यांनी वरून पाणी वाढलं, पडवीबाहेर बसवलं, विठोबाच्या दर्शनाला वंचित केलं, हे सगळ जुनं झालं आहे. नवं आहे ते इतकंच की’-

*‘जमाना सर्व तुझाच आहे*
*तरीही तुझे लोक दुःखी आहेत.*
*फकिराला पंतप्रधान होता येतं इथं*
*परंतु मांगा भंग्याला नाही.’*

*(आंबेडकर-८०)*

*कंठाला लंगोट्या बांधून डिंग्या मारणाऱ्या संधिसाधू अनुयायांना आपल्याच स्वबांधवांना ते कठोरपणे फटकारतात. देशाच्या सध्याच्या स्थितीचे विदारक दर्शनही घडवितात.*

*''हा भाकरीचा जाहीरनामा*
*हा संसदेचा रंडीखाना*
*ही देश नावाची आई*
*राजरोस निजते कुबेराच्या सोबत काळ होत चालला आहे कर्मठ...*
(आंबेडकर - ७९)

आंबेडकर ८१ 'ह्या कवितेत त्यांनी एक दुर्दम्य विश्वास व्यक्त केला आहे.'

*'स्वप्नांचे पडदे, टरकावून सिंहनादात सामील व्हायला*
*सज्ज आम्ही / आता भीती कोणाच्या बापाची ?'*

'रमाबाई आंबेडकर' ही तर सर्वांची आई. तिचे स्मरण व शब्दचित्र ढसाळांनी अतिशय मनःपूर्वकतेने रेखाटले आहे.

*अष्टौप्रहर ती भटीण सरस्वती साहेबांच्या मागे असे !*
*सवतीमस्तर तुला करताच आला नाही का ग ?'*
किंवा- *'डबकं चाळीतल्या राजहंसाना*
*दगडी कोळश्यांच्या धुराची*
*तू लागू दिली नाहीस झळ*

*तुझ्या मुक्यामनाची गाणी*
*कल्कीचा घोडा ह्या कलयुगात घेऊन फिरतो आहे*
*मराठी भाषेची ऐसीतैसी करत'*

आणि ह्या अशा आत्मीय भावातूनच, आत्यंतिक सलगीतूनच त्यांच्या भाषेला पडणारे पिळे आणि पैलू दृगोचर होतात. दर्शनी कधीकधी ते अस्वस्थ करतात. अप्रस्तुत वाटणारे लिहिल्याचा भास निर्माण करतात...

नामदेव ढसाळांच्या कवितेचा आलेख चैतन्यमय व रसरशीत ठेवण्याचे कार्य, त्यांच्या पुणेरी महारी बोलीतील शब्दविशेषांनी केले आहे. डेंग, डिंग्या, बोंडशी, रांड, इराखत, चौव्हाडडी, संदल, हेपलून, लेंडकं, उटपटांग, लबडब, लथ, नस्तर, बिंदचाटे, ढाबळी ह्या शब्दांची शक्ती येथे द्विगुणित झालेली दिसते.

'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता' ही शीर्षकनामाची अखेरची कविता, ज्ञानामानापासून वंचित असलेल्यांच्या बेढंग्या जीवनाचे कोडे, त्यांनी

शिक्षित सुसंस्कृतांपुढे घातले आहे. आहार- निद्रा-भय-मैथुनांच्या पशुवत् पातळीवर जगणारा वर्गच, ढसाळांच्या तोंडून, संस्कृतिसंपन्नांना उलटा प्रश्न करीत आहे. यांच्या वैफल्याचे, विपन्नतेचे, कदन्नाचे, शिवराळपणाचे कारण कोण आणि काय, हे सांग ? सांगता येत नसेल तर तू शिकलास काय ? कसे ? कुणापासून ? कशासाठी ? या प्रश्नांची उत्तरे मराठीतला मागणारा, एक अद्वितीय मानदंडच ढसाळांनी निर्माण केला आहे, मराठीचे रांडपण कमी केले आहे. तिला चैतन्याचे व सौभाग्याचे लेणे चढवले आहे. त्यांच्या कविता वाचताना, 'पिला हाऊसचा मृत्यू' नावाच्या कवितेतील ओळीच मला उद्धृत कराव्याश्या वाटतात.

*तुझ्या आयुष्याला पेलून धरणारी ही तीव्रतर साडेसाती*
*आज मलाही आनंद होतोय की तू तिच्याही पुढे*
*निघून जाऊ शकतोस,*
*मलाही असंच म्हणायचं आहे. ह्या संग्रहाबद्दल !*

*('तुही इयत्ता कंची? तुही इयत्ता...' १९८१, आंबेडकर प्रबोधिनी, या पुस्तकातील केशव मेश्राम यांच्या प्रास्ताविकामधील काही अंश)*

* * *

**आंबेडकर : १९७८**
EQUALITY FOR ALL OR
DEATH FOR INDIA
*यानंतर काहीच दुर्बोध*
*लिहायचं नाही*
*कवितिक वळणं आडवळणं*
*घ्यायची नाहीत*
*गोता खायच्या नाहीत*
*जमीन असेल नसेल*
*सरळ सरळ मुळालाच हात घालायचा*
*हा देश नुसताच*

*एरंडासारखा वाढत राहिला*
*त्याच्या फालतू विद्रूप पानांवर*

*आपण अकारण लट्टू झालो*
*लाळ गाळत राहिलो*
*तार खेळवत राहिलो*

*प्रेमाचे प्रतिदान ते देणारच नाहीत*
*ते स्वतःसाठीच एक वंचना झालेत*
*लचकन तोडावा स्वतःच्या मांसाचा गोळा*
*चक्क भळभळत ठेवावा रक्ताचा धो धो मुसांडा*

*अहंकाराने पेटलेत ते*
*विकृतीने पछाडलेत ते*
*हत्या, हिंसा, रक्तपात*
*एका अपरिहार्य दुर्गंधीने ते विटाळलेत*
*ते बनवतात प्रत्येकाला इडिपस*
*त्यांना हवीय फाळणी*
*त्यांना हवाय दंगा*
*त्यांना माणसांना बनवायचंय हैवान*
*पुन्हा एकदा माणुसकी गेलेली पाहायचीय त्यांना*
*राख आणि हाडांचे सांगाडे*
*त्यांना गायचंय स्मशानगीत*
*त्यांची माती / त्यांचा मेंदू / त्यांचं भोक*
*त्यांचा रंज / त्यांचं रक्त*

*तेच तेव्हढे आईच्या उदरातून आलेत ?*
*बाकीचे कुत्र्या-मांजरांच्या !*
*किती भ्रमात जगतायत ते*
*किती विकारांचे दास बनतायत ते!*

*लालसा आणि तहान*
*कसं कोसळत चाललंय त्यांचं मनोरथ*
*जीवनाचा त्यांनी नाकारला आहे स्वीकार*
*तोंड वर करून ते थुंकतात आभाळावर*
*आभाळ थोडंच त्यानं कलंकित होणार ?*
*काळं झालं आहे त्यांचं तोंड*
*दुसऱ्याच्या पावित्र्याची निर्भर्त्सना केल्यानं*
*त्यांचं पाप थोडंच कमी होईल ?*

*आत्ता त्यांनी थांबायला हवं*
*आत्ता त्यांनी बदलायला हवं*
*दुसऱ्याच्या डोळ्यात कुसळ शोधण्यापेक्षा*
*स्वतःच्या डोळ्यातलं मुसळ दूर सारावं*
*पुतळ्याच्या अधिष्ठानापासून*
*तू किती तरी पुढे गेला आहेस*
*देशाच्या नावापेक्षा तू किती तरी मोठा झालाहेस*
*तू कधीच उबवली नाहीस खुडूक कोंबडीसारखी अंडी*
*महाचिंतक तुझा प्रवाह*
*परिवर्तन करून गेला आहे आमच्या जीवनात*
*सत्याला आता डावलून कसं चालेलं ?*
*त्यांच्यासारखं बनायचं ज्यांचे प्राण प्रकाशित आहेत*
*त्यांच्यासारखं बनायचं- जे गर्दसावलीसारखे विश्रब्ध आहेत*
*आतला आवाज हे खरं प्रामाणिकपण*

*तू हटवादी नव्हतास*
*तुझा दृष्टिकोण विशाल*
*तू वाकवलं युगाला शेंड्यादांड्या मोडून*
*जे होतं दुष्प्राप्य, असाधारण, ते टाकलंस तू*
*आमच्या पदरात*
*तू आमच्यासमोर तळपत राहतोस*

*तू दडवलं नाहीस गुपित*
*माझं आयुष्य होतं स्फटिकासारखं स्वच्छ,*
*जे उधळत गेलं मृत्युच्याही पुढं*

*सर्व दलितांसाठी तू केंद्रपुरुष झालास*
*जे तुझ्याविरुद्ध बोलले,*
*ज्यांनी तुझ्या कामाची टिंगल केली.*
*त्यांच्यावर तू झाला नाहीस रुष्ट*
*त्यांच्या चुकीच्या भूमिकांविरुद्ध*
*तू पहाडासारखा उभा राहिलास*
*गुरुत्वाकर्षण हरवून बसलेल्या पृथ्वीच्या देहात पाय रोवून*
*जी कठोरवचनं पडली तुझ्या मुखातून बाहेर*
*त्यांचा उद्देश होता माणसांच्या मुक्तीचा*
*ज्या हृदयात तू सांठवलीस सहिष्णुता,*
*त्याच हृदयात जागवलास तू ज्वालामुखी विद्रोह*
*तुझा विद्रोह नव्हता अज्ञानी आंधळा*
*तो होता स्वतःला बदलण्याचा जग बदलविण्याचा*
*नवे डोळे, नवे हृदय*
*दहशतीपेक्षा तुझा विश्वास होता जागृतीवर*
*तुझ्या जागृतीचा आधार होता अभ्यास, सेवा*

*तुझं वागणं नव्हतं खोटं*
*तू उखडलेस मुळांसकट वटवृक्ष*
*शस्त्रे*
*तू उगारली नाहीस पोट भरण्यासाठी*
*ती उगारलीस जुलमाविरुद्ध*
*ईश्वराची तू केलीस शवचिकित्सा*
*सटवीचं कापलंस नाक*
*केलंस नकटं*
*पापपुण्याच्या / स्वर्ग नरकाच्या भाकडकथा तू*

*बुडवल्यास गटारात*
*तेहतीस कोटी बिंदचाट्यांचा तू फोदा केलास उदास*
*लावलीस पाण्याला आग*
*तुझा आवाज हुकमी*
*तुझ्या हुकूमावर कोसळायचे आकाश*
*चालायचे ऋतू जरतारी मार्ग आखीत*
*तू जगाशी भांडलास*
*विस्तवाशी खेळलास*
*वादळात तू दिलंस संगीत*
*दुःख*
*दुःखाचं कारण.*
*दुःखापासून मुक्ती*
*मुक्तीचा मार्ग*
*परित्यक्त जमिनीवरही तू लावलीस माया*
*अप्रिय व्यक्तींचा संसर्ग*
*प्रिय व्यक्तीचा विरह*
*इच्छिलेलं मिळो न मिळणे*
*या सर्वांचा अर्थ; दुःख*
*जन्माचा अर्थ; दुःख*
*म्हातारपणाचा अर्थ; दुःख*
*रोगाचा अर्थ; दुःख*
*मरणाचा अर्थ; दुःख*

*संघर्षाच्या उत्तराधिकाऱ्या,*
*ऱ्हस्व-दीर्घ गोष्टींना अन्न देणाऱ्या*
*माणसालाच तू बनवलंस पारदर्शी*
*आम्ही पाहतो प्रत्येक माणसातून पलीकडे*

*ते समजतात माणसांना ठार आंधळे*
*ते समजतात माणसांना नीच*

*ते समजतात माणसांना लाचार*
*ते माणसांच्या छायेला घाबरतात*
*ते कवच पांघरून बसतात स्वतःभोवती*
*ते स्वतःच्याच अंगावर चढवून घेतात वारूळ*
*घुसमटतात, चरफडतात, गरळ ओकतात*

(**आंबेडकर : १९७८** EQUALITY FOR ALL OR DEATH FOR INDIA)

- आणि हृदयावर कोरलेला आंबेडकर : १९७८

✶ ✶ ✶

**आंबेडकर : ७९**

*हे आर्ष चालीतले तुझे अनुयायी*
*कंठाला लंगोट बांधून डिंग्या मारतात*
*मातृगमनी यांच्या परंपरा*
*यम यमी व्यवसाय*
*हे षंढ अर्जुन कित्येक वर्षांचे*
*अक्षतयोनीला छिन्न करणारे सूर्य यांच्या रक्तात*

*खदखदणारे रसायन इथे*
*कोण टाचणीने त्याला फोडणार ?*
*हा खिन्न उदास पाऊस निघाला आहे कुठे ?*
*या शहराला कुणी आग तर लावून जाणार नाही ?*

*मरण तुझे मानले असामान्य*
*ते सामान्याच्या नजरेतून पाहिले*
*तुझ्या मरणाने शोकही झाला नाही, आनंदही*
*मरणापूर्वीचाच माणूस असतो खरा*
*बाकी नुसती धूळ आणि धुराळा.*

*मरणाच्या ठिकाणी मी प्रस्थापित करायला*
*निघालोय सौन्दर्य*

*हा भाकरीचा जाहीरनामा*
*हा संसदेचा रंडीखाना*
*ही देश नावाची आई*
*राजरोस निजते कुबेराच्या सोबत*
*काळ होता चालला आहे कर्मठ*

*मातीमोल होत चालले आहे हृदयाचले चैतन्य*
*विझत चालली आहे डोळ्यांतली हिरवळ*
*आता पूजा तरी कोणाची बांधायची ?*

✶ ✶ ✶

**आंबेडकर : १९८०**

**१**

*तू मेलास, म्हंजे संपला नाहीस.*
*आमच्यासारखाच तूही झोपलास बायकोबरोबर*
*पोरं काढली, पण वाऱ्यावर सोडली नाहीस*
*आम्ही वाढलो असे, तसे, कसेही*
*परंतु आमच्या मुलांना*
*तुझी माया डावलण्याची हिंमतच होणार नाही कधी*
*ॲकॅडॅमिशयन । टेक्निशियन । पॉलिटिशन । सायंटिस्ट*
*फिलॉसॉफर*
*हे काहीही लावतील तुझा अन्वयार्थ*
*तू जगलास फक्त माणसासारखं*
*ना त्याच्यात नाटक होतं*
*ना नाट्याविष्कार*
*ना नक्कल, ना नकलाकार*

*आता हे सर्व जुनं झालंय,*
*की त्यांनी आम्हांला वरून पाणी वाढलं*
*आता हे सर्व जुनं झालंय,*
*की त्यांनी शाळेच्या पडवीबाहेर आम्हांला बसवलं*

*आता हे सर्व जुनं झालंय*
*की त्यांनी विठोबाचे काळेपांढरे पाय*
*आम्हांला पाहू दिले नाहीत*
*आते ते आणि आम्ही सगळेच सारखेवारखे*
*या जगातला समाजवाद*
*या जगातला कम्युनिझम*
*आणि तुझंही सर्व काही*

★ ★ ★

**आंबेडकर : १९८१**
*मान्सूनसारखा येतोयस आमच्याकडे तू*
*तुला वाट करून द्यायला हवी*

*कुठे नाहीस तू ?*
*उन्हापावसात / वाऱ्यावावधानात / भूतकाळात*
*गतवेदनेत / माझ्या डोळ्यांत / भुवयांच्या इंद्रधनुष्यात*

*स्वप्नांच्या प्रतिसादाला तडाखे देत*
*हे अस्तित्वाचे कांपोझिशन उत्तुंग करत*

*तुझे शेष / तुझे अवशेष*
*तुझे अस्खलित लख्ख लख्ख प्रतिबिंब*
*ते निघालेयत छिन्नभिन्न करत*
*दहशत*
*दहशत हे तुझे नाव कसे असू शकेल ?*
*ज्ञानाच्या पानाबरोबर दिगंत आणि दुढतर होत जाणारा तू*
*क्षुद्र डोळ्यांच्या लफंग्यांनी तुला क्षितिजावरच का बंदिस्त करून टाकावे ?*
*यांना यांच्या गांडीवरचे तीळच मोडता येत नाहीत*
*उगाच शेमन्याचं तुनतुनं*
*अन बोच्याचा ताशा यांनी का करावा ?*

*अभिसरणाच्या नावाखाली ह्यांनी अंगावर चढवलेली दौलतीची पुटे*
*शेवटी राधाबाई / भिमाबाईची करुणाष्टके*
*शेवटी परड्या यल्लम्माच्या / हे चाळझोक बुलंडे*
*यांच्या पंचायती हमाल*
*हे यांचे गडगंज ट्रस्ट*
*हे याचे अष्टौप्रहर सुग्रास शिबिरी जेवण.*
*नंतर रात्रीस स्वप्नांना सुरमा घालून सुग्रास झवणं.*
*पुन्हा नव्या दिवसासाठी शुभ्र खादी भांडार सुपर स्ट्रक्चरसारखे*
*आशूक माशूक*
*स्वतःचेच क्रूस*
*स्वतःच्याच खांद्यावरून वाहून न्यायला हलकट ठरलेले हे*

*इथे अज्ञान फळू दे, फुलू दे*
*दलितांना मात्र काही न कळू दे*
*ह्या प्रेषितांच्या टाळूवर लोणी गळू दे*
*हल्ली ह्यांच्या समाजवादी पिंडांनाही कावळे शिवू लागलेत*
*ह्या कावळ्यांनी सर्व शहरच घाण करून सोडलंय*

*हे राखाडी आकाशा*
*तो आमचा सोयरा मान्सून येतोच ना आम्हांला चिंब करत !*
*हे एक्क्याऐंशी सालाचे महाद्वार त्याच्यासाठी सताड उघडे*
*त्याच्यासाठी हे हृदय / त्याच्यासाठी हे रक्त*
*त्याच्यासाठी हे प्रेम /*
*स्वप्नांचे पडदे टरकावून सिंहनादात सामील व्हायला*
*सज्ज आम्ही आता भीती कोणाच्या बापाची ?*

* * *

**रमाबाई आंबेडकर**

*राजमाचीच्या घोड्यांवर*
*सर्वच सवाष्णी बसतात*

*आपल्या त्यागाची बनारसी लुगडी वाळवीत.*
*त्यानं कधी कुणाला खाऊ घातलंय काय ?*
*साधं दुःखाचं चिरगुटसुद्धा*
*वाफेच्या इंजिनाबरोबरच चाके फिरतात गोलगोल पुढेपुढे*
*माणसाचे शापग्रस्त आरसे*
*होतात पुन्हा आरस्पानी नवे*

*आज तुझा एक अडगळीतला फोटो*
*माझ्या आठवणीत आहे*
*मरणानंतरही मरणे मेल्यावर*
*तो कोण हिरावून घेईल माझ्याकडून ?*
*एक वेळ वाळवीला वाळवी लागेल*
*एक वेळ कसरीला कसर*

*फोटो तुझा आणि तुझ्या कुटुंबाचा*
*चारचौघांच्या खटल्यासारखा*
*त्यात सर्वच आहेत, तू. तुझ्या नणंदा, जावा, दीर-*
*लष्करातले मामंजी,*
*पोरंबाळं आणि साहेब आणि टॉबी आणि निख्खळ कॅन्टोन्मेट*
*पाठीमागे झाडाझुडपांचं ग्राऊंड*

*वर्षानुवर्ष पाहत आलोय हे चित्र मी*
*साहेब तर परमेश्वराच्या छाताडावर बसल्यासारखे आजही वाटतात*
*सुपारी कातरणाऱ्या टिळकांच्या आत्म्याला त्रास देत.*
*रमाबाई, ही सर्व पुण्याई तुझी आहे.*
*त्या फोटोत फक्त तूच आहेस.*
*तुझे चरित्र / तुझ्या खस्ता*
*तुझे अश्रू / तुझे उसासे / तुझे शहाणपण*
*तुझ्या डोळ्यांतले आदिअंताला स्पर्श करणारं कारुण्य*
*तुझ्या डोळ्यांतील ती निष्ठेची काळीशार पोत*
*तुझ्या चेहऱ्यावरले ते प्रासादिक औदासीन्य*

*कृष्णहातांच्या चटक्यांच्या कहाण्या सांगणाऱ्या बांगड्या*
*किती, ग, सहन केलंस हे !*
*अष्टौप्रहर ती भटीण सरस्वती साहेबांच्या मागे असे !*
*सवतीमत्सर तुला करताच आला नाही का ग ?*

*पैसे पाठीवर घेऊन*
*पोरक्या ज्ञानेश्वराने*
*अमृताशी पैजा जिंकल्या*
*साहेबांच्या पाठीशी ऐस होऊन तू*
*गुलामांच्या उद्धाराच्या ज्ञानेश्वरीची*
*पहिली ओळ लिहायला मदत केलीस*

*डबकं चाळीतल्या राजहंसांना*
*दगडी कोळशांच्या धुराची*
*तू लागू दिली नाहीस झळ*
*भांड्याला लागणारी भांडी*
*डोक्यानं फुटणारी डोकी*
*पटकी / सटवी*
*तू चंदनाचं मूल्य केलंस कमी*
*तुझ्या मुक्या मनाची गाणी*
*कल्कीचा घोडा ह्या कलियुगात घेऊन फिरतो आहे*
*मराठी भाषेची ऐसीतैसी करत*

*हे बहिणाबाईच्या बहिणाई,*
*मरण्यापूर्वी एकदा तरी तुझे*
*गाणे ऐकवशील काय ?*
*या रांडाव मराठी भाषेला*
*पुन्हा सवाष्ण होताना पाहायचंय मला.*

✶ ✶ ✶

## या अखंड ग्रीष्मात

*या अखंड ग्रीष्मात*
*आम्ही न्याहाळतो अदृश्य ओलाजर्द चेहरा*

*जो आमचा असून*
*आमचा कधीच नव्हता*
*त्यात उसळतं कारंजं तान्हुलं*
*आम्ही पाहतो त्याच्याकडे तहानेल्या नजरेनं*
*वर्तुळाकार संध्याकाळ,*
*पुष्कळ*
*कोसळते पागल होऊन*
*त्यात पुन्हा*
*कपटी शांतता*
*होत जाते घोटीव गर्भारणीसारखी*
*हा आमच्या नव्या जन्मठेपेचा दिवस*
*आम्ही आम्हांलाच ओळखू शकत नाही अलवार*
*मरणाच्या निव्वळ भयाने*
*किती करकचून डांबून ठेवायचं*
*त्यांनी आम्हांला*
*बाहेर तारांचं कुंपण*
*आत निर्दयी भिती*
*सोबत जबरीची सक्तमजुरी*
*नुस्तं सडत जाणं*
*नुस्तं कुजत जाणं*
*आमचीच आम्हांला यायला लागली आहे किळस*
*आम्ही खायला उठलोत स्वतःला*
*किती वेळ दीर्घात नजर गुंतवायची*
*किती वेळ उभ राहायचं मेंदूच्या एकाच पायांवर*
*वादळ*
*वादळ । वादळ*
*आम्हांला व्हायचं होतं स्वार त्यावर*
*कळवा घालायचा होता त्याला*
*गुलामांच्या देवतेला करायचं व्हतं उघडंनागडं*
*काढायची होती तिची धिंड*

*उचंबळून सामील व्हायचं होतं आम्हांला*
*बलिदानाच्या उत्सवात*
*आमचा निर्वंश करायला निघालेला*
*गद्दार गांडू सूर्य*
*करायचं होतं त्याला लाचार अपमानित*
*डांबायचं होतं त्याला पाळीव जनावरांसारखं दावणीला*
*सर्कशीतल्या वाघासारख*
*नाचवायचं होतं त्याला हंटरच्या इशाऱ्यावर*

*आवळलेल्या मुठीतून*
*घरंगळत विस्कळत रहातात दुवे*
*सहजगत्या आवळले जातात फास*
*घोडे कितीही उधळले*
*तरी ते चक्राकारच फिरतात अजून*
*हा आवाज युद्धखोर टापांचा*
*की*
*भोपळ्यातल्या थेरडीच्या पावलांचा*
*निर्भर्त्सना आधी केलीच आहे तुम्ही*
*मग म्हणाना म्हणा*
*चल रे भोपळ्या टुणूक टुणूक*

*विश्रब्ध युद्धभूमी कैक पिढ्यांचं दर्द*
*शब्दांनी हरवून जायला हवंय*
*फक्त वेड्यांच्या जत्रेत*
*वेड्यांच्या,*
*हा आमच्या नव्या जन्मठेपेचा दिवस.*

✶ ✶ ✶

## गुलाबी आयाळीत घोडा

*मला स्वातंत्र्य आवडतं*
*ते छान असतं समुद्रासारखं,*
*घोडा*

*या, परिचय करून घेऊ त्याचा*
*शतकांच्या सुळावर चढताना*
*त्यानं पाहिलंय आपल्याला.*
*आपलं सर्व काही सुरू होतं त्याच्यापासून*
*उत्तरदेहाचं शेषदुःख*
*आणि*
*आत्म्याचं श्यामाक्षर*
*वासनेच्या किनाऱ्याकडे घेऊन जाणारा हा*
*ययातीचा घोडा नाही*
*आयुष्य नाही हे पुराणातल्या वांग्याचे भरीत.*
*कोण असे आहेत ते ?*
*ज्यांची वस्त्रे*
*दारिद्र्याच्या पावसाने भिजलीच नाहीत ?*
*त्याच्या चौखुरांची गुलाबद्धाही जर रंगवून*
*गेली आहे प्रत्येकाचे आयुष्य,*
*मग एवढा बवाल कशासाठी ?*
*स्वतःतल्या अश्वमेधी घोड्याला*
*दौडू द्या ना बेलगाम*
*किती निष्पाप निरागस सुंदराला आकार देत जातो तो !*
*त्यांच्या विश्वात्मक दौडीने*
*खडतराला मिळून जातो आधार*
*हरेक बीज राहते गर्भार*
*किती सुलभ होऊन जातो जीवनोत्सव !*

*वेडातच सात कशाला दौडायला हवेत ?*
*ना इथं रक्तपाताचं संमोहन*
*ना इथं महायुद्धाचा नरसंहार*
*या रे या रे वासरांनो*
*राजरोस ठोका यावर मांड*
*याच्या चौफेर वावराने फुलात भरतो प्राण*
*दुःखी आयुष्यात वारा वाजवतो वासरी*

*मौसमांचा होऊन जातो मोर*
*आणि अश्रूंचे मोती*
*गुलाबी आयाळ : गुलाबी डोळे*
*गुलाबी शेपटी : गुलाबी खूर*
*हा धावतोय*
*दिशान्त.*

★ ★ ★

**दंगल**

*स्वतःचीच सावली*
*खायला उठते स्वतःला*
*जखम धरत नाही खपली*
*तिचं नुसतं वयच वाढतं*
*काळ्या वसंताचं उद्‌घाटन*
*करून जातात डोळे*
*होते निर्भर्त्सना*
*सजीव प्रेताची*
*हेही किती थोर !*
*प्रवाहाच्या उलट पोहत जाणं*
*अखेरचा आघात होईल*
*सल्तनतीवर*
*थांबा, वाट पाहा*
*तिच्या तख्ताच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होताना*
*रात्र आहे मुकी*
*वस्तीही*
*सन्नाट शांतता ज्वालामुखीला*
*करू पाहते आहे मोनी*
*ही अनोळखी चंद्रहाक*
*थरारून सोडते लाव्ह्याला*
*ही घुसळण समुद्राची*
*ही घुसमट हृदयाची*

*हे रक्त बांध तोडून सुसाट तर धावणार नाही ?*
*वस्ती पाहते आहे*
*आपणांकडे दुर्लब होऊन*
*तिच्या निर्ममतेला कधी वाचा फुटेल ?*

*रक्तपात पाहिला, की*
*माणूस माणसासारखा वागायला लागतो*
*माणसं चिलटासारखी मरायला लागली, की*
*माणसाला माणसांची किंमत कळते*
*दंगल एक शहाणपण शिकवून जाते*
*माणसांना*
*दंगल एक दर्दभरी कविता ऐकवून जाते माणसाला*
*आपण टाळ्या वाजवा.*
*आणि म्हणा, वन्समोअर / वन्समोअर !*

✶ ✶ ✶

## जनरल वॉर्ड

*देव : माणसाने मारलेली एक अस्खलित थाप*
*डॉक्टर : माणसाने मारलेल्या हाकेला मिळालेले सहीसही उत्तरं*
*हे प्रस्थापित शब्दांनो,*
*तुम्हाला झाला आहे अभिजातपणाचा अर्धांगवायू*
*तुमची वळून गेलेली तोतरी*
*तुमच्या फिरलेल्या नजरा*
*हे शब्दांनो, या ना इथे जनरल वॉर्डात*
*अरे, ह्या नुसत्या खाटा नाहीत !*
*या शोकान्तिका सुखान्तिका अब्जावधी*
*हे कथांचे नायक ! अधिनयाक*
*ही खलनायकांची खलबते*
*ह्या दर्पणासारख्या बोलणाऱ्या बांगडी मैना !*
*ह्या सिस्टर । ह्या नर्सेस*

*हे वॉर्ड-बॉय । हे परीट, न्हावी*
*हे मेहतर । ह्या आया*
*हे ग्लुकोज । हे सलाईन*
*ह्या निदानग्रस्त लॅबोरेटऱ्या*
*हे उतरले जाणारे एक्स-रे कर्माधर्माचे*
*ह्या बी कॉम्प्लेक्स, ह्या झोपेच्या गोळ्या*
*हे सर्व वातावरण*
*ही सगळी रांगडी माणसे*
*ह्याच्या मनाच्या जागा डेटॉलने धुतलेल्या*
*हे जन्माचे घाण धुणारे कुशल*

*हे शब्दांनो, या ना इथे विश्रांतीला*
*पायांना चक्रे बांधून चिकार वणवण केलीत*
*जरा याही धडधडणाऱ्या हृदयाला पाहून घ्या ना /*
*जरा याही पुत्रवती वृक्षाच्या छायेत बसून घ्या ना /*
*जरा याही धमणीचा रिदम ऐकून घ्या ना /*
*कदाचित तुमच्या वांझ गर्भाशयाला पालवी फुटेल*

*आज कोणालाही विमुक्ती नाही*
*आज नोंदीलाही मृत्यू नाही*
*आज गंभीराचा खाट क्रमांक नाही*
*हे अभिजात शब्दांनो,*
*कदाचित आलात आपदग्रस्त होऊन*
*तर तुमच्याही जखमांवर सन्तुरी मोरपिसांची*
*साय पसरेल*
*अरे, ह्या*
*हेन्स ॲंडरसनच्या कथानकातल्याही पऱ्या*
*अलगद हळुवार वावरतात इथं थुई थुई /*
*एक call of the valley ची जुगलबंदी*
*शहरातल्या अनाथ आयुष्यांना सनाथ करणारी.*

★ ★ ★

## गोची

*आपण / आपले नावगाव / वगैरे होऊ लागते / झूठ*
*आपलेच अवयव / आपल्यावर होऊ लागतात / रुष्ट*
*तेव्हा मोठी गम्मत होऊ लागते*
*आपण होऊन जातो दिलहवाल*
*ओळखीचे रस्तेसुद्धा आपल्याला चक्करमध्ये टाकतात.*
*लडबड आणि शरीराचे सर्वच ध्वनी*
*आपल्या साडे तीन इंची उदात्तीकरणाला गांगरून टाकतात*
*आपले होऊन जाते छानदार कोडे*

*आपण म्हणू लागतो*
*गोची, गोची, हुप*
*तुझ्या शेंडीला शेरभर तुप !*

*खिजवलेल्या वानरासारखे आपण आपल्यावर*
*दात विचकतो*
*आणि भेदरलेल्या पोरांसारखी आपली धांदल उडून जाते*

*ढाबळीवर नाराज झालेली कबुतरं*
*दाण्यापाण्याच्या गोष्टीत /*
*माना मोडून अडकून पडायचं नाकारतात /*
*त्यांना अंतरंगात तरी किती बांधून ठेवायचं ?*
*त्यांना अंतरंगातले दाणेच वेचायला जर आला असेल कंटाळा,*
*तर त्यांनाही कधी मधी द्यावं सैल सोडून*
*आणि राजीखुशीनं करून घ्यावी*
*आपलीच दाणादाण*
*तिन्ही काळ सप्तपाताळ*
*कोलॅप्स होण्यातदेखील गंमत असते !*
*आयुष्याच्या दांडीवर*
*किती वेळ ताटकळत उभे राहायचे ?*

*धड मावळतीही नाही ! धड उगवतीही नाही !*
*तरीही म्हणायचं,*
*सुसरीण बाय,*
*सुसरीण बाय,*
*तुझी पाठण मऊ !*

✶ ✶ ✶

## मेंदूच आपल्या

*मेंदूच आपल्या सर्व आज्ञा माघारी घ्यायला लागलाय*
*आणि तो तर मुठीत प्राजक्ताची फुले घेऊन तिला*
*शोधायला निघालाय*
*हां हां म्हणता दुनियेला ही उलटून टाकायला निघालेली तरफ*
*आज आपल्याच थुंकीवर मालकी नाही तिची*
*चक्रवर्ती किंवा तद्दन*

*हे दुनियेचे अंतरंग*
*हे दुनियेचे आंतरविरोध, हा धुमसणारा गदारोळ*
*ही निर्वस्त्र सोलून पडलेली अगतिक आयुष्ये*
*हे रक्तवृक्ष थिजून गेलेले*
*हे सर्वत्र पसरलेले शुभ्र पर्वतप्राय दिगंत*
*ही साळिंद्रासारखी रेखलेली झाडे*
*भाळावर*
*हे कान पडलेले ओझ्याचे लंगडे गाढव.*
*चाललेले दुडूदुडू मंझिलकडे.*

*स्वतःच्याच अंतरंगात खडा टाकून*
*शांत स्थितप्रज्ञ झालेला हा वारा*
*हे क्षितिजरेषेवर झुलणारे झाड*
*त्याची किरणे डोळ्यांना लुसणारी*
*हे माझ्या गहिवरत्या मानवता-वाद्यांनो.*
*आता ऊटपटांग होऊ द्या तुमच्या दयेचं नागडेपण*

*हे तुमच्या दयेचं बूमरँग*
*तिच्या लावण्यवती डोळ्यांना अधू तर करून जाणार नाही ना ?*
*माणसाच्या देहातील उष्णताच असते प्रचंड क्रूर*
*ज्यात जळून जातात, मेंदूच्याही ताब्यापलिकडील*
*फिनिक्स*
*आणि एक लोढणे*
*इच्छेला रांगत ठेवते.*

* * *

### माझ्या दफनविधीची गोष्ट

*अखेर केलेतच ना दफन माझे ?*
*खात्री करून घेतलीत ना*
*मी मेलोय, वगैरेची ?*

*मातीआड दुःख शीतल*

*वेड्यांनो, मला असं*
*एकटं टाकून गेलात ?*

*आता हळूहळू माझा*
*मृतदेह सडत सडत जाईल,*
*नंतर कुजून कुजून*
*फटकन फुगा फुटेल*
*नंतर किड्यामुंग्यांची वर्दळ वळवळ*
*वगैरे*
*नंतर साजूक मांसखत*
*माझ्याच घाणीचा वास*
*मलाच घ्यायला लावलात तुम्ही*
*छान, छान !*
*किती नाकावर*

*रुमाल धरु ?*
*किती तोंडावर*
*बोट ठेवू ?*

*आपण सर्वांचेच*
*उत्तरजायित्व मानतो,*
*खासेच्या आत मी*
*खासेच्या बाहेर तुम्ही*
*या पावसात*
*माझ्या खासेला जरतारी*
*बनवणाऱ्या कलावंत गोगलगाया*
*त्यांच्या चिजेला*
*दाद द्यायला तरी*
*जमेल ना तुम्हांला ?*
*अरे, हो,*
*पण तुम्हांला मसणवट्यात*
*यायला वेळ तर मिळायला*
*हवाय ?*
*तुम्ही कसे छान गुंतला*
*असाल संसाराच्या रगाड्याला*

*तुमच्याच जिवंतपणाच्या*
*प्रदूषणाला तुम्हीच हुंगू*
*शकणार नाहीत*
*फक्त आठवणीत राहील*
*तुमच्या मैला मैलाच्या दगडांवर*
*मुतत जाणारे*
*एक गावठी कुत्रे.*

*('तुही इयत्ता कंची? तुही इयत्ता...'१९८१, आंबेडकर प्रबोधिनी,*
*या पुस्तकातील काही अंश)*

या लोकशाहीत जातीयता पाळली जाते. राजकीय क्षेत्रातही इथे जात आडवी येते.

*''जमाना सर्व तुझ्राच आहे*
*तरीही तुझे लोक दुःखी आहेत*
*फकिराला पंतप्रधान होता येतं इथं*
*परंतु मांगा भंग्याला नाही.''*

१९७६मध्ये 'प्रियदर्शिनी' हा संग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर जवळ-जवळ पाच वर्षांनी 'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला.

'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता' या काव्यसंग्रहात या देशात दारिद्र्य का वाढते आहे? झोपड्या का वाढतात? स्त्रियांची अब्रू का लुटली जाते? एकाही प्रश्नाचे उत्तर हा समाज कवीला देऊ शकत नाही. अज्ञानी असूनदेखील ते सुशिक्षित समाजाला 'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता' असा सवाल करतात. डॉ. आंबेडकरांना कवी म्हणतात की, तूच आमचा दलितांचा खरा कैवारी होतास. शिक्षणाचा, सत्तेचा वापर तू आमची स्थिती सुधारण्याकरिता केलास. तुझा विद्रोह आंधळा नव्हता. तू ज्वालामुखीच होतास. जग बदलवण्याकरिता तू देहशक्तीपेक्षा जनसामान्यांच्या जागृतीवर जास्त लक्ष दिलेस. तुझ्या अनुयायांनीही परंपरेचाच उदोउदो केला. त्यांनीच तुला बदनाम केलेले आहे.

*''हा भाकरीचा जाहीरनामा*
*हा संसदेचा रंडीखाना*
*ही देश नावाची आई*
*राजरोस निजते कुबेराच्या सोबत*
*काळ होत चालला आहे कर्मठ*
*मातीमोल होत चालले आहे हृदयातले चैतन्य*
*विझत चालली आहे डोळ्यातली हिरवळ*
*आता पूजा तरी कोणाची बांधायची?''*

आम्हाला या दारिद्र्यातून, या अंधारातून मार्ग दाखवणारा एकही पुढारी दिसत नाही.

कवी म्हणतात की, सूर्य एकदा पहाटेला विसरेल, एखाद्या दिवशी तो

उगवणारच नाही. नदी आपले वळण विसरेल, पण दारिद्र्य आम्हांला सोडणार नाही. आमची भूक कधीच पूर्ण होणार नाही.

*''भूक*
*आज आमच्या घरात एकही दाणा नाही*
*आज आमच्या घरात एकही शहाणा नाही*
*भूक*
*अंतःकरणातल्या शेवटच्या दिव्यापर्यंत गायले, तर*
*भुकेचा दिवा मालवेल काय?*
*भूक, तुझा शृंगार और*
*तुझ्याशिवाय कुठलीच अवदसा येत नाही*
*आमच्या वाट्याला*
*भूक तुला जर भोगता आलं नाही*
*गर्भार ठेवता आलं नाही*
*तर आत्महत्या करावी लागेल आमच्या*
*जथ्याला*
*भूक आमचा एक्का पक्का*
*छक्क्यांच्या संगीताबद्दल आम्ही कशाला*
*बोलू?*
*आमचा पुरुषार्थ तुझ्या समोर आहे*
*बघ कोण जिंकतं - तू की आम्ही''*

आम्ही तुला नष्ट केल्याशिवाय राहणार. आमचे दारिद्र्य आम्हीच नष्ट करू. आम्ही कमकुवत नाही, हे आम्ही तुला समूळ नष्ट करून दाखवून देऊ. दारिद्र्याचा चोथा संथपणे चावणारा भेंडीबाजार. या बाजारातील छोटे-छोटे धंदे करणारे कामगार, मजूर ज्यांनी आपले नशीब काळाच्या दगडावर कितीदा तरी घासून पाहिले, पण कोळशासारखे ते कितीदाही उगाळले तरी काळेच राहिलेले.

येथील संतांनी फक्त टाळकुटेपणाच केला. त्यांना दलितांचे दारिद्र्य कधी दिसलेच नाही. कवी ज्ञानेश्वरांच्या ओवीवर अपभ्रंश करतात. तिला वास्तवाची फोडणी देतात.

*''पैल तो गे काऊ हागताहे*

*अपशकुन गे माये सांगताहे''*
*''अंगावर चिमूटभर मांस असावं लागतं गरिबांच्या*
*मग लागावं अभंगाबिभंगाच्या नादी''*

अभंग, ओवी करायला पोट भरलेलं असावं लागतं. उपाशी पोटी दारिद्र्याच्या खस्ता खात ते होत नाही.

*''शब्दासारखे इथे मरणदेखील आले आहे भरून*
*बस्स, थोड्या वेळात इथे सरी कोसळू लागतील*
*कामाठी पुरा*
*सर्व मौसमांना बगलेत मारून*
*तू फसलास चिखलात*
*या छिनाल सुखदुःखाच्या पलीकडे जाऊन*
*मी पाहतो वाट तुझी कमल होण्याची*
*चिखलातील कमळ.''*

कामाठीपुरा ही वेश्यांची वस्ती. इथे रात्री दिवस उगवतो. पोटासाठी मनाला होणाऱ्या जखमा विसराव्या लागतात, शरीर विकावे लागते.

कवी भांडवलदारांना रक्त पिणारे डास म्हणतो. मधून-मधून ते दयावंतपणाचा आव आणतात, पण मुळात ते रक्तपिपासू लांडगे आहेत. त्यांचे अंतःकरण कोरडे आहे. नामदेव ढसाळ हे ज्या जगात जगले ते शहरी जीवन आहे.

शहरात कारखाने, मोठमोठ्या गिरण्या वगैरेंमुळे कामगार आणि भांडवलदार असे दोन वर्ग पडलेले. शहरातील झोपडपट्टीत राहणारे कामगार, मजूर यांचे दरिद्री जीवन त्या वास्तवाचे चित्रण कवी फार भेदकपणे करतात. ढसाळ शहरातील जीवन, त्या जीवनाची विविध अंगांनी होणारी पिळवणूक व्यक्त करतात.

## आर्थिक विद्रोह

या देशात सर्वांत जास्त प्रभाव जर कशाचा असेल तर तो जातिव्यवस्थेचा. ग्रामीण जीवनातील अर्थव्यवस्था ही जातिमूल्यांशी बांधलेली आहे. खेड्यात श्रीमंतीला महत्त्व नसते. त्या माणसाच्या

जातीला महत्त्व असते. शहरात जातीय पातळीवरच्या प्रश्नापेक्षा आर्थिक पातळीवरचे शोषण मोठ्या प्रमाणात आहे. वेश्यावस्तीत स्त्रियांचे होणारे शोषण हेही शहरातच आर्थिक स्वरूपाचेच असते. उदा. कोठीच्या मालकिणीकडून आणि मधल्या भडव्यांकडून होणारे आर्थिक शोषण याचेच उदाहरण होय. पोट भरण्याकरिता त्यांना शरीर विकावे लागत असते. इथे प्रामुख्याने भूक पोटाचीच असते. सर्वात श्रीमंत महार असेल तर तो श्रीमंत म्हणून ओळखला जाणार नाही. त्याच्याकडे समाज महार म्हणून तुच्छतेने बघेल. आर्थिक शोषणाविरुद्धचा विद्रोह हा आर्थिक विद्रोह होय.

नामदेव ढसाळ हे शहरातील असल्यामुळे त्यांच्या कवितांमधून प्रामुख्याने आर्थिक स्वरूपाचा विद्रोहच व्यक्त होतो. त्यांच्यासमोर जे वास्तव होते ते शहरातील झोपडपट्टीचेच जीवन होते. अशा स्वरूपाचा आर्थिक विद्रोह ढसाळांपूर्वी मार्क्सवादी कवितेतून व्यक्त झालेला आहे.

### ‘मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले’

‘मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले’ या काव्यसंग्रहात प्रामुख्याने वर्गविग्रहच साकार झालेला आहे. खेड्यापाड्यांत अजूनही माणसाला जातीनुसार ओळखले जाते. स्पृश्य स्त्रीवर प्रेम करणे हादेखील गुन्हा समजण्यात येतो. ते प्रेम व्यक्त करता येत नाही. चुकून एखाद्या अस्पृश्याने स्पृश्य स्त्रीवरील प्रेम व्यक्त केले तर त्याच्या घरादारावर नांगर फिरवला जातो. ह्या समाजात माणूस आणि लूतभरल्या कुत्र्यात काही फरक केला जात नाही. या जन्मी अस्पृश्याचे जीवन जगावे लागत आहे. कारण गेल्या जन्मी कुठले तरी पाप केलेले असणार. वर्तमानाविषयी कोणी पोटतिडकीने बोलत नाही. पुढच्या जन्माकरिता हा जन्म वाया घालवायला हेच या संस्कृतीने शिकवले.


*‘‘या देशात आपण देखील पाण्यासारखे ओतलो गेलो होतो*
*कुंभाराच्या चाकासारखे गर्गर फिरतोय आपण’’*

चातुर्वर्ण्याच्या चाकाभोवती आपण गरगरा फिरवले जात आहोत.

कवी म्हणतात, आम्हाला समतेवर आधारित नवी समाजरचना हवी. आम्हांला माणूस म्हणून जगायचे आहे.

*''आमच्या मनाचा कल हा*
*मानवाच्या सर्वंकष मुक्तीचा आहे.*
*खरंच आम्हांला उठवलंय एका जगमान्य इच्छेने*
*खरंच आम्हांला इच्छा झालीय शोषकांच्या*
*रक्ताने रंगलेले आमचे पंजे सन्मानाने मिरवायची''*

आमचे पूर्ण आयुष्य आम्ही मानवाची मुक्ती करण्याकरिता खर्ची घालू. या समाजाने माणसाला जातीच्या बंधनात बांधले आहे. ज्या जातीच्या पिंजऱ्यात तो जन्माला त्यातच त्याला तडफडून मरावे लागत आहे.




*''पकडून चार भिंतीच्या*
*पिंजऱ्यात मला अडकवून ठेवलंय*
*माझा गुन्हा काय ते सांगू शकत*
*नाही मला.''*

माणसाची या अंधारातून बाहेर निघण्याची धडपड कुठल्याही मानवतावाद्याला दिसत नाही. पण आता आम्हीच क्रांतीच्या मार्गाने या देशात समता स्थापू, असे ढसाळ आत्मविश्वासपूर्वक सांगतात.

*''भूतकाळाबद्दल तो बोलत नाही*
*वर्तमान त्याचा चालला आहे संकटांनी खदखदत*
*खोलीतल्या खोलीत लोळतोय त्याचा*
*बंदीवान विद्रोही देह*
*घेतो आहे टक्करा, स्वतःत घरंगळतो आहे दाही दिशांना*
*तो पुन्हा स्वतःला सावरतो, नसानसांत*
*वादळवारा भरतो तो सनातन*
*गुलामीचा इतिहास सांगतो''*

अंधारातून बाहेर काढण्याकरिता कुणीही मदत करीत नाही. रात्रंदिवस या अंधारात भिंतीआड आमचे पूर्वज पिचले गेले. त्यांनी या परिस्थितीतून

बाहेर निघण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. तुम्ही असेच राहा, असे ते सांगत आले.

*''न्याय आणि व्यवस्थेचा गंध नसलेली*
*रात्रंदिवस रक्त ओकून म्हातारी झालेली आमची आजी*
*तिने आम्हांला आधुनिक राक्षसाच्या*
*गोष्टी सांगितल्याच नाहीत''*

अस्पृश्याचे लाचार जगणे काही तक्रार न करता आमचे पूर्वज जगले; पण आम्ही जगणार नाही.

*''एक दिवस असा येईल की*
*धुमसत राहणारे हे जेलपक्षी*
*तुरुंगच घेऊन उडून जातील*
*उडून जातील''*

ज्याने या अत्याचाराविरुद्ध आवाज काढला, तो नष्ट केला जातो.

*''विद्रोही मुहूर्तावर जर त्यानं दिला हिसका साखळीला*
*असह्य होऊन तोडू घातलं बंधन तर त्याला घातली जाते गोळी*
*भर रस्त्यात वाजवले जातात नगारे सर्वंकष स्वातंत्र्याचे''*

माणसात आणि कुत्र्यात काही फरकच नाही, असे कवी म्हणतात. कुत्र्याला साखळदंडांनी जखडले तर माणसाला जातीने-

*''स्वातंत्र्य, समता, बंधुत्व*
*खाजगी मालमत्तेच्या कायद्यापुढे सर्व सारखे*
*खाओ पिओ खुश रहो जहन्नममें जाओ*
*अहा किती अजब हे युग अंधार युग*
*आपण जमतो चहापुरते, भिडवतो कपाला कप, बशीला बशी''*

पण मनात मात्र कायम असते की हा कोण? आपण कोण? अस्पृश्यता सप्ताह साजरे केले जातात. पण ही समानता.

*''मांसात रुजेना, रक्तात मिसळेना, फुलेना, फळेना''*

ढसाळांच्या कवितेत स्त्री ही त्यांच्या प्रत्येक कृतीला सहपाठी म्हणून अवतरते. दलित कवितेत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समजण्यात येते. त्यांचे समाजातील स्थान गौण नाही, हे त्यांच्या मनावर बिंबविण्यात येते.

*''मुक्यानंच घेतलंस पिढीजात सतीचं वाण*

*ल्यालीस सवाष्णीचं लांबलचक लेणं*
*हयातभर जोडत ऱ्हायलीस ठिगळं हृदयाला*
*जगण्याच्या इभ्रतीला, अंगवस्त्राला, घरादाराला*
*आई तुला कळलंच नाही कधी*
*या देशात किंमत नाही स्त्रीला, शूद्राला, कष्टकृत्याला, भूमिहीनाला''*

आजपर्यंत स्त्रीने अत्याचार सहन केले. या अत्याचाराविरुद्ध कधी तक्रार केली नाही. रूढी, परंपरेचे ओझे जन्मभर काही न बोलता वाहिले आई, तू पण अशीच कुजत, मन मारत जगलीस.

*''या दीर्घ वर्षांमधल्या छळवणुकीवर तू कसा*
*सहजासहजी पडदा टाकलास?*
*सांगशील का मला या छळवणुकीची कारणं?*
*उद्भव मीमांसा?*
*आयुष्यभर तू सोशीत ऱ्हायलीस आणि अद्याप*
*तू शरण जाते आहेस व्यवस्थेला''*

आई, तू जशी गेंड्याची कातडी ओढून गप्प राहिलीस, तसे मला गप्प बसवत नाही. तू मला नाउमेद करू नकोस. मला तुझ्या निष्ठेची गरज आहे.

आपल्या काळ्या-सावळ्या लाडक्या मादीसही कवी हेच सुचवतात की,

*''तू आता स्त्री स्त्री म्हणून राहिली नाहीस*
*मी आता पुरुष पुरुष म्हणून राहिलेलो नाही*
*नर आणि मादीच्या कल्पना या युगातच कशा*
*पायदळी तुडविल्यात*
*तू माझी दासी नाहीस, मी तुझा राजा नाही*
*आपण कॉम्रेड आपण प्राणांतिक साथीदार''*

स्त्री ही अबला नाही की बाजारू वस्तू नाही. माझ्या या क्रांतीच्या मार्गातील तू सोबती आहेस.

*''चावडीसमोर कुजत पडलेला शस्त्रांचा साठा*
*प्रिये उचल त्यातला एक, मी ही उचलतो चल*
*आता तू काळी-सावळी लाडकी मादी राहिलेली नाहीस*
*ह्या विषमतेच्या प्रचंड देशात तू व्हिएतनामी योद्धी झालीयस''*

''ज्याला व्यवस्थेने तीन हजार वर्षे ज्ञानास, उत्पन्नास, संपत्तीस, मानवप्रतिष्ठेस वंचित केले, अशा सर्वहारा दलित वर्गाचा मी कवी आहे'' असे ढसाळ 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' ह्या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत स्वतःची भूमिका स्पष्ट करताना सांगतात. कोंबडी जिवानिशी जाते, पण खाणाऱ्याला ती वातडच लागत आहे.

*''आपल्याला नुस्तं पोट आहे नी त्याच्यात भूक*
*भुकेनी जीव कासावीस झालाय*
*नी देहाला आग लागलीय*
*आपल्याला गरिबी दिसते नी देणारा दिसत नाही*
*चळवळीच्या ओघानं ज्यांची नैसर्गिक वाढ होते*
*ते आपणच होत''*

या देशात समता नाही. या समाजव्यवस्थेला ही विषमता दिसत असूनही तिकडे डोळेझाक करतात. आपलं जीवन असं फसफसत वाया जाणार, अशीच आपली पिळवणूक होत राहणार, जोपर्यंत आपण त्यांच्या अन्यायाविरुद्ध पेटून उठणार नाही. शोषक आणि शोषित हे आयुष्याचे दोन भिन्न मार्ग आहेत. ते दोन मार्ग कधीही एक होऊ शकत नाहीत, असे विदारक सत्य कवी सांगतात. कोणी कितीही प्रयत्न केले तरी हे दोघे एकत्र होऊ शकत नाहीत.

*''हे दोन रस्ते असतात परस्परविरोधी*
*त्यांना नियम असतो वर्गयुद्धाचा लागू*
*एक रस्ता भूकमरी आणि लाचारीचा, तडजोडीचा आणि स्वतःला विकण्याचा''*

विषम समाजातील अंधार नष्ट करण्याकरिता सूर्य न्यायला आलोय. आम्ही असे दारिद्र्यात का खितपत पडतोय? ही परिस्थिती आणण्यास कोण कारणीभूत आहे? बेकार का वाढतात? या प्रश्नांकडे समाजाला लक्ष द्यायला वेळ नाही. न्यायव्यवस्थाही पैसेवाल्यांची रखेली आहे.

'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' या काव्यसंग्रहात ढसाळ पूर्णपणे मार्क्सवादी विचार मांडतात - ''मी माझ्या वर्गीय हिताच्या दृष्टीने कविता आणि राजकारण ह्या दोन परस्पर विभिन्न गोष्टी राहिलेल्या नाहीत.''

*''अफूची गोळी झाली आहे संसदीय प्रणाली*

*किसनांची नि कॉम्रेड्सची होते आहे हत्या*
*अहिंसावादी शासन झाले आहे हिंसेची*
*देवता, गावांची बनवली जातायत मैदाने*
*आई-बहिणींच्या इंद्रियांचे तोडले जातायत लचके*
*उपटले जातायत अंकुर आदिवाश्यांच्या देवदत्त*
*शेतातून दम नयंत्रणेच्या जात्याखाली*
*भरडले जाताहेत जनतेचे सैनिक''*

जनतेच्या खऱ्या पुढाऱ्यांची इथे हत्या केली जाते. अन्यायाविरुद्ध आवाज उठवल्यास तो चिरडला जातो. लष्करातही जात आडवी येत आहे. चिलीमध्ये पाब्लो या कंगालांच्या हितांचे संरक्षण करणाऱ्या कवीची हत्या घडून आली. आमच्यातूनही आम्ही निवडून दिलेले ढोंगी सुधारकही पार्लमेंटची हवा लागल्याबरोबर आमचे संरक्षक बनण्याऐवजी आमच्या हिताचे भक्षक बनतात. आपल्या स्वार्थाकरिता ते जनतेच्या हिताचा गळा दाबतात. त्यांचे नैतिक वजनही समाजात नसते.

*''एक लोकप्रतिनिधी होता*
*निवडून आला तेव्हा त्याला आधार आमच्या*
*अठराविश्व दारिद्र्याचा होता*
*पार्लमेंटमध्ये काही काळ काढल्यानंतर*
*तो आमचा राहिला नाही.''*

*''जनता ही क्रांतीचे प्रमुख हत्यार आहे*
*आपण हत्याराचा विश्वास संपादन केला*
*पाहिजे.*
*आपण त्यागास आणि बलिदानास तयार*
*असले पाहिजे*
*उत्पीडित जनतेच्या भल्यासाठी आपण*
*हत्यारबंद झाले पाहिजे.*
*जेव्हा जेव्हा आपण हत्यार टाकले*
*तेव्हा तेव्हा आपल्या कत्तलीच झाल्या''*

जनता ही क्रांतीचे हत्यार आहे.

*''कामगार बंधो*
*तुझे घामेजलेले स्नायुबद्ध चित्र मी माझ्या*
*कवितेत प्रतिमेसाठी वापरतो*
*माझ्या कवितेला सप्राण करतो*
*तिचा आणि तुझा सन्मान करतो*
*मला माहिताहे की लढू शकतोस गुलामगिरीविरुद्ध*
*मला माहिताहे की तूच मूठमाती देऊ*
*शकतोस भांडवलशाहीला*
*मला माहिताहे की तूच वितरणासाठी वापरू*
*शकतोस शासनयंत्रणा*
*तुझा मी स्तुतिपाठक भाट*
*त्यांच्या लेखी मी देशद्रोही आणि गुन्हेगार*
*ते वल्गना करताहेत माझ्या घरावरून नांगर फिरवण्याची*
*ज्या हिटलरचं थडगं तू बांधलंस*
*त्या थडग्याचा ह्या कुत्र्यांना विसर पडलाय.''*

साम्राज्यवाद्यांना नष्ट करण्याकरिता क्रांती हे एक प्रभावी हत्यार आहे. त्यांच्या रक्ताने भरलेले आपले पंजे आपल्याला पाहायचे आहेत. क्रांती म्हणजे मार्क्सला अभिप्रेत असलेली रक्तरंजित क्रांतीच त्यांना अभिप्रेत आहे. 'गोलपिठा' पेक्षा 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' या काव्यसंग्रहातील कवितेत ते पूर्ण मार्क्सवादी बनलेले आढळतात. 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शिनी' या काव्यसंग्रहात पंतप्रधान इंदिरा गांधी यांची स्तुती करतात. तुझं चरित्र लिहायला मी इथे बसलेलो नाही किंवा मी तुझा स्तुतिपाठक भाट नाही. एका व्यक्तीवर कविता लिहिणं मला आवडत नाही. कारण मी सर्वहारांचा कवी आहे. पण तुझी शासनयंत्रणा गरिबांचे कल्याण करणारी आहे. म्हणून तुला मी माझ्या कवितेपासून दूर ठेवू शकत नाही, असे कवी प्रियदर्शिनीला म्हणतात.

*''जोन ऑफ आर्कच्या वृक्षाखाली*
*जेव्हा बागडत होतं तुझं*
*साजरं सगुण बालपण*

*तेव्हा मांडलेल्या भातुकलीच्या खेळात*
*बाहुल्यांनादेखील करायला लावलास*
*सत्याग्रह साम्राज्यशाहीच्या विरोधी*
*नि झोकून दिलंस*
*मेन स्ट्रीटमध्ये तू तुझं बालपण.''*

तुला स्त्री म्हणून नीच लेखणारे सर्व तुझे शासन बघून गप्प आहेत. प्रियदर्शिनी, तू आमच्यावर झालेल्या अत्याचारांचा समाचार घे.

**'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शिनी'**

कवी प्रियदर्शिनीला सांगत आहेत, प्रियदर्शिनी हा विसाव्या शतकाचा उत्तरार्ध आहे. माणसाला फक्त भुकेचाच एक प्रश्न आहे, असे नाही. भुकेचा प्रश्न बाजूला ठेवून आम्ही येशूच्या चेहऱ्याशी बुद्धाच्या चेहऱ्याची तुलना केली.

सनातनी समाजाने आम्हांला हद्दपार केले, आमच्या पंगतीला कुत्रे-मांजरे बसविले. पशुहून हीन जगणे आमच्या माथी मारले.

*''आम्ही जगलो पशूच्या संगतीनं*
*काय आणि कस्सं लिहू''*

कवी हतबल होऊन विचारतात. आजपर्यंत परमेश्वराने आम्हांला आश्वासन दिले होते की, चंद्र-सूर्य मिटतील, आभाळ फाटेल आणि मी पाप्यांचा समाचार घ्यायला अवतरेन, पण-

*''निर्णयाच्या वेळी मात्र तो आपलं काळ करायला*
*जेव्हा त्याची अपार शक्ती आम्हांला उद्‌ध्वस्त करून*
*जायची तेव्हा आम्ही करायचो त्याचा धावा*
*भडवा वाटेवरून खाली उतरून कधीच आला*
*नाही आम्हापर्यंत दुडूदुडू चालत''*

आमच्या आई-बहिणी नागवल्या गेल्या तो आक्रोश या ईश्वराला कधी ऐकू गेलाच नसेल काय? पाण्यावाचून तडफडून मेलेल्या जिवाचे दुःख सांगू की, रयतेची सेवा करताकरता मेलेल्या बापाच्या यातना सांगू?

*''ज्या संस्कृतीत अस्पृश्य असणं होतं विलक्षण पाप*
*त्याबद्दल किती लिहू डार्विन आणि प्लेटोबद्दल*

*महारवाडा आणि मांगवाड्याबद्दल*
*वरळीला पेटलेल्या ठिणगीचा ज्यांनी खून पाडला*
*ज्यांनी शहीद भागवत जाधवच्या*
*कधी न झुकणाऱ्या शिरावर धोंडा घातला*
*ज्यांनी नारनवरेला दगडांसाठी कापला*
*ज्यांनी गवई बंधूंची तेजस्वी बुबळं फोडली*
*किलावेमानी नि हाथीगड''*

असे अत्याचार. कुठल्या अत्याचाराबद्दल लिहू?

*''रक्तात पेटत तुटलेली आग आता विझता विझत नाही*
*दिवसेंदिवस ती धगधगतेच तृणांच्या पात्यांमधून*
*दगडधोंड्यांतून''*

आता हा अन्याय पुरे झाला. कित्येक दिवस ही घोर नाकेबंदी सहन करायची? असे अत्याचार किती दिवस डोळे मिटून बघत रहायचे? प्रियदर्शिनी, तूच आता या परिस्थितीतून बाहेर काढू शकतेस.

*''प्रियदर्शिनी तू आहेस*
*आमच्या इतिहासातील एक पेज''*
*''जायला हवंयस स्वच्छ नजरेनं समोर*
*नि द्यायला हवंयस माणसांच्या स्वातंत्र्याला गाढ आलिंगन*
*सर्वंकष स्वातंत्र्याची वेळ आली आहे जवळ''*
*सर्वंकष स्वातंत्र्याची वेळ आली आहे जवळ*

जर तू आमचे स्वातंत्र्य आम्हांला परत देणार असशील तर आम्ही तुझ्या पाठीशी सदैव आहोत. प्रियदर्शिनी, तू हे आमचे स्वातंत्र्य आमच्यापर्यंत आणण्यास आम्हांला मदत करू शकतेस. कारण तू खरी मानवतावादी आहेस.

*''प्रियदर्शिनी तू जागृत रहा*
*रात्र वैऱ्याची आहे*
*जर सैल सोडलास लगाम*
*नि वाकडं पडलं चुकून पाऊल*
*तर माणसांचे दुष्मन येतील सत्तेवर*
*आणि तुझ्या अगोदर ते*

*फासावर चढवतील जनतेच्या कवींना''*

'प्रियदर्शिनी' ही दीर्घ कविता त्यांनी भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर लिहिली. त्यांची शासन व्यवस्था कशी गरिबांकरिता, दलितांकरिता राबवते आहे, याचे वर्णन कवीने यात केलेले आहे. कवी प्रियदर्शिनीला आजपर्यंत आणि अजूनही दलितांवर जे अत्याचार होत आहेत ते सांगत आहे आणि तू या अत्याचाराविरुद्ध पेटून दलितांच्या बाजूने या युद्धात भाग घे, असेही सांगत आहे. अभिजातवाद्यांनादेखील आमचे दुःख दिसले नाही. त्यांनी घरात गादीवर लोळत सोन्याच्या काडीने दात कोरत 'भूकबळी'वर कविता लिहिल्या. आमच्या दुःखाची वर्णने ऐकून रसिकांनीपण त्यांना दाद दिली, व्वा! काय छान! काय कलात्मकतेने कवीने दुःख साकार केले म्हणून कलात्मकतेमुळे रसिकांना आानंद झाला, दुसऱ्याचे दुःख बघताना वाचताना ह्यांना आनंद होतो. आमचे दारिद्र्य आजपर्यंत परमेश्वरही नष्ट करू शकला नाही. आमचे बालपणदेखील भुकेच्या विवंचनेत गेले. खेळण्याच्या वयात आम्ही दोन घास पोटाला मिळावे, म्हणून वाटेल ती कामे केली.

*''जेव्हा आमचं बालपण हातात*
*खुळखुळ्याची काठी घेऊन नि माथ्यावर टोपलं घेऊन*
*रानावनातून ढेकळा-ढेकळांतून*
*पांदीपांदीनं रुळल्या वाटेनं*
*भाकरीच्या तुकड्यासाठी करायचं वणवण*
*हाळी द्यायचं*
*जोहार येस्कराला भाकर येऊ द्या मायबाप''*

## राजकीय विद्रोह

माणसाची प्रगती जेव्हा रोखली जाते, तेव्हा माणूस विद्रोही बनतो, माणसाच्या मनातील असंतोष विद्रोहाच्या रूपाने व्यक्त होतो. जेव्हा माणसाच्या विकासाआड शासनयंत्रणा येते, तेव्हा त्याविरुद्ध व्यक्त केलेला विद्रोह म्हणजे राजकीय विद्रोह होय. विद्रोह प्रामुख्याने सत्ताधाऱ्यांविरुद्धच असतो.

''मी माझ्या कवितेला वर्गीय हत्यार मानतो आणि माझी कविता

जेव्हा हत्याराची भूमिका घेते, तेव्हा माझ्यासमोर माझे शत्रू आणि मित्र अशी वर्गवारी करण्याची निकड निर्माण होते'' असे ते आपल्या 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात.

दलितांना त्या स्वातंत्र्यापासून काय मिळाले? त्यांची स्थिती तीच आहे. त्यांची ही स्थिती सुधारणारा एकही जनतेचा पुढारी नाही. स्वातंत्र्य मिळाले, सुराज्याचेही झाड लावले जात आहे, पण दलितांची पिळवणूकही सुरूच आहे. देशात भूकबळी वाढत आहेत, खेड्यापाड्यातून जातीयतेचे बळी जात आहेत. स्त्रियांची अब्रू लुटली जात आहे. दलित चारही बाजूंनी पिळला जात असताना तो स्वातंत्र्याला आपले कसे म्हणेल?

ढसाळ 'गोलपिठा' या काव्यसंग्रहात मार्क्सवादी भूमिका घेतात. रक्तरंजित क्रांतीद्वारे हे मूठभरांचे शासन उलथून पाडून सर्वहारा जनतेचे शासन स्थापण्याची विद्रोही भाषा बोलतात. 'गोलपिठा' नंतर 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' मध्येही ते पूर्णपणे मार्क्सवादी विचारसरणीचा पुरस्कार करतात. पूर्वीच्या दोन संग्रहांत ते लोकशाही नकोच असे म्हणतात. तर इथे लोकशाहीची स्तुती करताना आढळतात. 'तुही इयत्ता कंची'मध्ये परत ते जनतेच्या हिताचे रक्षण करणारा एकही पुढारी नाही, आम्ही कुणाची पूजा बांधावी असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विचारतात. ढसाळांची राजकीय संदर्भातील मते ठाम नाहीत. पण त्यांनी शासनव्यवस्थेचे वास्तव वर्णन केलेले आहे.

### 'गोलपिठा'


माणुसकीची मूल्ये पायदळी तुडविणारी अर्थव्यवस्था ढसाळ नाकारतात. झोपडपट्टीतील अंधार कुणाला दिसलाच नाही. या वस्तीत राहणाऱ्या माणसालाही काही स्वप्ने असतात. त्यांची दुःखे कुणाला दिसलीच नाहीत. त्यांची परिस्थिती सुधारावी, असे तुम्हाला वाटत नाही?

*''उषाकिरणच्या पायथ्याशी महारोग्यासारख्या*
*सांडलेल्या झोपड्या*
*आईबाप नसलेल्या पोरांसारख्या खडतर :*
*अगर खडीफोड खोल.''*
*''अगर त्यांचं पितळच उघडतं उन्हाळ्यात,*

*पावसाळ्यात, हिवाळ्यात त्यांची शरीरेच किळस*
*किळसलेली एकमेकांजवळ स्त्री-पुरुष''*

पोटाकरिता बाप आपल्या मुलीला धंदा करायला लावतो. वेश्या बनवतो.

*''माझा देहोदय मी मांडलाय रस्त्यात*
*आणि भिरभिरताहेत माझ्या काळजात*
*कुणी तरी हगून ठेवलेली ओयासिसं*
*उघडझाप चालूहे*
*झाडे सादळलेली*
*जणू पसरले चौखुर दवदारी''*




ढसाळांच्या कवितेत स्त्री अवतरते ती दारिद्र्यात पिचलेली, पोटाकरिता वेश्येचा धंदा करणारी, स्त्री-पुरुषांच्या रोमॅन्टिक रिलेशनला इथे कवडीचीही किंमत नसते.

*''बीनखोलीचा माणूस फिरविला जावा शहरभर तसा मी*
*तुमच्या उंचावत जाणाऱ्या हाडीव्रणावर सपटलोशन*
*तुम्ही माझ्या आया व्हा*
*तुमच्या फदफदत्या कुशीत मला निवारा द्या''*

तुमचे होणारे शोषण मी पाहतोय. पण आता तुमचे शोषण करणाऱ्यांचाही नाश जवळ आला आहे. ज्या समाजव्यवस्थेने तुमची ही अवस्था केली तिचाच कर्दनकाळ झालेला आहे.

महाज्ञानी लोक आमच्या चाळीतून मशाली घेऊन दारिद्र्य कुठे आहे ते शोधतशोधत उंदीर मरतात. कवी त्यांना परखडपणे सांगतात की, आमचा उद्धार आता आम्हीच करून घेऊ.

*''ज्यांना आपल्या गांडीखालचाच अंधार कळत नाही*
*त्यांनी पेटलेल्या माणसांना*
*छप्पन टिकली बहुचकपणा*

*अजूनही दाखवावा''*

आमच्या अंधाराच्या आयुष्यात बाबासाहेबांनी सूर्याची किरणे आणली. सूर्यप्रकाशामुळे आम्हांला या नरकयातना दिसायला लागल्या. ज्या व्यवस्थेने कामगारांचे, दलितांचे हे हाल केले, ती समाजव्यवस्थाच ती उलथून पाडण्याची भाषा बोलतो. ज्या श्रमिकांच्या रक्तावर तुमचे किल्ले उभारले त्या श्रीमंत भांडवलदारांना कवी शिव्या देतो. विषमतापूर्ण समाजव्यवस्था कवीच्या एकाही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देत नाही.

*''आता आम्ही कत्तलखोर होत आहोत*
*घर सोडतांना दरवाजेही नेत आहोत*
*तुझ्यावरून रणगाडे सरकवित आहोत*
*थूः तुझ्यावर, तुझ्या वस्तू थूः थूः थूः*
*आम्ही आभाळ*
*आम्ही। आभाळ। आम्ही।''*

*देशा तुझ्या या घाणेरड्या संस्कृतीवर तुझ्या विषमतापूर्ण समाजव्यवस्थेवर थू.*

आपण अनाथ आहोत, पोरके आहेत, या समाजव्यवस्थेने आपल्याला दारिद्र्याशिवाय काहीच दिलेले नाही ही पोरकेपणाची भावना ढसाळ आपली जन्मकहाणी सांगताना व्यक्त करतात.

*''लीक झालेला सूर्य*
*विझत गेला*
*रात्रीच्या मिठीत*
*तेव्हा जन्मलो मी*
*फुटपाथवर*
*चिलबटलेल्या चिरगुटांत*
*आणि झालो अनाथ*
*मला जन्म देणारी गेली*
*आकाशीच्या बाप्पाकडे*
*फुटपाथी भुतांच्या त्रासाला कंटाळून*
*लुगड्यातला अंधार धुण्यासाठी*
*आणि फ्यूज उडालेल्या माणसासारखा*

*मी वाढत राहिलो*
*रस्त्याच्या विष्ठेवर''*
*अशा रस्त्यावर पैसे मागत मी जगलो.*

'स्त्रीकडे वा निसर्गाकडे पाहणारे ढसाळ रोमँटिक दृष्टिकोन स्वीकारीत नाहीत, त्यांची दृष्टी वास्तववादी आहे. आपल्या भोवतीच्या वास्तवाची भयानकता ते व्यक्त करतात. त्यांच्या भोवतालचे जग जठर, प्लीहा, हाड, मांस यांचा हिशोब ठेवणारे भिकारी, वेश्या, दादा, भडवे, कामगार जे दारिद्र्याने पिचले आहेत त्यांचे आहे. अर्धपोटी राहिल्याने आतड्यात कोटी कोटी विंचू कसे चावतात, ह्या यातना भोगणारे ते जग आहे. ढसाळ आपल्या समोर असलेल्या वास्तवाचेच वर्णन करतात.

स्वातंत्र्य मिळाले पण त्या स्वातंत्र्याला दलितांच्या लेखी काही महत्त्व नाही. दलितांना स्वातंत्र्य मिळालेच नाही. भूकबळी, बेकारी, झोपडपट्ट्या सतत वाढतच आहेत.

*''स्वातंत्र्या*
*तू सर्वांच्या डाळरोटीवर पसर गूळखोबरं*
*मी तुझ्यासोबत फायपीस बेलबॉटम*
*विकासून हाडकी हाडवळा पुन्हा हाक मारतोय*
*तू ये आणि आमचा विकास घडवून आण''*

जनसामान्यांमधून निवडून दिलेले व निवडणुकीपूर्वी दलितांचे कैवारी स्वतःला म्हणवतात तेही निवडून गेल्यानंतर स्वतःचे पोट भरण्याव्यतिरिक्त काहीच साधत नाहीत. कवी स्वजातीच्या पुढाऱ्यांबद्दलही नैराश्य व्यक्त करतात. ढसाळांच्या 'गोलपिठा'तील विद्रोह आंधळा नाही, ते निव्वळ भांडवलदार, सामंतशहा व श्रीमंतांचेच पितळ उघडे करीत नाहीत तर आपल्याच जातीतील सत्तालोलुप पुढाऱ्यांचेही पितळ उघडे पाडतात.

लोकशाही लोकांच्या कल्याणाकरिता असे म्हणतात, पण ही लोकशाही हुकूमशाहीच आहे.

*''कॉम्रेड*
*ही लोकशाही नाहीए*
*ही विटंबना सतरा पिढ्यांची मूग गिळून पोसलेली*
*हा प्रकाश नाहीए*

*हा पिंजर पिळवणुकीचा*
*आतडी सुजलीयत ना सुजू देत, सडू देत,*
*झडू देत*
*लोकशाहीत सात्त्विकतेने जन्म दिला जातो*
*त्यांना*
*पायाखाली भूमी चोरून*
*पसरविल्यात पपयीच्या बिया या नाझी*
*लावण्यवतीने आपल्या पृष्ठाखाली''*

या लोकशाहीत पशू आणि माणूस यांना एकसारखेच वागवले जात आहे. कॉम्रेड आता हा अत्याचार थांबवलाच पाहिजे. वर्षानुवर्ष एका पक्षाची राजवट जाते, दुसऱ्याची येते पण जनतेची परिस्थिती काही सुधारत नाही. आता तरवडाची भाजी खाऊन त्यावर पोटभर पाणी ढोसूनढोसून जीव विटलाय, उपाशीपोटी दातातील 'चीख' गिळण्याचा आता कंटाळा आला.

*''काम्रेड उठा, आता तरी जागृत व्हा*
*आणि ही लोकशाही नेस्तनाबूत करण्याचे*
*उपाय योजा*
*आपण सर्व नव्या अस्तित्वाचे चितारी लढारी*
*हा आपल्या उमेदीचा लाँगमार्च*
*पालीची अंडी उबवू देत साम्राज्यवाद्यांना*
*मुतणाऱ्या पालीचा शुभशकुन आपल्या*
*आरमारी अंगांना''*

कॉम्रेड नाउमेद होऊ नका. आपल्या मानवमुक्तीचा स्वातंत्र्याचा हा लाँगमार्च सतत सुरू ठेवा. सत्ता मिळवण्याचे प्रयत्न चालूच ठेवा, खंड पडू देऊ नका. ही लोकशाही हटवण्याकरिता मजूर, कामगार, दलित, स्त्रिया सर्वांना कवी एकत्रित येण्याचे सांगतो आहे.

❖❖❖

# ‘नामदेव ढसाळ यांची कविता’ या पुस्तकाला वसंत पाटणकर यांनी लिहिलेली प्रस्तावना!

नामदेव ढसाळ यांच्या कवितेवर प्रस्तुत अभिलेख (मोनोग्राफ) तयार करताना विविध स्वरूपाच्या प्रश्नांना सामोरे जावे लागले. पहिली गोष्ट म्हणजे या कवितेचे वाचन करताना, तिचा अर्थ लावताना तिच्या संदर्भातील अवघडपणा वेगवेगळ्या प्रकारे अनुभवला. ‘गोलपिठा’ या त्यांच्या पहिल्या संग्रहातच विशिष्ट क्षेत्रातील अनेक शब्द, वाक्प्रयोग अनेकांप्रमाणे मलाही परिचित नव्हते ते ज्या क्षेत्रातील आहेत त्यातील शब्दही वस्तुतः नेहमीच्या कोशांमध्ये समाविष्ट व्हावयास हवेत. परंतु याबाबतीतील सोवळेपणा आणि अज्ञान यांमुळे ते घडले नाही. याप्रमाणेच असे अनेक कोश असावयास हवेत. दुर्दैवाने या शब्दांचा अर्थ त्यामागील संकेत मराठीत उपलब्ध असलेल्या कोणत्याही कोशामध्ये नाहीत.

मराठीमधील विशिष्ट संदर्भातील निषिद्धता लक्षात घेता त्यांचे वेगवेगळ्या परिचितांना अर्थ विचारत काही कवितांची वाट शोधावी लागली. एवढे करूनही काही शब्दांचा वा शब्दप्रयोगांचा नेमका अर्थ मिळणे अवघड झाले. अशावेळी ते सोडून देण्याखेरीज दुसरा पर्याय नव्हता. त्यामुळे एकूण कवितेचा सूर, आसपासचे संदर्भ लक्षात घेऊन त्या अनुरोधाने अर्थनिरूपण केले.

ढसाळांच्या कवितेतील विशिष्ट जीवनक्षेत्रांतील शब्द, संकेत, कल्पना तसेच तिची विशिष्ट प्रकारची अवघड वाटावी अशी घडण इत्यादी गोष्टींमुळे तिचे आकलन करून घेणे. तिचा अनुभव घेणे, तिचा अन्वयार्थ लावणे हे जिकिरीचे काम होते. ते आव्हान मला पेलले असे मी म्हणणार नाही. परंतु तरीही वेगवेगळ्या प्रकारे प्रयत्न करत राहिलो. अनेक परिचितांना, संबंधिताना विचारत राहिलो. असे म्हणता येईल की, वेगवेगळ्या प्रकारे प्रयत्न करताना शेवटी कविताच आपल्याकडे

येण्याच्या वाटा दाखवत असते. अशा सगळ्याच नसल्या तरी काही वाटा या कवितेनेही दाखवल्या.

ढसाळांच्या कवितेबाबत प्रत्ययाला येणारी ही दुर्बोधता अनेक प्रकारची आहे. ते व्यापक अर्थाने मानववादी परंपरेतील असले तरी त्यांच्या कवितेवर आधुनिकवादी काव्यशैलीचा सखोल संस्कार झाला आहे. त्यांच्या थोडे पुढेमागे असलेले अरुण कोलटकर, दिलीप चित्रे प्रभृती कवीही आधुनिकवादी काव्यपरंपरेत लेखन करत होते या कवींशी ढसाळांचे असलेले स्नेहाचे संबंधही प्रसिद्ध आहेत.

साहजिकच या कवितेचे आकलन करून घेणे, तिची चर्चा, विश्लेषण करणे सहज शक्य नाही. विशेषतः त्यांच्या पूर्वार्धातील कवितेबाबत हा प्रत्यय अधिक येतो. त्यांच्या उत्तरार्धातील कविता ही तुलनेने अधिक आकलनसुलभ आहे. आकलनाच्या संदर्भात येथे बऱ्यापैकी अवघडपणा असला तरी पुन्हा पुन्हा वाचताना या कवितेपर्यंत पोहचण्याच्या काही वाटा थोड्याफार प्रमाणात सापडत होत्या. सारे काही अशक्य आहे, अशी स्थिती नव्हती.

काही व्यक्तिगत गोष्टींचा उल्लेख करावयास हवा. कवी नामदेव ढसाळ यांच्याशी माझे जवळपास साधारणपणे १९७२-७३पासूनचे संबंध होते. खटाववाडीच्या मौज प्रकाशन गृहाच्या प्रा. राम पटवर्धनांच्या कार्यालयात आमची पहिल्यांदा भेट आणि ओळख झाली. ते त्या वेळी या कार्यालयात अधूनमधून येत असत. त्या विशिष्ट वयातील आमचे हे संबंध असल्यामुळे ते साहजिकच अरेतुरेचे संबंध होते. ते तसे नंतरही अखेरपर्यंत अरेतुरेचेच संबंध होते. मात्र नंतरच्या काळात वेगवेगळ्या कारणांमुळे हे संबंध फारसे वाढू शकले नाहीत, घनिष्ठ होऊ शकले नाही. याउलट ते अखेरपर्यंत कमीअधिक प्रमाणात तणावाचेच होते.

ढसाळांचे आणि श्री. पु. भागवतांचे संबंध केव्हा तरी याच काळात बिनसले ते नेमक्या कोणत्या कारणामुळे, का बिनसले ते तेव्हाही ठाऊक नव्हते आणि आजही नाही. सत्यकथेत प्रकाशित होणाऱ्या कवितांच्या संदर्भात काही तरी घडले असावे, हा माझा केवळ अंदाज आहे. मी प्रा. भागवतांचा विद्यार्थी असल्यामुळे तेव्हापासून म्हणजे साधारण ७३-७४ पासून ते माझ्याशी अंतर ठेवून वागत-बोलत असल्याचे जाणवले.

त्याचे या वर उल्लेखिलेल्या कारणाखेरीज अन्य कोणतेही कारण मला तरी परिचित नाही. हे दोघेही हयात असताना वेगवेगळ्या कारणामुळे यासंबंधी प्रश्न विचारणे शक्य नव्हते, शक्य झाले नाही. आता तो प्रश्नच येत नाही.

ढसाळ आणि माझ्यामधील तेव्हापासून असलेल्या अघोषित संघर्षामुळे त्यांच्या कवितेवर काही भाष्य करणे, लेखन करणे जोखमीचे वाटत होते. त्यामुळे एक महत्त्वाचा कवी ही जाणीव असूनही त्यांच्या कवितेवर लिहिण्याचे धाडस होत नव्हते. अगदी आत्तापर्यंत ते अनेक प्रकारे टाळत गेलो. दुर्दैवाने आता त्यांच्या मृत्युनंतर काही काळाने हा बृहद्‌लेख लिहीत आहे. हा लेख लिहिताना ढसाळ हयात असते तर खूपच समाधान वाटले असते.

१

*किती भयाण अरण्यातून प्रवास करावा लागतो. कवीच्या मेंदूला आफ्रिकेतली काही वाळवंटे आणि लॅटिन अमेरिकेतील घनदाट जंगले भुताखेतांच्याही संचारापलीकडची श्वापदं त्याला करावी लागतात सहन.*

नामदेव ढसाळांच्या कवितेची पार्श्वभूमी कोणती आहे. ते पाहायला हवे. त्यांच्या लेखनाच्या प्रारंभकाळात, विसाव्या शतकाच्या सातव्या आणि आठव्या दशकांत भारतात, महाराष्ट्रात वेगवेगळ्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळी मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. या चळवळीच्या वातावरणात त्यांची कविता लिहिली गेली आहे आणि त्याबरोबरच वाढली आहे.

साहजिकच या चळवळींचा परिणाम ढसाळांच्या जीवनदृष्टींवर व काव्यदृष्टींवरही झाला आहे. ही या कवितेची परंपरा आहे. विद्रोहाच्या व्यापक अर्थाने या परंपरेचे नाते जोतिबा फुले, केशवसुत यांच्यापासून ते मर्ढेकर, मुक्तिबोध यांच्यापर्यंत दाखवता येते. मात्र विद्रोहाच्या नेमक्या अर्थाने साठनंतरच्या कवितेच्या सर्वच पिढीशी ढसाळांचे नाते असलेले दिसते. कारण येथे मूलतः राजकीय, सामाजिक-सांस्कृतिक विद्रोहा-बरोबरीनेच साहित्यिक, कलात्मक अशा पातळ्यांवरील विद्रोहही अभिप्रेत आहे. यांमध्ये कोणत्या गोष्टीला प्राधान्य आहे, ते ठरवणे अवघड आहे.

ढसाळ ज्या काळात कविता लिहीत होते. त्या वर उल्लेखिलेल्या

काळात, म्हणजे साधारणपणे एकोणीसशे सत्तरच्या आसपास महाराष्ट्रात आणि देशभरात परिवर्तनाच्या अनेकविध चळवळी क्रियाशील होत्या. वेगवेगळ्या प्रकारे वंचित व शोषित असलेल्यांच्या या चळवळी, संघटना होत्या. डावे-उजवे मार्क्सवादी, याप्रमाणेच अन्य विचारांच्या अनेक संघटना, कामगार, शेतकरी, आदिवासी, दलित, स्त्रिया, ग्रामीण व इतर शोषित यांच्यामध्ये क्रियाशील असलेल्या दिसतात. या संघटनांतर्फे जीवनातील वेगवेगळ्या प्रश्नांवर, समस्यांवर वेगवेगळ्या प्रकारचे छोटेमोठे लढे उभारले गेले. प्रामुख्याने शासनव्यवस्था, प्रस्थापित समाजव्यवस्था व तिच्यातील मूल्यव्यवस्था यांविरुद्ध हे लढे होते.

ढसाळ हे सामाजिक-सांस्कृतिक आणि राजकीय चळवळींमध्ये प्रारंभापासून क्रियाशील कार्यकर्ते होते. सामग्री उपलब्धीच्या अभावी आणि त्यांच्या संदर्भात सततचे होणारे बदल अशा वेगवेगळ्या कारणांमुळे त्यांची राजकीय कारकीर्द सलगपणे, क्रमशः सांगणे अवघड आहे. (निदान प्रस्तुत लेखकाला). परंतु स्थूलमानाने त्यांचा कार्यकर्ता म्हणून कोणकोणत्या विचारसरणींशी संबंध आला. हे थोडक्यात सांगता येईल. ढसाळांच्या प्रारंभी त्यावेळीच्या प्रजासमाजवादी पार्टीशी आणि नंतर समाजवादी पार्टीशी क्रियाशील संबंध होता. त्यानंतर त्यांचा संबंध मार्क्सवादी चळवळीशीही आला. ते महाराष्ट्रातील विविध दलित चळवळींशी प्रत्यक्ष संबंधित होते.

रिपब्लिकन पार्टीविषयी असमाधान असलेल्या, त्यांच्या राजकारणाला, कार्यपद्धतीला कंटाळलेल्या दलित तरुणांचा मोठा गट पार्टीपासून दूर गेला. त्यांनी दलित पँथर या जहाल व आक्रमक संघटनेची स्थापना केली. ढसाळ या पँथर्सपैकी एक होते. मात्र पुढे अंतर्गत मतभेदांमुळे पँथरचीच अनेक शकले झाली. त्यातूनच ढसाळांच्या मार्क्सवादी, डाव्या विचारांच्या प्रभावाखाली असलेल्या स्वतंत्र पँथरची स्थापना झाली. प्रारंभी डाव्या प्रभावाखाली असलेल्या ढसाळांचे पुढे काही कट्टर उजव्या विचारसरणीच्या पक्षांशी, संघटनांशीही निकटचे संबंध आलेले दिसतात. त्याविषयी अनेकांनी सखेद आश्चर्यही व्यक्त केलेले दिसते.

व्यापक अर्थाने नामदेव ढसाळांच्या कवितेचे कूळ आणि मूळ पाहिजे असेल तर ते या विशिष्ट काळात निर्माण झालेल्या अनेकविध सामाजिक-

सांस्कृतिक-राजकीय चळवळींमध्ये जसे पाहावे लागते तसेच ते कलेच्या, साहित्याच्या क्षेत्रात निर्माण झालेल्या परिवर्तनाच्या चळवळींमध्येही पाहावे लागते. त्यांच्या कवितेतील सामाजिक-सांस्कृतिक विद्रोहाची जाणीव जर ताणायची झाली तर ती कर्ममेळा प्रभृतीच्या मध्ययुगीन संत कवितेशी आणि आधी म्हटले त्याप्रमाणे आधुनिक काळातील केशवसुत प्रभृतींच्या कवितेतील विद्रोहाशी जोडता येईल. परंतु असे नाते हे ताणूनच जोडावे लागेल. फार तर या विशिष्ट परंपरेशी त्यांचे काही प्रमाणात नाते आहे, असे म्हणता येईल.

ढसाळ यांच्या कवितेतील विद्रोहाचे नाते आधुनिक काळात, म्हणजे साधारणपणे एकोणीसशे साठनंतर निर्माण झालेल्या काही गोष्टींशी जोडावे लागेल. या काळात कला-साहित्याच्या क्षेत्रात निर्माण झालेली एक महत्त्वाची चळवळ ही अनियतकालिकांची चळवळ होती. एकोणीसशे साठच्या आसपास ही चळवळ मराठी आणि अन्य भारतीय भाषांमध्ये साधारणपणे एकाच वेळी सुरू झाली आणि तिचे मूळ, तिची तत्त्वज्ञानात्मक बैठक प्रखर विद्रोही मानल्या गेलेल्या पाश्चात्त्य बीट चळवळीत आहे. याचा अर्थ या चळवळीला व्यापक असे जागतिक पातळीवरील अधिष्ठान आहे.

प्रस्थापित, प्रचलित सामाजिक-सांस्कृतिक, राजकीय आणि कला-साहित्य यांच्या व्यवस्थांना, परंपरांना, मूल्यांना नकार देणे, विरोध करणे हे बीट चळवळीचे मुख्य उद्दिष्ट होते. साहजिकच या चळवळीच्या प्रभावाखाली असलेल्या मराठीतील आणि इतर भारतीय भाषांतील अनियतकालिकांच्या वा लघुनियतकालिकांच्या चळवळींचेही ते मुख्य उद्दिष्ट होते. अनियतकालिकांच्या चळवळीमधील हा प्रस्थापितविरोध, प्रचलित व्यवस्थांना दिलेला तीव्र नकार मुख्यतः कलेच्या, साहित्याच्या माध्यमांतून आविष्कृत झाला आहे.

बीट चळवळीचा, त्यामुळे तिचीच निर्मिती असलेल्या लघुनियतकालिकांच्या चळवळीचा विवेकबुद्धीला/तर्काला, म्हणजेच रीझनला तीव्र विरोध असलेला दिसतो. त्यामुळे याबाबतीत या चळवळीचे कलाक्षेत्रातील आधुनिकवादाशी कमीअधिक नाते असलेले दिसते. आधुनिकवादातील दुर्बोधता हीदेखील विवेकबुद्धीला नाकारणारी आहे.

अनियतकालिकांचा मराठी साहित्यावर जो काही परिणाम झाला आहे, त्यामध्ये दुर्बोधता हा महत्त्वाचा घटक आहे. मराठी कवितेतही मर्ढेकरोत्तर काळापासून विशेषतः साठनंतरच्या कवितेत दुर्बोधता ठळकपणे दिसून येते. वस्तुतः नामदेव ढसाळ हे मानववादी धारणेचे, व्यापक अर्थाने विवेकनिष्ठेला महत्त्व देणारे कवी आहेत. परंतु अनियतकालिकांच्या चळवळीमार्फत त्यांच्यावरही काही वेळा विवेकविरोधाचा आणि त्यामार्फत दुर्बोधतेचा प्रभाव पडला आहे. त्यामुळे प्रारंभी उल्लेखिल्याप्रमाणे त्यांच्या कवितेत सुरुवातीपासूनच कमी-अधिक प्रमाणात दुर्बोधता पाहायला मिळते.

एक गोष्ट अर्थातच नमूद करायला हवी की, मराठीतील अनियतकालिकांच्या चळवळीतील भालचंद्र नेमाडे, अशोक शहाणे, चंद्रकान्त पाटील, प्रभृती लेखककवींची बंडखोरी मुख्यत्वे साहित्यक्षेत्रापुरतीच मर्यादित होती. मात्र या चळवळीतील तुळसी परब, सतीश काळसेकर असे काही मोजके लेखक-कवी साहित्याबरोबरीनेच प्रत्यक्ष राजकीय-सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय होते. नामदेव ढसाळ हे त्यांपैकी एक होते.

ढसाळ अनेक सामाजिक-राजकीय चळवळीबरोबरीनेच या प्रस्थापित साहित्य परंपरा, साहित्याची मूल्ये व प्रमाणके यांना विरोध करणाऱ्या अनियतकालिकांच्या चळवळीशीही जवळून संबंधित होते. त्यांनी अनेक अनियतकालिकांमध्ये लेखन केले. एवढेच नव्हे तर आधी म्हटले त्याप्रमाणे त्यांनी स्वतः 'विद्रोही' हे अनियतकालिकही काही काळ चालवले. याबरोबरीनेच एका गोष्टीचा उल्लेख करायला हवा की, अनियतकालिकांच्या या चळवळीच्या काळात सर्वच साहित्यप्रकारांमध्ये अनेकविध प्रयोगांना बहर आला होता. कवितेच्या क्षेत्रात तर ही प्रयोगशीलता अधिक ठाशीवपणे दिसते. एकूणच अँव्हा गार्द साहित्याचा हा काळ म्हणता येईल. ढसाळांच्या लेखनाचा प्रारंभच या काळात झाला होता. त्यांच्या कवितेतील प्रयोगशीलतेचे नातेही या सर्व काळाशी त्यातील अनेकविध बदलांशी आहे.

याबरोबरीनेच विसाव्या शतकाच्या सातव्या दशकात निर्माण झालेल्या दलित कवितेचा, एकूणच दलित साहित्याचा प्रवाह हाही अनेकविध

स्वरूपाच्या सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक चळवळीचाच परिपाक होता. सातव्या दशकात शोषितांच्या चळवळींसोबत दलित चळवळीही जोमाने क्रियाशील असलेल्या दिसतात. दलित साहित्य हे चळवळीचे साहित्य म्हणून या प्रारंभीच्या टप्प्यापासूनच ओळखले जाते. कार्यकर्ता आणि कवी या दोन्ही दृष्टींनी ढसाळ या चळवळींचाही एक अविभाज्य भाग होते.

अनियतकालिकांच्या चळवळीनंतर लगेचच दलित साहित्याची चळवळ सुरू झाली. अनियतकालिकांच्या चळवळीप्रमाणेच ही चळवळही प्रस्थापितविरोधी होती. त्यामुळे स्वाभाविकपणेच या चळवळीतील अनेक लेखककवींचे अनियतकालिकांतील लेखककवींशी प्रायः सख्यत्वाचे नाते होते. अर्थात, काही बाबतीत त्यांच्यामध्ये तात्त्विक स्वरूपाचा विरोधही होता. परंतु या विरोधाची स्पष्ट जाणीव येथे होतीच असे नाही. दलित चळवळीमधील अनेक लेखककवी अनियत-कालिकांमध्येही लिहीत होते. दलित साहित्यिकांचे हे साहित्य स्थूलमानाने परिवर्तनवादी होते. या साहित्याच्या स्थूलमानाने पहिल्या पिढीतील लेखक-कवींमध्ये केशव मेश्राम, दया पवार, वामन निंबाळकर, ज. वि. पवार, प्रल्हाद चेंदवणकर प्रभृती अनेकांची नावे समोर ठेवता येतील. थोडे पुढेमागे असलेले नामदेव ढसाळ हे या पहिल्या पिढीतील कवींपैकीच एक होते.

सारांश, ढसाळांच्या प्रारंभीच्या बंडखोर आणि वेगळ्या कवितेला अनियतकालिकांच्या चळवळीची तसेच दलित साहित्याच्या चळवळीची पार्श्वभूमी होती. या वेगवेगळ्या लढ्यांमधून, चळवळीमधून ढसाळांच्या कवितेला प्रेरणा व बळ मिळाले आहे. त्यांच्या प्रारंभीच्या कवितेतील आक्रमक, तीव्र, जळजळीत भाषा आणि क्रांतिकारक, जहाल जाणिवा यांमागे तत्कालीन वातावरणातील जिवंत, धगधगीत असलेल्या अनेकविध चळवळी व लढे आहेत. हे लक्षात घ्यायला हवे. त्याचबरोबरीनेच लगतच्या काळात, झालेले, होऊ घातलेले बदलही पाहायला हवेत. साधारणपणे विसाव्या शतकाच्या आठव्या, नवव्या दशकांमध्ये या बहुतेक परिवर्तनवादी चळवळी विझून गेल्या होत्या. हा विचारसरणींच्याही अंताचा काळ मानला जातो.

ढसाळांच्या नंतरच्या कविता पाहता त्यांच्या काव्य व्यक्तिमत्त्वात

काही आंतरिक बदलही होत असावेत, असा अंदाज करता येतो. याच दरम्यान भारतात येऊ घातलेल्या वा आलेल्या उत्तर आधुनिक वादामुळे आणि त्यांचेच हे रूप असलेल्या खाजगीकरण, उदारीकरण, तसेच जागतिकीकरण यांमुळे हे सर्वच विद्रोही वातावरण लुप्त होत चालले होते किंवा नष्ट झाले होते. यानंतरच्या बदलत जाणाऱ्या काळात लिहिल्या गेलेल्या ढसाळांच्या कवितेत विद्रोहाचा सूरही खूपच खाली आला आहे. विझू लागला आहे, किंवा तो वेगळ्या, नव्या सुरांकडे, नव्या आशयकेंद्राकडे वळताना दिसतो आहे.

२

*प्रागितिहासाच्या गहन गुहातील अंधार अंतरवस्त्र अंगावर ओढून झोपले आहे. इतिहासाचे कलेवर पोरी इथेच कुठे तरी आहे आपले मोहंजोदारो (२००५: ११)*

नामदेव ढसाळांच्या कवितेला आणखी एक वेगळे वळण, वेगळे आशयकेंद्र 'मी' 'मारले' सूर्याच्या रथाचे सात घोडे या जवळपास शेवटच्या टप्प्यावरील संग्रहात लाभलेले दिसते. वस्तुतः हा संग्रहही संमिश्र स्वरूपाचा आहे. सूर्याचा रथ, त्याचे सात घोडे यांमधील प्रतीकात्मकताही परिचित स्वरूपाची आहे. परंतु या घोड्यांना मारण्याची कल्पना पूर्णपणे वेगळी, विद्रोही आहे. या संग्रहात दलित जीवनातील वेदना, विद्रोह, नकार या प्रारंभापासून चालत आलेल्या परिचित आशयसूत्रांबरोबरीनेच आध्यात्मिक, अतीतविषयक अशी अनेकविध आणि वेगळी आशयसूत्रे आविष्कृत झाली आहेत. ती कमीअधिक परिचित आहेत.

या संग्रहात ढसाळांच्या काही मोजक्या कवितांमध्ये काही वेगळी, पूर्णपणे नवी आशयसूत्रेही आलेली पाहायला मिळतात. या कविता मोजक्या असल्या तरी मानवी संस्कृतीच्या प्राचीनतम इतिहासाशी, म्हणजेच एका अर्थाने संस्कृतीच्या उगमाशी निगडित असलेले एक वेगळ्या प्रकारचे आशयसूत्र येथे आविष्कृत झाले आहे. ते एकूण मराठी कवितेत क्वचितच आविष्कृत झालेले दिसते. त्यामुळेच या कविता वेगळ्या आणि महत्त्वाच्या आहेत. त्यांची थोडक्यात का होईना स्वतंत्र नोंद घेणे गरजेचे आहे.

आपण पाहिले की - काही संग्रहांमध्ये विशिष्ट आशयकेंद्र प्रभावी

ठरते. उदाहरणार्थ 'गोलपिठा', 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले' या प्रारंभीच्या संग्रहांमध्ये सामाजिकता प्रभावी आहे. या संग्रहांमध्ये प्रेम, लैंगिकता अशी आशयसूत्रे फारच कमी प्रमाणात, विरळ आहेत. याउलट 'खेळ' या संग्रहामध्ये प्रेम, लैंगिकता ही आशयसूत्रेच प्रमुख आहेत.

'या सत्तेत जीव रमत नाही' या संग्रहामध्ये संमिश्र स्वरूपाची आशयसूत्रे असली तरी या संग्रहामध्ये अतिभौतिकीय आशयसूत्रे अधिक महत्त्वाची ठरतात. या प्रकारचेच संमिश्र चित्र 'मी मारले सूर्याच्या रथाचे घोडे' या संग्रहाबाबतही दिसते. वस्तुतः या संग्रहात कोणतेही एकच एक आशयसूत्र प्रभावी नाही. येथेही वेगवेगळी आशयसूत्रे येतात.

'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे' या संग्रहात दलित कवितेतील वेदना, विद्रोह आणि नकार अशी दलित कवितेच्या संदर्भातील पारंपरिक वाटणारी आशयसूत्रे आहेत. याबरोबरीनेच कला, कलावंत इत्यादी काही वेगळी आशयसूत्रेही काही कवितांमध्ये आहेत. या अर्थाने हा संग्रह संकीर्ण म्हणायला हवा. या बरोबरीनेच येथे पूर्णपणे वेगळे, नवे आशयसूत्रही येते. ते आदिम काळापासून चालत आलेल्या मानवी संस्कृतीविषयी आहे. या संग्रहात संमिश्र स्वरूपाची आशयसूत्रे असली तरी यांतील काही कविता मानवी संस्कृतीच्या इतिहासाचा वेध घेऊ पाहतात. हे आशयसूत्र केवळ ढसाळांच्याच कवितेत नव्हे, तर एकूण मराठी कवितेत वेगळे, अभिनव आहे.

येथे ढसाळ काही मोजक्या कवितांमधून मानवी संस्कृतीच्या प्रागैतिहासिक काळापासूनचा वेध घेऊ पाहतात. खरे म्हणजे या काळापासून आजवर चालत आलेल्या मानवी संस्कृतीच्या वेगवेगळ्या प्रकारच्या बदलांचा वेध ही कविता घेऊ पाहते. या सर्व प्राचीनतम संस्कृतींमध्ये ती आजच्या आपल्या अस्तित्वाचे मूळ शोधू पाहते. या प्रकारे प्रस्तुत संग्रहातील मोजक्या कवितांमधील आवाका, त्यांचा पैस साहजिकच मोठा ठरतो. या प्रकारचा वेध घेणारे आशयसूत्र आधी उल्लेखिलेल्या अनेक कारणांमुळे दलित कवितेत तर जवळपास नाहीच, परंतु एकूण मुख्य प्रवाहातील मराठी कवितेतही ते दुर्मिळ आहे.

कवीच्या मते मोहेंजोदारो, हडप्पा अशा प्राचीन संस्कृतीमध्येच कुठे तरी 'आपल्या प्राचीन संस्कृतीचे कंपोज खत' आहे. (२००५: १३३) प्रदीर्घ

काळापासूनच्या संस्कृतीच्या एकूण वाटचालीत अनेकविध मानवनिर्मित, निसर्गनिर्मित वस्तू आणि त्याचप्रमाणेच नद्या, समुद्र इत्यादी प्राचीनतम गोष्टी आहेत. यांतील काही गोष्टींचा विनाश होतो, तर काही गोष्टी नव्याने निर्माण होतात. या जगातील काही प्रतिमांच्या आधारे येथे एकूण मानवी संस्कृतीच्या गतिशीलतेचा वेध घेतला जातो. या गोष्टीच्या प्रतिमा जागतिक इतिहासात प्रसिद्ध आहेत.

वर्तमान उतरत राहतो भूतकाळाचे सोपान/विपदा अटलांटिक ओलांडून शिवते तांबड्या समुद्राला, कधी सिंधू, कधी रावी, कधी सतलज बनून/शिवते महासागराला/काळाचे अरबी घोडे दौडत राहतात/ एका युगाकडून दुसऱ्या युगाकडे संक्रमित. येथे एक विशिष्टच नव्हे तर एकूण सतत बदलणाऱ्या, परंतु विश्वात्मक मानवी संस्कृतीची जाणीव होते.

काळाच्या ओघात मानवी संस्कृतीच्या इतिहासात सतत संक्रमणे होत राहतात. कवी ढसाळांच्या दृष्टीने ती अनेकदा अनाकलनीय, काळोखी असतात. या अर्थाने ती मूक आणि अंध असतात. या इतिहासात अनेक रिकाम्या जागा असतात आणि त्या शतकानुशतके तशाच रिकाम्या राहतात. त्या भरल्या जात नाहीत. वेगवेगळ्या वास्तूंच्या रूपांत, शिल्पांच्या रूपात या इतिहासाच्या गूढ गहन प्रतिमा अस्तित्वात राहिलेल्या पाहायला मिळतात. उदाहरणार्थ पुढील ओळी पाहाव्यात.

*ग्रीक : रोमन : इजिप्त : अंधार संधिकालाचा प्रणयमुद्रेतील एट्रस्कन दाम्पत्य*

*विशाल मुख ओल्मेकचे*
*प्रतिमा रडणाऱ्या मुलाची*
*उजेडाचे नगर तिओतिहुकानचे*
*इतिहासाचा आरंभः संस्कृत्यांचा विसर्जित दावानल*
*...पाण्याआतली नगरे-महानगरे अवशेषांचे तरंगते कलेवर*

*(२००५ : ३९)*

एक कवी म्हणून ढसाळांचे मानवी संस्कृतीच्या इतिहासाचे आकलन किती सूक्ष्म आणि व्यापक आहे. याचा प्रत्यय अशा काही संदर्भांमधून, उदाहरणांमधून येतो.

संस्कृतीच्या इतिहासाचा वेध घेताना काही वेळा सनातन काळापासूनचे

प्रवासाचे रूपक येते. हा इतिहासपूर्व काळापासून संस्कृतीपर्यंतचा आणि मुख्यतः संस्कृतीच्या उगमाच्या काळापासून आजवरचा मानवाचा प्रवास आहे. ढसाळांच्या कवितेत मानवी संस्कृतीच्या इतिहासाचा, घडण्याबिघडण्याचा, तिच्या व्यापकतेचा आणि सनातनतेचा शोध कसा घेतला जातो, ते येथे स्पष्ट होते.

*हजारो लाखो कोट्यवधी प्रकाशवर्षे मागे मागे/घेऊन जाणारे असे काही/...../ सगळे एक पिढी दुसऱ्या पिढीच्या खांद्यावर उभी/आयुष्याच्या समुद्रात हलणारी डोलकाठी/सनातन आदिम माणसांचा पिरॅमिड, आयफेल टॉवर/झुकतो उजवीकडे डावीकडे. उत्खननाची कुदळ/मोडून पडते. संस्कृतीवर संस्कृती उभी/माणसांची अद्भुत रम्य.... (२००५:११५)*

*काळाच्या टापेखाली संस्कृतीची प्रतीके चिरडली जातायत/ मला जगायचा नाही पुन्हा माझा भूतकाळ/.../दुःखभावना विध्वंसाच्या छळाच्या आठवणी/मागे ठेवून मी आलो आहे. पुढे चालत-/मी रमलो आहे नवनिर्माणात (२००५:३३३)*

संस्कृतीच्या प्रवासाबरोबर या संग्रहातील कवितेत कमी-अधिक प्रमाणात काळाच्या गतीची, प्रवासाचीही जाणीव आहे. ‘शोध’ ही कविता या संदर्भात पाहावी. येथे कवीला शोध लागतो तो आपल्या जीवनातील रितेपणाचा. ‘प्रत्यक्षाला आहे एक छिद्र’ या कवितेतील वाहणारा आपल्या ‘त्रिमितीतील रितेपणा’ ही कल्पना पाहावी. कवीच्या प्रत्ययाला येणारा हा रितेपणा अनेकविध प्रकारचा आहे. या शब्दप्रयोगातील प्रत्यक्षाला पडलेल्या छिद्राची कल्पनाच विलक्षण आहे. कवी म्हणतो :

*हे असे प्रत्यक्षाला आहे एक छिद्र/ जे काही आहे ते मूक आणि अंध/ काळ आणि अवकाशामधला प्रत्यय/आपल्या विश्वाला ही अशी बारीकशी पडली आहे बारीकशी भेग/आणि ओसंडून वाहतो आपल्या त्रिमितीला रितेपणा/ज्याच्या आडोशाला आपण आपले जगणे जगू पाहतो.*

*(२००५: ८)*

अशा कमीअधिक प्रमाणात वैज्ञानिकतेचा आधार घेतलेल्या परंतु अद्भुत वाटणाऱ्या प्रतिमांमधून जगाचा येणारा अनुभव कवीला आत्मविसंगतीने भरलेल्या वास्तवाचा अनुभव देतो.

*ब्रह्मः मायाः सान्तः अनंत सर्वच शब्दच्छ्‌ल/भ्रम स्वप्न आत्मविसंगतीने*

*भरलेले जग*

जगण्याचा अनुभव कसा वेगवेगळ्या प्रकारच्या भ्रमांनी, अद्‌भुत गोष्टींनी, अनेकविध आत्मविसंगतींनी कसा भरलेला आहे. याचा प्रत्यय देणाऱ्या या प्रतिमा आहेत. ढसाळांच्या शेवटच्या 'निर्वाणा अगोदरची पीडा' या संग्रहात मात्र इतर वेगवेगळ्या आधीच्या आशयसूत्रांबरोबरीनेच विराटतेचे आशयसूत्र प्रभावी ठरते.

**बाप, वडारी आणि मी...**

*वडारी दगडांना स्वप्न देतात*
*- मी फुलबाजा पेटवतो.*
*बापाच्या आयुष्यात*
*उतरू नये म्हणतात*
*उतरतो;*
*कानाकोपरा*
*खाजवतो*
*वडारी दगडांना फुले देतात.*
*मी बेंडबाजा वाजवतो*
*चार स्त्रियांच्या कमानी देहातून कातळलेला*
*उभा पारशी ओलांडतो,*
*बापाचा रक्ताळलेला पुट्टा पाहातो*
*अंधाराच्या गोंदणीत*
*ओठ भाजेपर्यंत*
*सिगार ओढतो : उस्मरतो*
*वडारी दगडांना गरोदर ठेवतात*
*मी थकलेले घोडे मोजतो,*
*स्वतःला टांग्याला जुंपून बापाचं प्रेत हाताळतो,*
*जळतो*
*वडारी दगडांना घर करतात*
*मी दगड वाहतो*
*वडारी दगडांचं घर करतात*
*मी दगड डोक्यात घालतो.*

विद्रोही आशयाची उत्कट तीव्रता, सर्जनगर्भ प्रतिमांतून आपल्या आस्वादक रसज्ञतेला भिडविणारी ही नामदेव ढसाळ यांची कविता आहे. वडारी बापाच्या सृजनशील प्रतिभेबाबतचे एकेक प्रतिमांकित विधान आणि निवेदक 'मी'चे प्रथम उपरोधिक/उपहासात्मक, त्यानंतर गंभीर अगतिक आणि शेवटी स्फोटक क्रांतभारित कृतिसिद्ध भाव असे चढत्या क्रमाने आंदोलित जाणारे नाट्य असे या कवितेचे रूप आकारले आहे.

बाहेरच्या जगातील वडारीमधील शिल्पकार, पण त्याला मुलाला जवळून दिसणारा वास्तवातला वडारी शिल्पकारामधील रक्ताळलेला वडारी बाप आणि या दोहोंबद्दल प्रतिक्रिया देणारा या कवितेतील मुलाची भूमिका घेणारा निवेदक; या तिघांची ही कविता आहे. या तीन पात्रांच्या रेखाटनातून या कवितेचे नाट्यात्मरूप आकारत असते. शेवटला विद्रोहाचा स्फोट या रूपात ठासून भरलेला असतो.

कविता वाचल्याबरोबर या कवितेतील खालील काव्यपंक्ती आपल्या रसिकतेला भिडतात;

*... वडारी दगडांना स्वप्न देतात*
*... वडारी दगडांना फुलं देतात*
*... वडारी दगडांना गरोदर ठेवतात.*
*... वडारी दगडांना रक्तात मिसळतात*
*... वडारी दगडांचं घर करतात.*

लगेच लक्षात येते की, या कवितेतील हे वडारी दगडांतून कोरीव शिल्पमूर्ती कोरणाऱ्या शिल्पकारांचे प्रतिनिधी आहेत. हे सांगणाऱ्या या काव्यपंक्ती आहेत.

या काव्यपंक्ती आपल्यातील रसिकतेला भिडतात याचे कारण उघड आहे. कारण असे की, या काव्यपंक्तीत समृद्ध सर्जनशील प्रतिमा आहेत, की ज्या प्रतिमा तुमच्या-आमच्यातील सर्जक कल्पक मनात, काही सौंदर्यसंपन्न, भावस्पर्शी भावचित्रे निर्माण करतात.

कोणती असू शकतात ही संभवनीय मानसचित्रे...?

*वडारी दगडांना स्वप्न देतात.*

... त्यांना या दगडांत, हिमालयातील शिखरावर विश्वगूज करणाऱ्या शिवपार्वतीची चैतन्यरूपे दिसतात. त्यांना या दगडात, उभा पहाड

कोरून आकाशाला भिडणारे पाचपाचशे फूट उंचीचे श्रवणबेळगोळच्या गोमटेश्वरासारखे पाषाणपुरुष दिसतात. त्यांना या दगडात पाषाणखंडांना दुभंग करून वर येत असलेली दिव्य शिवलिंगांची असंख्य प्रतिमाने दिसतात.

त्यांना दगडात दिसणारी ही सृजनाची स्वप्ने ते दगडांना बहाल करतात.

*वडारी दगडांना फुले देतात.*

या ओबडधोबड दगडांतील पाषाणाच्या देहांना ते नाजूक फुलासारखे तरल भाव देतात. त्यांना शृंगार-दाम्पत्याच्या चेहऱ्यावरील रतिमग्न भाव देतात. त्यांना ख्रिस्ताच्या मातेच्या डोळ्यातून झिरपणारे कोमल भाव देतात. त्याला अजिंठा-वेरुळच्या बुद्धाच्या मिटलेल्या ओठातील शांत सात्त्विक करुणामय भाव देतात.

हे असे फुलांसारखे भाव ते दगडांना देतात. दगडांना ते अशी भावफुले वाहतात. दगडांना ते अशी फुले देतात.

आणि दगडांतून कोरलेल्या, पंढरीच्या पांडुरंगापासून तिरुपतीच्या व्यंकटेशाच्या पाषाणमूर्तीवर तर ते भक्तांकरवी फुलांचा वर्षावच करीत असतात.

ते निर्मित होऊन दगडांना अशीही फुले देतात.

*वडारी दगडांना गरोदर ठेवतात*

ते दगडांच्या पोटीओटीत उद्याच्या अखंड कैलास लेण्याचे गर्भ पेरून ठेवतात. कुठल्या तरी सागरकिनारीच्या घारापुरी-खडकावर त्रिमूर्तीचे बीज गर्भारून ठेवतात. मानवी उत्कट शृंगाराचा जन्म खजुराहो-मंदिरांच्या देहोदेही ठेवून जातात.

*वडारी दगडांना असे गरोदर ठेवतात.*

*वडारी दगडाचे घर करतात.*

... तुम्हा आम्हांला तेच दगडाची घरे बांधतात, राजेरजवाड्यांना दगडाचे प्रासाद बांधतात. स्वर्गातील देवादिकांच्या घरांसाठी उंच उंच डोंगरावर, तेच दगडांची शैलमंदिरे बांधतात आणि तुमच्या-आमच्यासाठी शिल्पकलेच्या विश्वातील 'सत्यं-शिवं-सुंदर'ची आनंदघरेही तेच बांधतात.

आणि हे सारे करताना,

*- वडारी दगडांना रक्तात मिसळतात.*

... वरील सर्व सर्व करताना हे वडारी आपल्या देहाच्या आणि आपल्या प्रतिभेच्या रक्तात या दगडांना भिजवून काढतात. उन्हातान्हात कोरीव दगडकाम करताना, या दगडांतून नवीन शिल्पांचे सौंदर्य अंकुर धुमारून यावे म्हणून या दगडांवर आपल्या रक्ताचे सिंचन करीत असतात.

हे सारे शिल्पसौंदर्य-रक्तमिश्रित शिल्पसौंदर्य तुमच्या आमच्या वाट्याला देतात.

पण त्यांच्या वाट्याला काय येते? आपण त्यांना काय देतो?

या कवितेतील 'मी'ला निवेदकांच्या भूमिकेतील वडाऱ्याच्या मुलाला काय दिसते?

तो विरोधी लयाचाच आशय प्रकट करणारा असल्याने, नागरी भाषेला छेद देणारी विरोधी लयाची त्याची रांगडी भाषा इथे सुरू होते.

*बापाच्या आयुष्यात*
*उतरू नये म्हंतात*
*उतरतो*

प्रथम त्याला दिसतात. त्याच्या बापाने कोरलेली काही पाषाण शिल्पे-

*चार स्त्रियांचे (कमनीय) कमानी देह*
*कातळलेल्या (कोरलेला) उभा पारशी स्त्री अन् पुरुष!*
*खूपच सुंदर-इत्यादी इत्यादी.*
*- पण त्याचा बाप?*

ती त्याच्या बापाने कोरलेली स्त्री-पुरुषांची सुंदर शिल्पे ओलांडून, त्याच्या शिल्पप्रतिभेच्या पलीकडले (की अलीकडले?) त्याचे वास्तव रूप पाहण्यासाठी तो ठाकतो... तर त्याला तेथे दिसते.

*बापाचा रक्ताळलेला पुट्टा*
*त्यांचा बाप जणू रक्ताला दगडकामाच्या टांग्याला जुंपून उरी फुटून थकलेला घोडा.*

ते त्याच्या बापाचे जिवंतपणीचे रक्ताळलेले मरतुकडे प्रेतच. बाहेरच्या कलाविश्वातील सौंदर्यनिर्माता शिल्पकार इथे त्याच्या मुलाला दिसतो अधिक वास्तवातला-दगडकाम करीत करीत रक्ताळून गेलेला वडारी!

असे हे किती तरी टांगे ओढून ओढून उरी फुटून थकलेल्या

घोड्यांसारखे- सारे शरीर रक्ताळून जाईपर्यंत दगडकाम करणारे वडारी.

माणसांना आनंद देणारे शिल्पसौंदर्य, रक्तघाम गाळणाऱ्यांनी निर्माण करावे, त्या सौंदर्याचा आनंद इतर साऱ्यांनी चाखावा, पण ते सौंदर्य निर्माण करणाऱ्याने मात्र जीवन जगण्याच्या लढाईसाठी, उन्हातान्हात तप्त दगडांवर बसून, शिल्प कोरता कोरता सर्वांग रक्ताळून घ्यावे आणि टांग्याला अखंड जुंपलेल्या घोड्यासारखे ऊर फुटेस्तोवर थकतभागत धावतच राहावे- जिवंतपणीच-मरेपर्यंत मरतच राहावे!

ही जाण येताच या कवितेतला निवेदक 'मी'- वडाऱ्याचा मुलगा काय करतो?

*मी फुलबाजा पेटवतो*
*कानाकोपरा खाजवतो*
*मी बेंडबाजा वाजवतो*

कारण त्या सौंदर्यग्राहक अभिजनांच्या सांस्कृतिक (!) समाजव्यवस्थेने या शिल्पित प्रतिभावंतांनी ते रक्तशोषिताचे प्रेतवत् जिणे दिलेले असते म्हणून हा असा उपहास-उपरोध, ही अभिजनांच्या समाज-व्यवस्थेची ग्राम्य टवाळी असते.

असा हा या वडाऱ्याच्या पोराचा टवाळखोर बेंडबाजा-फुलबाजा असतो. जो अभिजनांसहित सर्वांचाच कानाकोपरा खाजविणारा असतो! दगडांना स्वप्न देणे, दगडांना फुले देणे, दगडांना गरोदर ठेवणे, दगडांना रक्तात भिजवणे. अशा अभिजनांच्या नागर भाषा-संस्कृतीतील अभिजात प्रतिमांशेजारी, दाद घ्यायला आलेला हा टवाळखोर ग्राम्य भाषिक रांगडा बेडबाजा, अभिजनांच्या सौंदर्यगुण ग्राहकतेतील बथ्थड संवेदनशून्यता उघडी पाडणारा असतो.

- पण झटकन तो त्या तिरकसपणातून स्वतःला सावरतो. गंभीर होतो. तो गंभीर होतो आणि मग याबद्दलच्या तीव्र जाणिवेचा आवेग आवरणे, त्याला कठीण होऊन जाते-

*अंधाराच्या गोंदणीत*
*ओठ भाजेपर्यंत*
*सिगार ओढतो; उस्मरतो*
*तो धुमसतो. उरी फुटतो, जळतो जळतो*

बापाच्या रक्तात भिजलेले, कलात्मक सौंदर्याने न्हालेले ते दगड, तो शिरोधार्थ मानतो खरा; पण आपल्याच बापाचा दगडकाम करण्याचा वाहण्याचा वंशपरंपरेने दिलेला वारसा तो नाकारतो. गर्रकन सर्पासारखा मागे फिरतो आणि या विषयमतेवर आधारलेला अभिजन पुरस्कृत समाजव्यवस्थेचा विध्वस्त केला पाहिजे या निर्धाराने तो तोच दगड उचलतो आणि विषम समाज व्यवस्थेच्या डोक्यात घालतो.

*मी दगड डोक्यात घालतो*

अशी क्रांतिकारक शब्दकृती करून ही कविता संपते.

शेवटच्या या त्याच्या विद्रोही क्रांतभारित आवेगानुसार येणारी दोनदोनच ओळींची बंधातील द्रुतलय या कवितेची परिणामकारकता तीव्रतेच्या टोकाला नेऊन भिडविते.

पण इथेच हे क्रांतीचे बीज या 'मी'मध्ये कुठून येते असा प्रश्न मनात सहज निर्माण होतो.

- वडारी दगडांना स्वप्न देतात. म्हणजे हे रक्तघाम गाळणारे वडारी तुमच्या-आमच्यातील मथ्थड संवेदनाशून्य दगडांना क्रांतीची स्वप्ने देतात.

- वडारी दगडांना गरोदर ठेवतात.

म्हणजे हे वडारी तुमच्या-आमच्यातील अणूरेणूत उद्याचा मूल्याधिष्ठित रम्य उषःकाल गर्भारून ठेवतात.

- वडारी दगडांना रक्तात मिसळतात

म्हणजे हे वडारी तुमच्या-आमच्यातील निष्क्रिय दगडांना चैतन्यप्रेरक नवविचारातून भिजवून काढतात.

- वडारी दगडांची घरे बांधतात.

म्हणजे हे वडारी तुमच्या-आमच्यातील उद्याच्या मनात न्याय-समता-स्वातंत्र्य या त्रयींवर आधारलेले मुक्त नवसमाजाचे घर बांधतात.

- असे हे घाम-अश्रू-दगड-देहाचे वडारी हेच क्रांतीचे बाप असतात.

- मनात उभे राहणाऱ्या सर्व संबंधित प्रश्नांची उत्तरे येथे मिळून जातात.

'आठवणी' या कवितेतून कवी नामदेव ढसाळ हे आपले भावविश्व कसे व्यक्त करतात?

'आठवणी' ही कवी नामदेव ढसाळ यांची कविता. कवी या कवितेतून

आपले वेदनापूर्ण भावविश्व प्रकट करतो.

शतकानुशतके इथल्या परंपरेने दलित समाजावर केलेल्या अनन्वित अत्याचारांना कवीने 'आदिम' यातनांचा 'सुंदर चेहरा' असे म्हटले आहे. कवी येथे 'सुंदर' हे विशेषण उपरोधाने वापरतो. यातून दलित समाजाच्या वाट्याला आलेल्या जीवनाची विद्रूपता कवी येथे व्यक्त करतो. त्याचबरोबर या अत्याचारांतूनच त्यांना विरोध करण्याची, अत्याचार नष्ट करून नवीन सुंदर जग स्थापन करण्याची कवीच्या मनात ईर्षा जागी होते. ही ईर्षा तो 'सुंदर' या विशेषणातून व्यक्त केला.

कवी आपल्या पूर्वजांना अभिमानाने व अतीव आदराने वंदन करतो. कारण अन्याय-अत्याचारांविरुद्ध लढण्याची, नवजीवन प्रस्थापित करण्याची प्रेरणा त्यांनी दिली. कवीला या प्रेरणा भव्यदिव्य वाटतात. म्हणून तो त्यांना अजिंठा-वेरूळची उपमा देतो. आपल्या समाजावर होत असलेल्या अन्यायाची भीषणता व तीव्रता कवीला इतकी जाणवते की, तो त्यांना पूर्वजांच्या कपाळावर उमटवल्या गेलेल्या 'तप्त मुद्रा' म्हणतो. अजून आपल्यालाही या यातना भोगाव्या लागत आहेत. हे वास्तव कवी 'मीही यातनेचा एकेक दिवा पेटवत त्यांच्याच वाटेने आलो आहे.' या शब्दांत प्रकट करतो.

जुलमांच्या आठवणी कवीला डंख करतात. म्हणूनच त्याला आपल्या जीवनाची सुरुवात 'रक्ताने चिंब भिजलेल्या सकाळ'सारखी वाटते. तसेच, आपल्या प्रियतमेच्या डोळ्यातली स्वप्ने अन्याय-अत्याचारांत पूर्णपणे वाहून गेल्याचे कवीला दिसून येते.

अशा रीतीने आपले भावविश्व कवीने आपल्या कवितेतून व्यक्त केले आहे.

★ ★ ★

शतकानुशतके इथल्या परंपरेने दलित समाजावर अनन्वित अत्याचार केले; त्यांचे पराकोटीचे शोषण केले. हे अत्याचार अजूनही चालूच आहेत. या अत्याचारांच्या खुणा आपल्या जगण्यातूनही व्यक्त होत आहेत. हे जगणे म्हणजे जणू काही आपला चेहराच आहे, असे कवी म्हणतो. म्हणून 'आदिम यातनांचा सुंदर चेहरा' असा शब्दप्रयोग कवी करतो. कवी येथे 'सुंदर' हे विशेषण उपरोधाने वापरत आहे. 'सुंदर' या

शब्दाच्या उच्चाराने आपल्या मनात रमणीय, मनमोहक असे काहीच उरले नव्हते. सतत तीव्र अशी वेदनाच मनात वागवत हा समाज जगत होता. या वेदनेकडे निर्देश व्हावा म्हणून उपरोधाने 'सुंदर' हे विशेषण कवी वापरतो. या सुंदर चेहऱ्यातच कवीला नव्या सुंदर जगाची प्रस्थापना करण्याची ईर्षा आता दलित समाजात जागी झाली आहे. हेच ते नवे स्वप्न होय. 'सुंदर चेहरा' म्हणजे कवीने व्यक्त केलेले हे नवे स्वप्न होय.

कवी आपल्या पूर्वजांना अंतःकरणपूर्वक वंदन करतो. कारण या पूर्वजांनी अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढण्याच्या, नवजीवन निर्माण करण्याच्या इच्छा पुढल्या पिढीच्या मनात निर्माण केल्या. आपल्या या भव्यदिव्य इच्छांना कवी वेरूळ-अजिंठ्याची उपमा देतो. आपल्या पूर्वजांच्या कपाळी इथल्या समाजाने अत्याचारांच्या जणू तप्त मुद्राच उमटवल्या आहेत. असे कवी म्हणतो. शतकानुशतके हे अत्याचार चालूच आहेत. आताच्या पिढीलाही हे अत्याचार सहन करावे लागत आहेत. हे वास्तव अधोरेखित करण्यासाठी कवी, आपणही यातनेचा एकेक दिवा पेटवत त्यांच्याच वाटेने येत असल्याचे सांगतो.

हा देश, हे गाव, हे शहर येथे सर्वत्र जुलमाचा अंधार पसरला आहे. या जुलमांच्या आठवणी तीव्र असा डंख करतात. त्यामुळे वर्षानुवर्षांच्या अत्याचारांच्या आठवणी जाग्या होतात. अशा वेळी 'रक्ताने चिंब भिजलेली सकाळ' अजूनही आठवत असल्याचे कवी प्रियतमेला सांगतो. येथे कवीने 'सकाळ' ही प्रतिमा अचूक योजली आहे. सकाळ म्हणजे जीवनाची सुरुवात. सकाळ म्हणजे नव्या दिवसाची रमणीय स्वप्ने होत. परंतु कवीची सकाळ, त्याच्या जीवनाचा प्रारंभ अनन्वित यातनांनी भरलेला असल्याने त्या सकाळचा उल्लेख तो 'रक्ताने भिजलेली सकाळ' असा करतो. या यातनांमध्ये कवीला आपल्या प्रियतमेच्या डोळ्यांतील काजळरेषा, म्हणजेच स्वप्ने वाहून गेल्याचे जाणवते.

❖❖❖

# बाबासाहेब असते तर त्यांनी नामदेवचे ‘ज्ञान’देव असे नामांतर केले असते!

दिनू रणदिवे

एखाद्या सर्वसामान्य माणसापुढे शिवधनुष्य आणून ठेवल्यावर ते हातात घेण्याचे त्याला आदेश दिल्यावर त्याच्या मनाची अवस्था जशी व्हावी तशीच अवस्था माझ्या मनाची ही प्रस्तावना लिहिताना झाली आहे. ज्येष्ठ कवी (ज्यांचा अलीकडेच साहित्य अकादमीने राष्ट्रीय पातळीवर गौरव केला) नामदेव ढसाळ यांच्या संग्रहास मी प्रस्तावना लिहावी अशी सूचना शिवा घुगे यांनी केली असता मी तात्काळ नकार दिला. त्यावर ते म्हणाले की, प्रत्यक्ष ढसाळ यांचीच अशी सूचना आहे. मला ते खरे वाटले नाही. परंतु काही दिवसांनी ढसाळ यांच्या एका गौरव समारंभाच्या वेळी मी तेथे गेलो असता प्रत्यक्ष ढसाळ यांनी मला आग्रहाने सांगितले की, प्रस्तावना लिहिलीच पाहिजे. त्यांच्या केवळ प्रेमाच्या आग्रहामुळे मी हे धाडस करीत आहे. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी त्यांना भेटलो असता मी त्यांना सहज म्हणालो होतो, ‘...तुमची प्रतिभा ही तुमचीच प्रतिभा आढळते... साहित्य हा माझा विषय नव्हे. परंतु तुमची उंची फारच मोठी वाटते.’ त्याबाबत अधिक चर्चा टाळली. कारण माझे तर ललित साहित्याचे वाचन अगदीच तोकडे. माझी ही मर्यादा अगदीच उघड होऊ नये म्हणून मीच दुसऱ्या कोणत्या तरी विषयावर बोलणे सुरू केले आणि तेथून सटकलो.

परंतु मला लवकरच अनुभव आला की, त्यांची बुद्धिमत्ता दांडगी आहे. ढोरचाळीत वाढलेला, शिक्षणास मध्येच रामराम ठोकून चरितार्थासाठी टॅक्सी चालविणारा हा तरुण समाजाला नवीन दिशेकडे घेऊन जाणारा ठरेल असे प्रारंभी त्यांच्या संपर्कात आलेल्या कार्यकर्त्यांना वाटलेही

नसेल.

अशा या जातिवंत साहित्यिकास, बंडखोरास अचानक एका व्याधीने ग्रासले. अत्यंत तल्लख मेंदूचा विचारवंत म्हणून ओळखला जात असलेल्या या तरुणास मेंदूच्या व्याधीनेच ग्रासले. याला तर दुर्दैवच म्हटले पाहिजे, परंतु ढसाळांना तसे म्हटलेले पसंत पडणार नाही. कारण समोर ठाकलेल्या कोणत्याही संकटावर स्वार होऊन त्याच्यावर मात करण्याची त्यांची वृत्ती आहे. पराभव त्यांना मान्य नाही. तो शब्दच त्यांच्या कोशात नाही. त्यांच्या चौफेर बुद्धिमत्तेचा मला आलेला एक अनुभव येथे सांगावासा वाटतो.

ज्या मेंदूच्या विकाराने श्री. ढसाळ यांना ग्रासले आहे (मायस्थेनिया ग्रॅव्हिज) त्याच व्याधीने पत्रकार अनंतराव भालेराव यांना ग्रासले होते. ते मुंबईतील के. ई. एम. रुग्णालयात दाखल झाले असता श्री. ढसाळ त्यांना भेटण्यासाठी तेथे गेले होते. त्यावेळी मीही तेथे होतो. ढसाळ यांच्या ओळखीही अगदी चौफेर. एस. एम. जोशींपासून ते एस. ए. डांगे या ज्येष्ठ नेत्यांबरोबर त्यांची ओळख. त्यांच्या अशा संपर्कामुळेच त्यांची भालेराव यांच्याबरोबर ओळख झाली असावी. त्यातच पुन्हा मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नावरून त्या दोघांत मतभेद होते. परंतु त्या दोघांचे बोलणे ऐकून एखाद्या त्रयस्थास त्यांच्यात कधी काळी तीव्र मतभेद असावेत, अशी शंकाही आली नसणार. खरा मुद्दा पुढेच आहे. त्या दोघांत खरे बोलणे चालू होते ते मायस्थेनियाबद्दलचे. या रोगावरील कोणत्या गोळीचा परिणाम काय होतो, त्या गोळीत कोणती द्रव्ये असतात याबद्दल ढसाळ यांना समग्र माहिती असल्याचे दिसत होते. ते बोलणे ऐकून एखाद्या त्रयस्थाला वाटावे की, ढसाळ यांचा वैद्यकशास्त्राचा खोल अभ्यास असावा. त्या वेळी तेथे भालेराव यांच्या नात्यातील एक तज्ज्ञ डॉक्टर होते. श्री. ढसाळ निघून गेल्यावर त्या डॉक्टरांनी त्यांच्या वैद्यकीय ज्ञानाबद्दल आश्चर्य व्यक्त केले. ते म्हणाले, ''वैद्यक शाखेतील पदव्युत्तर अभ्यास करणारे अनेक विद्यार्थी माझ्यासमोर असतात. काहींचा तर पदव्युत्तर अभ्यासही पूर्ण झालेला असतो. परंतु या ढसाळांकडे जेवढी माहिती आहे तेवढीही माहिती आमच्या क्षेत्रातील बऱ्याच ज्येष्ठ विद्यार्थ्यांना नसते. या माणसाचे आकलन दांडगे दिसते.''

चार बुकं लिहिलेल्या ढसाळांच्या या बुद्धीची ही झेप एवढी कशी काय...? शाळेस रामराम ठोकल्यावर ढसाळ टॅक्सी ड्रायव्हर झाले होते. त्यासाठीही त्यांना शिक्षण घ्यावे लागले नसणार. नुसते वरवर पाहून ते ड्रायव्हिंग शिकले असणार. कारण ताडदेव येथील ज्या युसूफ मेहेरअल्ली विद्यालयात ते काही वर्षे शिकले त्या शाळेच्या शेजारीच मोटार ड्रायव्हिंगचे परवाने देणाऱ्या शासकीय शाखेचे कार्यालय होते. तेथे वरवर निरीक्षण करून ड्रायव्हिंग म्हणजे त्यांच्या हातचा मळ असे त्यांना वाटले असावे. अगदी सहजपणे त्यांना ड्रायव्हिंगचा परवाना मिळाला असणार आणि त्यानंतर ड्रायव्हिंग करताना, सभोवार फिरताना त्यांनी बारकाईने निरीक्षण केले असणार. दररोज निरनिराळे मोहल्ले, निरनिराळी माणसे त्यांनी पाहिली असणार. आधीच अत्यंत गरीब, उपेक्षित वस्तीत लहानपणापासूनचा वावर आणि त्यानंतर मोटारी ड्रायव्हिंग करताना शहराच्या अनेक वस्त्यांचे निरीक्षण त्यांनी केले असणार. आधीच संवेदनशील स्वभाव आणि त्यात असे निरीक्षण. अशा माणसाच्या मनात संतापाचा साठा वाढतच जाणार. विषमतेने वेढलेल्या अशा तरुणाच्या मनावर बालपणापासूनच आंबेडकरी विचारांचा प्रभाव पडलेला तो हिम्मतबाज तरुण बंडखोर होणारच.

तारुण्यात पदार्पण करतानाच त्यांच्यातील कवी कसा फुलत गेला होता त्याची एक आठवण दलित आंदोलनातील एक कार्यकर्ते श्री. जनार्दन (जे. बी.) गमरे यांनी सांगितली. साहित्याकडे ओढा असलेल्या काही तरुण दलित कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभा स्थापन केली होती. या संस्थेचे मुंबईत एक संमेलन भरविले होते. त्या ठिकाणी एक युवक गेला आणि आपणास कविता म्हणावयाच्या आहेत असे सांगू लागला. त्या तरुणाचे एकूण ध्यान पाहून तो कवी असेल असे या संमेलनाच्या कार्यकर्त्यांना वाटेना. त्याला विचारले- तू करतोस तरी काय? मी टॅक्सी ड्रायव्हर आहे, हे त्याचे उत्तर ऐकून तो 'कवी नसणारच' असे प्रमुख कार्यकर्त्यांना वाटले. परंतु त्याने कविता वाचून दाखविण्याचा फारच आग्रह धरल्याने संमेलनाचे एक ज्येष्ठ सूत्रधार प्रा. अनंत काणेकर यांना श्री. गमरे यांनी सांगितले. काणेकर आधीच उदार मनाचे व तरुणांना उत्तेजन देणारे. त्यांनी सांगितले की, फक्त एक-दोन

कविता म्हणण्यास त्या हौशी माणसास सांगा. कवी 'दिसत' नसणाऱ्या त्या युवकाचे उत्साहाने स्वागत झाले नाही. परंतु त्याच्या पहिल्याच कवितेने अशी काही पकड घेतली की, जोरदार टाळ्या वाजवून श्रोत्यांनी त्याच्या गुणाची पावती दिली. फार तर एक-दोन कविता म्हणण्यास ज्याला परवानगी दिली होती त्याच्याकडून चार कविता श्रोत्यांनी वदवून घेतल्या आणि त्याला भरपूर टाळ्यांचा आहेर दिला, अशी आठवण श्री. गमरे यांनी सांगितली.

टॅक्सी ड्रायव्हर कवीने पुढे इतकी कीर्ती संपादन केली की, साहित्य अकादमी यासारख्या साहित्यिकांच्या प्रतिष्ठित संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त या वर्षापासून साहित्यिकांना जीवन गौरव सन्मान देण्याचा उपक्रम सुरू करताना या संस्थेच्या श्रेष्ठींनी साऱ्या देशातून प्रथम कुणाची निवड केली असेल तर ती नामदेव ढसाळांची! साऱ्या भारतीय भाषेतील साहित्यकारांची मोठी यादी अकादमीच्या निवड समितीपुढे असताना मराठी भाषिक नामदेव ढसाळ यांची निवड म्हणजे ढसाळ यांनी मराठी भाषेला देशपातळीवर मोठाच गौरव मिळवून दिला आहे. साऱ्या महाराष्ट्रास त्याबद्दल अभिमान वाटला पाहिजे. परंतु खेदाची बाब अशी की, मराठी भाषेस असा गौरव मिळवून देणाऱ्या ढसाळांचे कौतुक महाराष्ट्राने मोकळेपणाने केलेले नाही. याला कारण म्हणजे ढसाळ वादग्रस्त ठरले आहेत. परंतु ढसाळ यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. मात्र 'कवी ढसाळ' यांच्याबाबत वाद नाही. निदान त्यांच्या कवितेचा गौरव झालेला असल्याने 'कवी ढसाळ' यांचा गौरव महाराष्ट्रात व्हावयास हवा होता.

अत्यंत तरुण वयातच ढसाळ सार्वजनिक जीवनात अगदी मुसंडी मारतच पुढे आले. ढसाळ आणि त्यांच्या तरुण सहकाऱ्यांनी दलित पँथरची स्थापना करताच वादळ निर्माण झाले. कारण पँथरचा १९७२ साली झालेला जन्मच दलितांच्या प्रस्थापित नेतृत्वाला आव्हान होते. कारण दलितांच्या समस्या दिवसेंदिवस उग्र होत असताना या वर्गाच्या प्रस्थापित नेतृत्वाकडून हे आव्हान स्वीकारले जात नव्हते. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या दलित युवकांसमोरचा असंतोष वाढीस लागला होता, तो खदखदू लागला होता. संवेदनशील युवकांत तत्संबंधी चर्चा सुरू झाली

होती. त्यात एक होते ढसाळ. त्यांच्या विचासरणीमुळे, आक्रमक भूमिकेमुळे आणि त्यास त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाची जोड मिळाल्यामुळे ढसाळ हेच नेते म्हणून मानले जाऊ लागले. प्रथमच दलितांमधील शक्ती जागृत करून त्यांना संघटित करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निधनानंतर (१९५६) त्यांनी निर्माण केलेल्या शक्तीचा प्रभाव ओसरू लागला होता. परंतु प्रश्न तर उग्र स्वरूप घेत होते अशा परिस्थितीत प्रथम अस्वस्थता निर्माण होते ती युवकांत. अशा परिस्थितीत धडपडणाऱ्या तरुणांची रीघ बंडखोर म्हणून ज्यांची प्रतिमा निर्माण झाली होती यात ढसाळ, ज. वि. पवार, भाई संगारे, दया पवार, भागवत जाधव, अविनाश महातेकर, पुढे राजा ढाले आणि इतर अनेक प्रमुख कार्यकर्त्यांची फौज उभी राहिली. त्यांच्या या शक्तीने साऱ्या दलित जनतेत चैतन्याची नवीन लाट तयार झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या वर्गात महाड सत्याग्रह, नाशिक सत्याग्रह अशा आंदोलनाच्या आधारे नवे चैतन्य निर्माण केले, नवीन कार्यकर्त्यांची फौज निर्माण केली. (दादासाहेब गायकवाड हे त्यापैकी एक प्रमुख) बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर ओसरलेले हे चैतन्य दलित पँथरने निर्माण केले.

वरळी येथील दंगलीच्या काळात रिपब्लिकन पक्षातर्फे शिवाजी पार्कवर रिपब्लिकन पक्षातर्फे योजलेल्या सभेच्या वेळी तेथे जाणाऱ्या अथवा चालणाऱ्या लोकांचा कानोसा घेता असे ऐकू येत होते की, या तरुणांची (पँथर्स) काही भूमिका आहे. त्यांच्याही म्हणण्याकडे लक्ष दिले पाहिजे. ज्यांनी बाबासाहेबांच्या आंदोलनात पंचवीस-तीस वर्षे काढली होती, अशा ज्येष्ठ मंडळींचे हे उद्‍गार होते. ढसाळ, पवार, संगारे यांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या या शक्तीने रिपब्लिकन जनतेवरही किती प्रभाव पडला होता ते रिपब्लिकन जनतेच्या तोंडून सहज पडणारे उद्‍गार दर्शवीत होते. दलित युवकांची नवीन प्रभावी शक्ती निर्माण झाली होती. परंतु समाजात अशी शक्ती निर्माण होत असते त्यावेळी तिला कमकुवत करण्याचे प्रतिस्पर्ध्यांचे प्रयत्न गुप्तपणे सुरू झालेले असतात. दलित पँथरचा मोर्चा निघाला असता त्यावर अकारण आणि अचानकपणे परळ विभागात दगडफेक झाली. भागवत जाधव या बिनीच्या कार्यकर्त्यांच्या डोक्यावर तर एका इमारतीच्या गच्चीवरून पाटा पडला. तेथेच ते गतप्राण

होऊन पडले. पँथरच्या आंदोलनातील हा पहिला हुतात्मा. पोलिसांनी तर हा मोर्चाच उधळून टाकला. परंतु पँथरच्या शक्तीनेही पुढे आपला प्रभाव दाखवला. लोकसभा पोट-निवडणुकीच्या वेळी (१९७४) काँग्रेस व शिवसेनेचे उमेदवार ॲड. रामराव आदिक विरुद्ध कम्युनिस्ट पक्षाच्या रोझा देशपांडे यांच्यात सामना झाला असता पँथरने देशपांडे यांच्या बाजूने शक्ती उभी केल्याने त्या विजयी झाल्या. पँथरच्या वाढत्या प्रभावाची ही चुणूक होती. नामदेव ढसाळ या 'पोराची' त्याबाबत मोठीच कामगिरी होती. त्यावेळी त्यांचे वय असेल पंचविशीच्या आसपास!

त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'रिडल्स इन हिंदुइझम' हे पुस्तक सरकारने प्रकाशित करावेच का, असा वाद एका पत्रकाराने (आंबेडकर यांचे सर्व वाङ्मय प्रसिद्ध करण्याचा निर्णय राज्य सरकारने पूर्वीच घेतला होता) उपस्थित केला असता रिपब्लिकन जनतेने साहजिकच या सूचनेस जोराचा विरोध केला होता. मोठे मोर्चे निघू लागले. पत्रकाराच्या त्या सूचनेच्या बाजूने शिवसेना उभी राहिली. आव्हानास-प्रति आव्हान असे स्वरूप या वादास आले. शेवटी रिपब्लिकन जनतेचा विजय झाला. या संघर्षातील पँथरची कामगिरी प्रभावी ठरली. ढसाळ आणि त्यांच्या तरुण सहकाऱ्यांनी केवढी मोठी शक्ती उभी केली होती त्याचे प्रत्यंतर सर्वांनाच आले.

असे ढसाळ आज शिवसेनेच्या परिवारात आज कसे काय आहेत याचे आश्चर्य आज त्यांच्याबद्दल आस्था असणाऱ्यांनाही वाटत आहे. अलीकडेच 'प्रज्ञा' या नियतकालिकाने त्यांचा सत्कार केला असता पत्रकार मधुकर भावे यांनी भाषण करताना असे मत व्यक्त केले की, यांचे मार्गक्रमण आता वेगळ्याच दिशेने होत असल्याचे दिसते. उत्तर देताना श्री. ढसाळ यांनी त्या सूचनेचा प्रत्यक्ष उल्लेख केला नाही. मात्र ते म्हणाले, ''आम्ही मूळ परिवारातील कार्यकर्ते एकत्र येऊन कार्य करण्याची चर्चा करीत असता एका ज्येष्ठ नेत्याने माझ्या अंगावरच हात टाकला. त्याबद्दल दुःख वाटलेच, पण तेथे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित असता त्यापैकी एकानेही त्याबद्दल निषेध जाऊद्याच, पण नाराजीही व्यक्त केली नाही.'' फार मोठी शक्ती निर्माण करणाऱ्या पँथरचा मुख्य संस्थापक, नामवंत कवी म्हणून बाहेर मोठी प्रतिष्ठा संपादन केलेल्या

नेत्यास असा अनुभव आल्यानंतर त्याला काय वाटले असेल याची कल्पनाच केलेली बरी.

आधीच या संघटनेत फूट पडत गेली आणि त्यात तीव्र डागण्या देणारा त्यांना आलेला अत्यंत कटू अनुभव त्यामुळे ढसाळ यांची मानसिक अवस्था घायाळ झालेल्या वाघासारखी निश्चितच झाली असणार. ढसाळ यांच्या शिवसेनेच्या 'सामना' दैनिकातील लेखनामुळे लोकांना आश्चर्य वाटत आहे. कारण मूळचे ते शिवसेनेचे विरोधक. शिवसेनेतर्फे विधानसभेची निवडणूकही ते लढविणार होते, परंतु काही कारणाने बदल झाला. शिवसेनेच्या दैनिकात ते लिहीत असले तरी अनेकांना वाटते की, त्यांचा मूळ पिंड बदलणार नाही.

सेनेवर त्यांनी पूर्वीप्रमाणेच टीका करावी असे अनेकांना वाटते. तसे त्यांनी केले तर 'केवळ समष्टीसाठी' हे त्यांचे सदर बंद होईल. सेनेच्या भूमिकेशी वेगळे वाटणारे त्यांचे लिखाणही या सदरात होत असते. सेना, भाजप यांचा इस्रायलला पाठिंबा, परंतु अलीकडेच पॅलेस्टाइनचे नेते यासर अराफत आणि इस्रायल यांच्यात जो समझोता झाला त्यावेळी ढसाळ यांनी या सदरात केलेल्या लिखाणास इस्रायलची पापे उघड्यावर टांगली होती. इराक युद्धाच्या प्रकरणी ते अमेरिकेच्या अत्याचारांवर झाडून टीका करीत असतात. त्यांचे 'सामना'तील हे लिखाण मधूनमधून मी वाचीत असल्याने हे जाणवते. त्यांनी अगदीच शरण-चिठी लिहून दिलेली नाही. बरेच मुद्दे त्यांनी अजून सोडून दिलेले नाहीत. काहींना ढसाळ यांनी तडजोड केली असे वाटत असेल, परंतु ते तात्कालिक वळण असावे. त्यांचा मूळ पिंड बदलणे शक्य नाही, कारण त्यांची मूळ प्रकृतीच वेगळी आहे. दलित आंदोलनात काम करीत असताना त्यांनी आपल्या काही मूळ सहकाऱ्यांवर टीका केली. एका जातीचा पुढारी असे त्यांचे वर्णन केले. कारण व्यापक दृष्टी ठेवल्याखेरीज येथील राजकारण यशस्वी होणार नाही. डावी भूमिका घेतली तरच गोरगरिबांचे प्रश्न सोडविता येतील अशी त्यांची भूमिका आहे.

ढसाळ सध्या बदलले आहेत अशी त्यांच्यावर होणारी टीका योग्यच आहे असे काही काळ मानू या. परंतु या देशात अनेकांनी तात्पुरते समझोते केले आहेत. यांचे मोठे उदाहरण म्हणजे जॉर्ज फर्नांडीस, राष्ट्रीय

लोकशाही आघाडीचे संरक्षणमंत्री, जनता पक्षाचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्याविरुद्ध बंड करून फर्नांडीस यांनी त्यांचे सरकार १९७९ साली पाडले. त्या वेळी त्यांची भूमिका होती की मूळच्या जनसंघाच्या मंत्र्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबरोबरचे संबंध तोडले पाहिजेत. त्यांनी तसे काही केले नसताना फर्नांडीस अजूनही अटलबिहारी वाजपेयी-अडवाणी या नेत्यांच्या हातात हात घालून उभे आहेत.

पंतप्रधानपदाचे स्वप्न पाहत बसलेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हेही एकदा असेच 'बदलले' होते. १९६९ साली झालेल्या राष्ट्रपतीपदाच्या निवडवणुकीच्या वेळी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आपल्याच काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार संजीव रेड्डी यांना डावलून अपक्ष उमेदवार व्ही. व्ही. गिरी यांचा विजय निश्चित करून दिला. त्यामुळे साहजिकच फारच मोठी खळबळ माजली. या घटनेबद्दल विचार करण्यासाठी महाराष्ट्र काँग्रेसने खास बैठक मुंबईत योजली होती. त्यावेळचे पक्षाचे प्रमुख नेते यशवंतराव चव्हाण पक्षात घडवून आणलेल्या बेशिस्तीबद्दल पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर जोरदार टीका करणार अशी काँग्रेस कार्यकर्त्यांची अपेक्षा होती. यशवंतराव चव्हाण यांचा जयजयकार तर पक्षात बेशिस्त माजविणाऱ्या इंदिरा गांधी यांच्याबद्दल नापसंती अशा घोषणा होत्या. परंतु श्री. चव्हाण यांनी भाषण सुरू करताना सांगून टाकले, "काही घटनांबद्दल न बोलण्याचाच निर्णय घेऊन मी येथे आलो आहे."

अनेकांच्या अशा राजकीय भूमिका बदलतात. मुंबईचे माजी महापौर डॉ. शांती पटेल यांचे तर जवळजवळ अर्धा डझन पक्ष झाले असतील!

परंतु काहींचे पक्ष बदलले तरी मूळ निष्ठा बदलत नाहीत. शाहीर अमर शेख कम्युनिस्ट पक्षात मोठे झाले आणि एका दिवशी त्यांनी या पक्षाबरोबर संबंध तोडले आणि ते काँग्रेस पक्षात दाखल झाले. १९६४ साली कम्युनिस्ट पक्षाचे अधिवेशन (काँग्रेस) मुंबईत भरले त्यावेळी अधिवेशनाचे उद्घाटन होण्याच्या वेळी हा शाहीर तेथे हजर झाल्याचे पाहून साऱ्या उपस्थितांना आश्चर्य वाटले. अध्यक्ष डांगे ध्वजारोहण करण्यासाठी पुढे येत असताना त्यांनी त्यांना मिठी मारली आणि कम्युनिस्ट पक्षाचे गीत खड्या आवाजात गायला सुरुवात केली. अमर शेख यांनी पक्षांतर केले, परंतु त्यांची मूळ निष्ठा कायम राहिली होती.

दलित पँथरच्या तरुण नेत्यांनी सबंध पक्षावर प्रभाव पाडला होता. त्याच वेळी रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनी जेथे त्यांचा प्रभाव होता तेथील पक्षाची सूत्रे त्यांच्या हाती द्यावयास हवी होती, परंतु आपल्या देशातील प्रस्थापित राजकीय नेते युवक कितीही कर्तबगार असले तरी त्यांच्या हाती सत्ता देण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे काही पक्षांत तर श्रेष्ठींचे वय ऐंशीच्या वर गेल्यावरही त्यांच्या अधिकार-स्थानात काही बदल होत नाही! श्री. ढसाळ यांनी दुसऱ्या पक्षाबरोबर आता संबंध जोडले असले तरी त्यांची मूळ निष्ठा कायम आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीवरील त्यांची निष्ठा अजूनही अविचलित राहिली आहे. दुर्दैवाने श्री. ढसाळ यांची आजची स्थिती चक्रव्यूहात सापडलेल्या अभिमन्यूसारखी झालेली दिसते. त्यांचा मूळ पिंड राजकीय असल्याने विशाल रिपब्लिकन पक्षातून ते बाहेर फेकले गेले आहेत. त्यांचा सध्याचा घरोबा हा तात्पुरता असावा. अर्थात हे त्यांच्या सध्याच्या भूमिकेचे समर्थन मी करण्याचे कारण नाही. त्यांचा एकूण पिंड पाहता त्यांचे सध्याचे राजकीय संबंध हे तात्पुरतेच ठरतील असे वाटते.

श्री. ढसाळ यांच्या लेखसंग्रहाचे वाचन करताना वाचकांनी कोणती दृष्टी ठेवावी हे दर्शविण्याकरिताच हे सारे लिहिले आहे. ढसाळ यांचे व्यक्तिमत्त्व दर्शविले आहे. उपेक्षितांच्या आंदोलनाचे प्रमुख नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जी विशाल दृष्टी ढसाळ यांची आहे हे पाहून फार समाधान वाटते. प्रारंभीच्या काळात बाबासाहेबांना निरनिराळ्या जातींचे सहकारी लाभले होते. १९२७ साली महाड येथे मनुस्मृती जाळून प्रचलित धर्मपद्धतीबद्दल निषेध व्यक्त करण्याची जी कृती बाबासाहेबांनी योजली होती, त्या वेळी सहस्रबुद्धे हे ब्राह्मण गृहस्थ पुढे होते. त्याचप्रमाणे आचार्य मो. वा. दोंदे, ॲडव्होकेट प्रधान, सुरेंद्र टिपणीस प्रभृती त्यांच्याबरोबर होते. पुढे रिपब्लिकन पक्षाची रूपरेषा तयार करताना बाबासाहेबांनी व्यापक दृष्टी ठेवली होती. नंतरच्या काळात एका जातीचे आंदोलन म्हणून परिवर्तनासाठी काहींनी प्रयत्न केले. पँथरमध्ये जे तरुण कार्यकर्ते होते त्यापैकी सर्वच जण ही व्यापक दृष्टी ठेवू शकले नाहीत. त्यापैकी तर काहींनी एका विशिष्ट जातीवरच भर दिला. अशी भूमिका घेणाऱ्याचे वर्णन श्री. ढसाळ यांनी 'एका जातीचा पुढारी' असे केले

होते. अशा अंतर्गत कलहामुळे ज्या संघटनेच्या मागे फार मोठे बळ दिसू लागले होते, ही संघटना म्हणजे एक वादळ असेच स्वरूप होऊ लागले असताना देशाच्या दुर्दैवाने पँथरचे अवघ्या चार वर्षांत विघटन झाले. परंतु ढसाळ यांनी मात्र अजून (सध्याची त्यांची शिवसेनेबरोबरची तडजोड सोडू या, ढसाळ यांचा एकूण पिंड पाहता ती फार टिकणार नाही, हे उघडच आहे.) डॉ. आंबेडकर यांनी जी मूळ दिशा ठरवून दिली होती तिचाच आग्रह कायम ठेवला आहे.

इंद्रधनुष्याचे जे जे विविध रंग दिसतात, तसेच रंग ढसाळ यांच्या प्रतिभेचे दिसतात. पूर्वी निरनिराळ्या आंदोलनात गर्क असलेल्या कार्यकर्त्याने विविध विषयांचा सखोल अभ्यास कसा काय केला याचेच आश्चर्य वाटते. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे बारकावे त्यांनी टिपलेले निरनिराळ्या लेखात दिसून येते. तसेच संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे, त्याच्या पूर्ण पीठिकेचे तपशील ढसाळ यांनी दिले आहेत. संयुक्त महाराष्ट्राचे खरे आंदोलन १९५५ साली सुरू झाले. संयुक्त महाराष्ट्र राज्य स्थापन करण्याची आवश्यकता ग. त्र्यं. माडखोलकर यांनी साहित्य संमेलनाचा (बेळगाव) अध्यक्ष या नात्याने १९४६ साली स्पष्टपणे मांडली. परंतु तत्पूर्वी वीस वर्षे या राज्याच्या निर्मितीच्या दृष्टीने बऱ्याच घटना घडल्या होत्या. आपल्याकडे जुने संदर्भ मिळविणे फारच कठीण ठरते. परंतु श्री. ढसाळ यांनी ही सारी माहिती मिळविली असल्याचे काही लेखांवरून दिसते.

शोषितांच्या दुःखाला वाचा फोडणारे तीन शाहीर या लेखात अण्णाभाऊ साठे, दत्ता गव्हाणकर आणि अमर शेख यांच्या कामगिरीचा आढावा घेतला आहे. महाराष्ट्रापासून ते आंतरराष्ट्रीय राजकारण याचा ऊहापोह श्री. ढसाळ यांनी या लेखात केला आहे. हे सारे वाचताना या बुद्धीची झेप किती व्यापक आहे ते दिसून येते. विज्ञानाची, अण्वस्त्रांची चर्चाही त्यांनी केली आहे.

कवी म्हणजे ललित साहित्यिक श्री. ढसाळ तरुण वयात प्रथम ओळखले जाऊ लागले ते कवी म्हणून. हा कवी लवकरच बंडखोर म्हणून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात चमकू लागला. कधी विविध सामाजिक प्रश्नांचा विश्लेषक म्हणून आता ओळखला जात आहे. त्यांची

खरी ओळख राहील ती बंडखोर म्हणून!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अनेक विषयांचा दांडगा अभ्यास होता. ते जिवंत असताना हा नामदेव त्यांना आढळला असता तर त्यांनी त्याचे नामांतर 'ज्ञानदेव' असे करून त्यांना आपल्या संग्रहातील अनेक ग्रंथ भेट म्हणून दिले असते. या नामांतर शब्दावरून एक घटना आठवली. ढसाळ यांचे (एकेकाळचे) सहकारी अविनाश महातेकर यांनी सांगितलेली. मराठवाडा विद्यापीठास आंबेडकर यांचे नाव देण्याच्या प्रश्नावरून फार मोठे आंदोलन महाराष्ट्रात पंचवीस वर्षांपूर्वी झाले. त्या आंदोलनाच्या प्रश्नाबाबत चर्चा करण्यासाठी काही कार्यकर्ते पुणे येथील हॉटेलात जमा झाले असता ढसाळ यांनी अचानक एक कविता उत्स्फूर्तपणे म्हणण्याचे सुरू केले आणि ती ऐकण्यासाठी होटेलच्या दालनात हजर असलेली सर्व मंडळी वेटर्सपासून नामदेवच्या भोवती जमा झाली आणि त्यांना नामदेवने काही काळ गुंगवून ठेवले होते!

श्री. ढसाळ सध्या मला अलग पडल्याचे दिसत असले तरी उद्याचे काय सांगावे? त्यांची प्रतिभा हेच त्यांचे मोठे शस्त्र आहे. एकेकाळी गुजरातचे लोककवी यांनी स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात आपल्या आवाजातील गीतांनी गावोगावी नवजागृतीची लाट निर्माण केली होती. तामीळनाडूचे कवी सुब्रह्मण्यम् हेही स्वातंत्र्याचे शाहीर म्हणून सर्वत्र नवीन लाट निर्माण करीत फिरत होते. 'चले जाव' आंदोलनाच्या काळात साने गुरुजी यांचे 'आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान' हे गीत दररोज स्वातंत्र्य लढ्यात तरुणांना खेचून आणत होते. कुसुमाग्रजांच्या मागे कुठली संघटना होती? परंतु 'गर्जा जयजयकार क्रांतीचा...' हे त्यांचे गीत त्या काळी प्रेरणागीत ठरले. विद्यार्थ्यांना, युवकांना वाटे की, या गीतांवर बंदी येणार म्हणून त्याच्या हस्तलिखित प्रती काढून भूमिगत आंदोलनातील बुलेटिन म्हणून विद्यार्थ्यांत 'गुप्तपणे' वाटत असत. कविवर्य ग. दि. माडगूळकरांच्या गीतांनीही तसेच काम ४२ साली केले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन तर अमर शेख, शाहीर गव्हाणकर, अण्णाभाऊ साठे, आत्माराम पाटील, प्रभृतींनी सतत पाच वर्षे पेटत ठेवले. त्यांच्या मागे पक्ष तरी उभा होता. पण शाहीर साबळे यांचे कलापथक तर अगदीच छोटे होते. पण त्यांच्या महाराष्ट्र गीताचे साद-पडसाद महाराष्ट्रभर उमटत

होते. महाराष्ट्राचा सिंह गर्जतो हे शब्द या शाहिराच्या तोंडून बाहेर पडताच ते ऐकणाऱ्याच्या अंगात सिंहाचे बळ खेळू लागे. अशी जादू श्री. ढसाळ यांच्या कवितांत आहे. गरिबांसाठी धडपडणे, बाबासाहेबांचा समतेचा संदेश सर्वत्र पसरविणे हे तर त्यांचे ब्रीद आहे. ते व्यासंगी वृत्तपत्र लेखकही असल्याचे या लेखसंग्रहावरून दिसते. त्यांची आजची भूमिका ही घायाळ झालेल्या वाघासारखी तात्पुरत्या तडजोडीसारखी आहे. एकाकी पडलेला हा वाघ परत तगडा होऊन सरसावला तर पुन्हा समाजात शक्ती निर्माण करू शकेल. आंध्र प्रदेशातील क्रांतिकारकांचे कवी गदर यांनी गोरगरिबांत नवीन शक्ती निर्माण केली आहे. हे उदाहरण आहे.

*(‘सर्व काही समष्टीसाठी’ - प्रस्तावना)*

❖❖❖

# नामदेव ढसाळ यांचे ललित गद्य

*नामदेव ढसाळ यांचे ललित गद्य लिखाणही सकस, जोरकस, निर्भिड होते. त्यांच्या 'सर्व काही समष्टीसाठी' ह्या पुस्तकातील काही उतारे-*

**बौद्ध धर्म : काही शेष प्रश्न**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्याच्या अंतिम टप्प्यात आपल्या लाखो अनुयायांसह जो बौद्ध धर्म स्वीकारला तो व्यक्तिगत मोक्षाचे साधन नव्हता हे पुन्हापुन्हा सांगणे आजही आवश्यक आहे. धर्म म्हटला की, त्यात ध्यानसाधनेला, तद्सदृश बाबींना अनन्यसाधारण महत्त्व असते. पारंपरिक बौद्ध धर्मांत तर ध्यानसाधना, विपश्यना, समाधी यासारख्या बाबींना अवास्तव महत्त्व दिले जाते. आंबेडकरी 'बौद्ध धर्म' या बाबींना अजिबात महत्त्व देत नाही. उपरोक्त धार्मिक धर्मकांडांच्या, निरर्थक स्वाध्यायांच्या गोष्टींपेक्षा बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा सामाजिक आशय आंबेडकरांना महत्त्वाचा वाटला. आजच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूल्यांचे अधिष्ठान समाजात असावे, त्यानुसार समाज घडला जावा, या कारणांसाठी आंबेडकरांनी बुद्धाच्या धम्माचा पुरस्कार केला. आंबेडकरांना समर्थ पुरोगामी विचार असणाऱ्या राजकीय पक्षाची स्थापन करायची होती, परंतु त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर दहा-बारा महिन्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांनी आणि अनुयायांनी स्थापन केलेला हा पक्ष म्हणजे शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची सुधारित आवृत्ती होती. काही जण असेही मानतात की, हिंदू कोड बिल नाकारल्यामुळे आंबेडकर धर्मांतराकडे वळले वगैरे. असे असते तर मग १९३५ साली धर्मांतरांची घोषणा त्यांनी केलीच नसती. बौद्ध धर्मात अध्यात्माचा मागमूसही नसल्याची उच्चरवाने तक्रारच केली आहे. ज्या धर्मात अध्यात्माचा विचार नाही तो धर्म कसा असू शकतो? असेच या पारंपरिक धर्मविचारवंतांचे म्हणणे आहे. डॉ. एस. राधाकृष्णन, बौद्ध धर्माचे मूळ ते उपनिषदांना समजतात.

बौद्ध धर्माच्या हल्ल्याचे पहिले लक्ष्य पांडित्यपूर्ण शिकवणूक हेच होते. गौतम बुद्धाने या शिकवणुकीवर जोरदार हल्ला केला. हे शिक्षण देणाऱ्या विद्यापीठांचे त्या काळी एक जाळेच पसरले होते. स्वतंत्र रीतीने विचार करण्याला या शिक्षणामुळे अडथळा निर्माण होत होता. काही परिपूर्ण विचारांवर आंधळी श्रद्धा ठेवली पाहिजे अशीच शिकवण ही विद्यापीठे देत होती. त्यामुळे प्रज्ञाहत होऊन मनुष्य स्वतंत्र्यपणे विचार करूच शकत नव्हता. बनारस येथील आपल्या अगदी पहिल्या प्रवचनात बुद्धाने म्हटले होते, 'कधीही न सुटणारे आणि कुठलाही लभ्यांश पदरात न टाकणारे हे सारे प्रश्न आपण आता बाजूला ठेवू या.' (या प्रश्नांना बुद्धाने 'अव्यक्तानी' अशी संज्ञा दिली आहे) आदि आणि अंत याबद्दलच्या प्रश्नांनाही बुद्धाने असेच संबोधिले आहे.

'मृत्युनंतर काय होते?' हा प्रश्न वारंवार विचारला जातो. बुद्ध - समकालीनांत यासंबंधी परस्परविरुद्ध दोन प्रकारची मते होती. एक मत शाश्वतवादी व दुसरे उच्छेदवादी. आत्मा अमर असल्यामुळे जीवन शाश्वत आहे. पुनर्जन्माचे जीवन पुढे चालू राहते हे शाश्वतवादी मानीत, तर मृत्यू म्हणजे सर्वनाश, मृत्युनंतर काहीच उरत नाही हा उच्छेदवाद्यांचा सिद्धान्त आहे. भगवान बुद्ध हा शाश्वतवादी नव्हता. कारण शाश्वतवादी पृथक आणि अमर अशा आत्म्यांचे अस्तित्व मानावे लागते. बुद्धाचा असे मानण्यास विरोध होता. बुद्ध उच्छेदवादीही नव्हते. बुद्धाने आपण आत्म्याचे अस्तित्व मानीत नसल्याने आपणाला उच्छेदवादी मानले जाते अशी तक्रार मज्झिम निकायाच्या अलगद्दुपम सुतात केलेली आहे. बुद्धाने म्हटले आहे, 'माझी शिकवण वेगळी आहे. काही श्रवण आणि ब्राह्मण चुकीने आणि अप्रामाणिकपणे माझ्यावर वास्तवतेच्या विरुद्ध खोटा आरोप करतात की मी उच्छेदवादी आहे.' खरे तर बुद्ध आपण उच्छेदवादी नाही असे कसे म्हणू शकतात याविषयी बाबासाहेबांनी बुद्ध आणि त्याच्या धम्मात आपले मत व्यक्त केले आहे.

## लोकपालचा अट्टाहास; हिंदू कोड बिलाचे काय?

सार्वभौम स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली देशाचे पहिले राष्ट्रीय सरकार अस्तित्वात आले. नेहरू

अत्याधुनिक राजकीय पुढारी होते. नेहरूंनी आपल्या सत्ताकाळाच्या पहिल्या टप्प्यात हिंदू संहिता विधेयक लोकसभेत पारित करून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने भूमिका घेतली. या हिंदू कोड बिलाचा दस्तऐवज म्हणून तयार करण्याच्या दृष्टीने देशाच्या घटनेचे शिल्पकार व तत्कालीन कायदेमंत्री डॉ. आंबेडकर यांच्यावर जबाबदारी सोपविली. प्रकृतिस्वास्थ्य चांगले नसतानाही आंबेडकरांनी अपार कष्ट घेऊन, रात्रीचा दिवस करून हिंदू कायद्याचे, प्राचीन हिंदू कायद्याचे परिशीलन करून हिंदू कोड बिलांचा खर्डा तयार केला. नेहरूंनी मोठ्या आवेशाने अशी घोषणा केली होती की, जर लोकसभेने हिंदू संहिता विधेयक स्वीकृत केले नाही तर आपले सरकार राजीनामा देईल. सरदार पटेल यांनी या विधेयकाला असलेला आपला विरोध उघड उघड बोलून दाखविला होता. नेहरूंनी आपले वजन या विधेयकांच्या बाजूने टाकले होते. सरदार पटेल आणि डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी आपले वजन उघडपणे विरुद्ध पारड्यात टाकले होते. विधेयकासंबंधी बोलताना पंडित ठाकूरदास भार्गव म्हणाले, ‘ह्या विधेयकाच्या कक्षेतून पंजाब गाळावा. हिंदूंनी शीख जमात हिंदू समाजात पचवून टाकण्याचा हा छुपा प्रयत्न आहे.’ लोकसभेला लोकांनी या बाबतीत आदेश दिलेला नाही. विरोधकांना उत्तर देताना आंबेडकर म्हणाले, ‘हिंदू संहिता सर्व हिंदुस्थानभर सारख्या स्वरूपात लागू करण्यात येईल.’

ब्रिटिश प्रिव्ही कौन्सिलने १९३० मध्ये शिखांना हिंदू निर्बंध लागू आहे असा निर्णय दिला आहे. ज्यांना दिवाणी संहिता (सिव्हिल कोड) पाहिजे होती त्यांना उद्देशून आंबेडकर म्हणाले, ‘‘हिंदू संहिता विधेयकाचे विरोधक रातोरात दिवाणी संहितेचे पुरस्कर्ते झाले हे पाहून आपल्याला आश्चर्य वाटते. त्यामुळे या देशाला चांगला निर्बंध असण्याविषयी त्यांच्या गंभीर हेतूचा नि पवित्र उद्देशाचा मला संशय येतो. निधर्मी राज्य म्हणजे धर्माचे उच्चाटन नव्हे. त्याचा अर्थ असा की, सरकारला लोकांवर अमुक एका धर्माची सक्ती करता येत नाही.’’ ‘‘लोकसभा ही सार्वभौम सत्ता असल्यामुळे ती कोणताही निर्बंध करण्यास अथवा रद्द करण्यास समर्थ आहे.’’ सप्टेंबर १९५१ मध्ये लोकसभेच्या अधिवेशनापर्यंत हिंदू संहिता स्थगित करण्यात आली. नवी दिल्ली येथील आंबेडकर भवनाची कोनशिला

बसवीत असताना एप्रिल १९५१ मध्ये त्यांनी मध्यवर्ती सरकारवर कडाडून हल्ला केला. मध्यवर्ती सरकार हे दलित वर्गाच्या हितासंबंधी अत्यंत उदास आहे. या आरोपांमुळे काँग्रेस पक्ष क्षुब्ध झाला. नेहरूंनी पत्राद्वारे तीव्र नापसंती दर्शविली. काही काँग्रेस नेत्यांनी मंत्रिमंडळात त्यांना ठेवू नये, अशी कुरकुर सुरू केली. इतर पक्षांचे नेते म्हणाले की, 'आंबेडकरांना आपली मते बोलून दाखविण्याचा पूर्ण अधिकार आहे.' दोन दिवसानंतर आंबेडकरांनी लोकांचे प्रतिनिधित्व (दुरुस्ती) विधेयक लोकसभेमध्ये मांडले. त्या विधेयकावर बोलताना काही सभासदांनी त्या विधेयकाचे कडवटपणे वर्णन केले आहे की, 'आंबेडकर आपणाला दलित वर्गाचे एकमेव उद्धारकर्ते समजून जास्तीत जास्त फायदा घेण्याच्या दृष्टीने हा निवडणुकीच्या पूर्वी चित्तवेधक पवित्रा टाकीत आहेत.'

''माझ्या रविवारच्या टोल्यापूर्वी हे विधेयक लोकसभेमध्ये मांडलेले होते.'' दुःखावेगाने ते आणखी म्हणाले, ''कपूर, तुमचा हल्ला चालूच ठेवा, गेली पंचवीस वर्षे मी अशा प्रकारांना तोंड देत आलो आहे.'' कपूरांनी प्रत्युत्तर केले की, 'डॉ. आंबेडकर हे जादा धीट आणि उद्धट गृहस्थ आहेत.' मंत्रिमंडळ पुन्हा बनविण्यासाठी परवानगी मिळाली म्हणून चालू अधिवेशनाच्या शेवटी पंतप्रधान नेहरू राष्ट्राध्यक्षांकडे आपला राजीनामा सादर करणार आहेत. आणि आपला आरोप पाठीमागे घेत नसाल तर राजीनामा द्या, असे त्यांनी आंबेडकरांना कळविले आहे. अशी त्या वेळी बातमी पसरली होती. गोष्टी या थराला गेल्या होत्या.

## दलित साहित्य आणि आंतरविरोध

दलित साहित्याची वैचारिक भूमी सकस असून निर्मितीच्या आविष्काराला प्रगल्भतेकडे घेऊन जाणारी होती. मराठी साहित्याची सातशे वर्षांची परंपरा, इतिहास, तपासला तर एरव्हीसुद्धा हाताच्या बोटांवर मोजण्या इतकेच लेखक-कवी वाङ्मयीन मूल्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या जपताना सापडतील. बाकी सगळी खोगीर भरतीच आहे. कुणी 'र' ला 'र', 'फ' ला 'फ' जोडून कविता लिहितात. कुणी चऱ्हाट वळावे तसे कथा-कादंबऱ्या लिहीत राहतात. दलितेतर लेखक कवींपेक्षा वाङ्मयीन मगदुराच्या अर्थाने दलित साहित्यिकांची हजारो पावले पुढे

असावीत एवढेच माझे म्हणणे आहे. साठच्या दशकातल्या साहित्यिक मगदूर असलेल्या लेखक-कवींना, मग ते लिट्ल मॅगझिनवाले असोत, दलित साहित्यवाले अथवा ग्रामीण लेखक अथवा सत्यकथेवाले वा त्या बाहेरचे अथवा भाबडे मार्क्सवादी, या सर्वांनाही अद्यापि मानवी वास्तवाकडे मराठी साहित्याला १०० टक्के नेता आले नाही. गेल्या ५० वर्षांत खालच्या जातिवर्गांमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढले. षड्‌विकारांचे आरोह, अवरोह, गंड, दंभ, द्वेष जोपासणारा आपल्याकडला समाज ही अस्पृश्यता नव्या अभिव्यक्तीवर लादतो.

सौंदर्यवाद, अभिजातवाद, गूढवाद, रोमँटिझम, वास्तववाद, दादावाद, अतिवास्तववाद, अभिव्यक्तिवाद, अस्तित्ववाद, मार्क्सवाद, फॉर्मालिझम, रूपवाद, संरचनावाद, मनोविश्लेषणात्मक साहित्यनिर्मिती आपल्याकडे झालीच नाही असे नाही. भाऊ पाध्ये, नेमाडे, सदानंद रेगे, दिलीप चित्रे, अरुण कोल्हटकर, मन्या ओक, सुर्वे, बाबुराव बागुल, दया पवार, प्रा. केशव मेश्राम यांनी कवी म्हणून लेखक म्हणून लिहिले. त्यातले बरेचसे एक-दोन पुस्तकांत संपले. चित्रकलेत पिकासो, सेझान वादाच्या आणि प्रयोगाच्या अर्थाने अष्टपैलू होते, कालातीत होते. स्वच्छंदवादाची, वास्तववादाची, धनवादाची, अभिजातवादाची, अतिवास्तववादाची सर्व लक्षणे त्यांच्यात सापडली.

### ...हे तर विस्तवाशी खेळणे!

पूर्वीच्या दंगलीत पोळून निघाल्यानंतर मुंबईतील समग्र समाजात (त्यात बहुसंख्य, अल्पसंख्य, हे दोघेही आले) सामाजिक सौहार्दाचे संबंध दृढमूल होत असतानाच आझाद मैदानातील घटना घडावी? इतकी आजच्या घडीला तरी दुसरी वाईट गोष्ट नाही. मुस्लीम समाजाचे जीवन-मरणाचे प्रश्न सोडविण्यासाठी लढून समाजातील मुख्य प्रवाहाशी अल्पसंख्य समाजाचे खऱ्याखुऱ्या भावासारखे स्नेहसंबंध प्रस्थापित करील असा ताकदीचा नेता आज मुस्लीम समाजात दिसत नाही.

धार्मिक स्वातंत्र्याचा गैरवापर होताना दिसतो. अल्पसंख्य समाज तर आपण बळी चाललो आहोत, आपणावर अन्याय होत आहे, अशी भावना करून अधिकाधिक फुटीरतावादी होताना दिसतो आहे. सर्व ज्वालाग्राही

परिस्थिती बदलण्याचे काम केंद्रातील, राज्यातील सत्ताधारी करताना दिसत नाहीत. मदरसा आणि धर्मस्थळातल्या धर्मकारभाऱ्यांच्याकडून त्यांना गावोगावी फुटीरतेचेच तत्त्वज्ञान कारण नसताना शिकवले जाते. त्याची परिणती ग्रामीण भागातल्या मुसलमान तरुणांना फुटीरतावादी बनविण्यात कारणीभूत ठरते. या सर्वांकडे कायदा, सुव्यवस्था ठेवणाऱ्या यंत्रणेकडून दुर्लक्ष केले गेले.

राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचे सरकार आहे. या दोन्ही पक्षांच्या लोकप्रतिनिधींना खेड्यापाड्यांतील समाजाच्या नसनाड्या माहिती आहेत. तरीसुद्धा अतिरेकीपणाचे दहशतवादाचे लोण खेड्यापाड्यांतील मुस्लीम समाजात पोहचावे? याचा अर्थच हे लोकप्रतिनिधी आपल्या सत्ता-राजकारणात मश्गुल आहेत.

'९/११' अमेरिकेवरील हल्ला असो वा आझाद मैदानावरील फुटीरवादी मुस्लीम तरुणांचा उद्रेक. याचा निषेध मुस्लीम समाजातील सुसंस्कृत व्यक्तींनी केला असला तरी तो तेवढा पुरा नाही. धर्मांध मुस्लिमांना आनंदाच्या उकळ्या फुटतात. आपल्या पोरांनी, लोकांनी हे घडवून आणले याचा वृथा अभिमान बाळगून आपल्या वस्त्यावस्त्यांतून ते विजयोन्मादी वृत्तीने वागतात.

चॅनेलवाल्यांच्या गाड्या जाळणे, पोलिस भगिनींवर हल्ला करणे, विनयभंग करणे, अपमानास्पद मारहाण करणे, न्याय आणि कायदा सुव्यवस्था भंग करू पाहणे, भर रस्त्यात जाळपोळ, पोलिसांसकट नागरिकांना मारहाण, अमरज्योतीसारखे शहीदांचे स्मारक उद्ध्वस्त करणे या कृत्याचे मुस्लीम समर्थन केले जाते याच्याइतके दुसरे दुर्दैव ते काय! लादेनने सगळे जग इस्लामी करण्याचे चुकीचे स्वप्न मुस्लीम समाजातील जमातवादी अस्मितेला चेतवून साकार करून पाहिले. त्याचेच आकर्षण खेड्यापाड्यातील मुस्लीम तरुणांना वाटते. 'इस्लाम खतरे मे' असे रात्रंदिन ओरडणाऱ्या मुल्लामौलवींमुळे या तरुणांची माथी भडकू लागलीयत. परिणामी दहशतवादी होण्याकडे त्यांचा कल आहे.

मुस्लिमांमधील दिवसेंदिवस प्रबळ होत चाललेल्या फुटीरतावादी भावनेचा नायनाट करायला हवा. हे तेव्हाच घडू शकेल जेव्हा मुस्लिमांचा विश्वास सत्ताधारी आणि विरोधक मिळवू शकतील.

## हिंदू कोड बिल आणि डॉ. आंबेडकर

डॉ. परमार यांनी आंबेडकरांना विचारले, ''संस्थापकांना लोकसभेत सभासद म्हणून येण्याची बंदी करावी काय?'' त्यावर विधिमंत्री आंबेडकर म्हणाले, ''पहिला इंग्रजी शब्दकोशकार डॉ. जॉन्सन यांनी सेवानिवृत्त नोकर म्हणजे सरकारचा दास अशी व्याख्या केली होती, परंतु त्यानंतर स्वतः त्याने सरकारी निवृत्तिवेतन स्वीकारले.'' त्यानंतर डॉ. परमार यांनी विचारले, ''राज्यकारभारातील सेवानिवृत्तांना ब्रिटिश लोकसभेचे सभासद होण्यास बंदी असते काय?'' आंबेडकर चटकन उद्गारले, ''नाही, उमराव आणि उन्मादग्रस्त यांनाच फक्त बंदी असते.''

मध्यंतरी काही राज्यांतील वरिष्ठ न्यायालयांच्या काही न्याय निर्णयामुळे, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या एका महत्त्वाच्या निर्णयामुळे राज्यघटनेतील पंधरावे कलम आणि कलम २९(२) याविषयी काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित झाले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबंधी, नोकरीच्या प्रवेशासंबंधी मद्रास सरकारने जी आज्ञा काढली ती सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. १९(२) ३१ ही भाषणस्वातंत्र्य आणि मालमत्ता यासंबंधी असलेली कलमे न्यायालयातून बेकायदेशीर ठरविली गेली. सरकारने राज्यघटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत मांडले. आंबेडकर कोणते मत देतात याकडे सर्वांचे लक्ष केंद्रिभूत झाले. आंबेडकर त्या दुरुस्तीच्या बाजूने बोलावयास उठले. २९(२) कलमात असे म्हटले होते की, केवळ धर्म, जात, वंश या कारणांमुळे, कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये कुठल्याही नागरिकाला प्रवेश नाकारण्यात येणार नाही. कलम ४६ ने दुबळ्या वर्गाचे हित करण्याची सरकारला आज्ञा दिलेली आहे. जर कलम ४६ फलद्रूप व्हायचे असेल तर कलम १६(४), २९(२) यांत दुरुस्ती केली पाहिजे असे ते म्हणाले.

कलम १९(२) यात तीन अधिक नियंत्रणे घालण्याची आवश्यकता निर्माण झाली. भाषण, स्वातंत्र्य, सार्वजनिक शांतता, गुन्ह्याला प्रोत्साहन, परराष्ट्रांशी असलेले संबंध या बाबतीत सरकारला निर्बंध करायला परवानगी असावी. याही दुरुस्तीला आंबेडकरांनी पाठिंबा दिला. आंबेडकरांच्या वक्तृत्वप्रचुर भाषणाचा परिणाम सभासदांवर झाल्यामुळेच प्रस्तावाच्या बाजूने प्रचंड बहुमत पडले. एका वार्ताहाराने त्या तेजस्वी

भाषणाचे वर्णन करताना म्हटले की, ''आंबेडकरांच्या भाषणाचा उपसंहार हा आजवर लोकसभेत झालेल्या वादविवादामध्ये श्रेष्ठ दर्जाचा गणला जाईल. घटनादुरुस्तीच्या बाजूने आंबेडकरांनी सरकारला पाठिंबा दिला म्हणून त्यांना काहींनी दोष दिलाच.

## मराठी वाङ्मयीन पर्यावरणावर झालेले परिणाम

दलित साहित्यातली कालची पूर्वअट, नकार, विद्रोह, विज्ञान होते. खरेच दलित साहित्याने किती वाटचाल केली? दलित साहित्यातल्या नकाराने विधायकतेला आत्मसात केले नाही. विद्रोह ही फेज असते. त्यानंतर नवे रचण्याचा, घडविण्याचा सोस पुढे यायला हवा, वैज्ञानिक अर्थाने दलित साहित्याला अपटुडेट होता आले नाही. विज्ञानाचा आग्रह धरता धरता दलित साहित्यिक पुन्हा गूढवादाकडे, अज्ञेयतेकडे आणि अदृश्य कर्मविपाकाच्या अभिव्यक्तीकडे झुकले. निर्मिती-सर्जनापेक्षा तात्त्विक भाष्यकार होणे दलित लेखक-कवींना आवडू लागले. माणसातले सर्व सुष्ट-दुष्ट असलेले दलित साहित्य आता तिच्याकडे पाठ फिरवताना दिसते. साहित्य पुन्हा परंपरावाद्यांसारखे नव्या जाणिवांना जीर्णवादी बनवू लागले आहे. अभिजातवाद, अध्यात्मवाद, अद्वैत, वेदान्त, चैतन्यवाद यात पुन्हा गुरफटू लागले आहे. हे घडले आत्मनिष्ठतेमुळे. पुन्हा कोंडी दलित साहित्यिक तोडू शकतील काय? दलित साहित्यिक म्हणा वा सम्यक साहित्यिक, स्वतःच निर्माण केलेल्या मूलतत्त्ववादातून, संकुचितपणातून बाहेर पडू शकतील?

१९२० ते १९४२ चा हा जवळजवळ २२ वर्षांचा काळ वाङ्मयीन पर्यावरणाच्या दृष्टीने पाहण्यासारखा आहे. या काळात सामाजिक प्रगतीचा 'ड्रायव्हिंग फोर्स' म्हणून मध्यमवर्गांची ऐतिहासिक भूमिका नष्ट होऊन मध्यमवर्गाचे वर्चस्व संपुष्टात येऊन तो उदासीन बनू लागला होता.

१७व्या शतकातील रशियातील समाजसत्तावादी क्रांतीने तिची पळवाट तयार केली. फ्रेंच राज्यक्रांतीने या जगात घडून गेलेल्या अपरिहार्य क्रांतीचे परिणाम जगभरातील देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पर्यावरणावर होत राहिले. मराठी साहित्यातून प्रभावशून्य राहू शकले नाही. त्या सामाजिक प्रश्नाला पहिल्या महायुद्धानंतर चालना मिळाली.

## विठ्ठलाचा प्रपंच

आपल्याकडील इतिहास संशोधक मंडळी मुख्यतः स्थितिवादी, परंपरावादी, अप्रत्यक्षरीत्या सनातनी दृष्टीची आहेत. ही वैष्णवी संप्रदायात मोडणाऱ्या वारकरी पंथाविषयी निःपक्षपाती लिहिताना दिसत नाहीत. अद्वैत वैचारिक अधिष्ठान असतानाही वारकरी संप्रदाय मनाची पकड कसा घेऊ शकला? वारकरी संप्रदायाच्या स्थापनेचे श्रेय पुंडलिकाला द्यायचे की माउलीला म्हणजे ज्ञानेश्वररायाला याचे निर्भीड विवेचन आजवर तरी कुणी केल्याचे दिसत नाही. ज्यांनी ते केले ते एकतर्फी आहे. अशाच एका विद्धानाचे निर्जीव विवेचन देत आहे - पांडुरंगस्वरूपी किंवा विठ्ठलस्वरूपी भगवान श्रीकृष्ण हे या संप्रदायाचे मुख्य उपास्य दैवत आहेत. श्रीमद्‌भागवत हा या संप्रदायाचा परम आदरणीय ग्रंथ आहे. गीता ही श्रीकृष्णाने आपल्या प्रिय भक्ताला सांगितलेली असल्याने श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी गीतेवर अद्धितीय टीकाग्रंथ (ज्ञानेश्वरी) लिहिला. भागवताच्या एकादश स्कंधावरील एकनाथ महाराजांचे रसाळ भाष्य (एकनाथ भागवत) हा ग्रंथही या संप्रदायात ज्ञानेश्वरी इतकाच प्रमाणभूत आहे.

१४व्या शतकापर्यंत वारकरी संप्रदाय बराच दृढमूल झाला. विजयनगरच्या रामराजाने वारकऱ्यांचे परम दैवत पंढरपुरातून अनागोंदी येथे नेऊन प्रस्थापित केले. आषाढीच्या यात्रेसाठी भक्तजनांत या प्रकाराने मोठा हाहाकार झाला. आपल्या भक्तिबळाने राजास प्रभावित करून कार्तिकी पौर्णिमेला पांडुरंगाला वाजतगाजत पंढरीला आणले. तेव्हापासून यात्रेला विशेष महत्त्व आले. वारकरी या संप्रदायानुसार ‘वारकरी’ शब्दाचा हा अर्थ घेतला, वर्षातून आषाढी कार्तिकी एकादशीला जे पंढरपूरची वारी दिंडीसह करतात ते वारकरी. कृष्णभक्तीची तीव्र आस आहे. तुळशीची माळा संप्रदायाची दीक्षा घेणाऱ्यांसाठी आवश्यक माळा धारण केल्यामुळे या भक्ताला माळकरी म्हणूनही संबोधले जाते. संप्रदायाचे संस्थापकपद ज्ञानेश्वरांना दिले जाते. मग प्रश्न उद्‌भवतो पुंडलिकाच्या संदर्भाचा. हा पंथ सार्वत्रिक करणाऱ्या नामदेवाचा आहे. ज्ञानोबांचे गुरू त्यांचे ज्येष्ठ बंधू निवृत्तीनाथ हे नाथपंथी होते. या नाथपंथाच्या संकल्पना न स्वीकारता चक्क आद्य शंकराचार्यांनी सांगितलेल्या अद्वैताकडे माउली वळतात कसे?

वारकरी संप्रदायातला तत्त्वज्ञानात्मक संघर्ष बहुजन समाजाने स्वीकारला. त्यामुळे संघर्ष मागे पडून पुढे या संप्रदायाला रूप आले ते मानवधर्माचे. शंकराने पार्वतीला गूढ अध्यात्माचा उपदेश केला. त्याचा उद्‌गार म्हणजे शैवपंथ-माउलींनी एकदम त्याचे उत्तरदायित्व नाकारून वैष्णवाची पताका खांद्यावर घ्यावी हे आश्चर्य वाटते. ज्ञानोबांच्या समाधिस्थ होण्यानंतर त्यांचे एकेक भावंड समाधिस्थ होऊन इहलोकीची यात्रा संपवत गेले. संप्रदाय वाढविला नामदेवांनी. त्यानंतर तीनशे-चारशे वर्षांनी एकनाथ व तुकारामांनी अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीपासून मोगलशाह्या, आदिलशाह्या, निजामशाह्यांच्या राजवटीच्या बंधनांना झुगारून हा वारकरी संप्रदाय हृषिकेशवरून हिमाचलातून जन्म पावलेल्या गंगेसारखा पुढे पुढे चालत राहिला. शोषित कष्टकरी समाजाने वारकरी संप्रदायाचा केलेला स्वीकार आणि स्वतःच्या खांद्यावरून या संप्रदायाची वाहिलेली पालखी ही आहे.

बहुजन समाजाचे पंढरीशी आंतरिक नाते आहे. पंढरीतील पांडुरंग विठ्ठल विठोबा. विठाई महाराष्ट्रासोबत आंध्र, कर्नाटकातल्याही बहुजन समाजाचे द्रष्टे दैवत. स्वकीय असोत अथवा परकीय राज्यकर्ते (मुस्लीम), त्यांनीसुद्धा जाती, प्रथा नि रूढी संकेतांना निरंकुश मान्यता दिली होती. धर्मशास्त्राने घालून दिलेल्या मर्यादा उल्लंघणे सर्वसामान्यांसाठी दैववशातच नव्हे तर निजी जीवनातही दुरापास्त होते. ज्ञानार्जनाचा सर्वस्वी अधिकार ब्राह्मण जातीपुरता मर्यादित होता. शूद्रातिशूद्रांना धर्मशास्त्राचा आधार घेऊन ब्रह्म, ईश्वर, मोक्ष, मुक्ती कर्मकांडाच्या नावाखाली भरडून काढले जात होते. या सर्वांविरुद्ध म्हटले तर प्रतीकात्मक, म्हटले तर साक्षात् बंड म्हणजे वारकरी संप्रदाय होता. संप्रदायाचे प्रवक्तेपण तसे ज्ञानेश्वरांकडे जात असेल तरी खऱ्या अर्थाने ही चळवळ बहुजन समाजापर्यंत पोहचविण्याचे काम संत तुकाराम यांनीच केले. वारकरी संप्रदायाने एकमुखी मान्यतेने हा प्रयत्न स्वीकारला नाही. बोटांवर मोजण्याइतक्या संतांपुरताच तो तत्त्वज्ञानाचा, धर्मशास्त्राचा भाग म्हणून राहिला. जरी वेदे बहुत बोलले। विविध भेद सुचिले। तऱ्ही आपण हित आपुले। तेचि घेणे। तैसे ज्ञानिये जे होती। ते वेदार्थंति विचारिती।- असे ज्ञानेश्वरांनी सांगितल्यानंतरही नामदेवांच्या विठ्ठलाने या वेदोपनिषदांना लंघून, उच्च-

हीन कुळाचे अंतर तोडून माणसामाणसात सेतु बांधला. जादूटोणा, जारणमारण, अंधश्रद्धा, होमहवन, कर्मकांड, बुवाबाजी, मूठ मारणे, मिरची मोहरी, कावळा, घुबड, शकुनापशकुन या सर्वांना ओलांडून वारकरी संप्रदाय पुढे गेला.

भक्त विठोबाचे भोळे। त्यांचे पायी ज्ञान लोळे। भक्तिविण शब्दज्ञान। व्यर्थ अवघे ते जाण। ब्रह्मज्ञानाविण मोक्ष आहे भूती। वाचेसि म्हणती विठ्ठल नामा! वेदप्रामाण्याची साधकबाधक चर्चा आपापल्या बौद्धिक आणि सदसद्विवेकी मगदुराप्रमाणे संतांनीही केली आहे. चोखोबांच्या बंडखोर मुलाने या सर्वांवरच कडवी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. तो विद्रोहाचा अवतारच होता. त्याने विठ्ठलालाही वेठीस धरले.

## समान नागरी कायदा आणि अडसर

ब्रिटिशांच्या हातात सत्ता येण्यापूर्वी आपल्या देशात विविध जातिधर्म प्रदेशात भिन्न कायदेकानून होते. मराठ्यांच्या व शिखांच्या वर्चस्वाखाली असलेल्या प्रदेशातही हाच प्रकार होता. येथे मुस्लीम कायदेकानून नव्हते. स्वतःचेच होते. कायद्याच्या नजरेतून सर्व सारखे अशी त्या वेळी न्यायसंस्थेची व्याख्या नव्हती. नागरी कायदा संहिता १९५९/भारतीय दंड संहिता १८६०/गुन्हेगारी प्रक्रिया संहिता १८६१ आणि साक्षअधिनियम १८७२ इत्यादी कायदे ब्रिटिशांनी आणल्यामुळे हिंदू-मुस्लीम दोघाही धर्मीयांना याचा जबर फटका बसला आहे. त्यांच्या धर्माधिष्ठित वैयक्तिक कायद्यावरही परिणाम झाला. १९व्या शतकात राजा राममोहन रॉय यांनी सतीच्या चालीविरुद्ध चळवळ केली होती. याचे परिणाम १९२९ मध्ये ब्रिटिशांनी सतीच्या चालीविरुद्ध कायदा बनवला. सतीची प्रथा ही अमानुष आहे. ईश्वरचंद विद्यासागर यांनीही राजा राममोहन रॉयप्रमाणे चळवळी केल्यामुळे १८५६ मध्ये विधवा विवाह कायदा बनला. यालाही सनातन्यांचा कडवा विरोध झाला. १८९१ मध्ये हिंदुस्थानी दंड संहितेत ३७५ अन्वये संशोधन करून स्त्री-पुरुष संबंधातल्या स्त्री व्यक्तीचे वय निश्चित ठरवण्याची तजवीज करण्यात आली होती. १२ वर्षांपेक्षा लहान असलेल्या मुलीवर असा प्रसंग आला तर त्याला बलात्कार समजावे, अशी यात तरतूद होती. यामुळे हिंदूंच्या बालविवाह प्रथेवर

बंधन येणार होते. याही वेळी हिंदू सनातन्यांनी आकाशपाताळ एक केले. या कायद्याविरुद्धचे नेतृत्व स्वतः लोकमान्य टिळक आणि त्यांच्या संप्रदायाने केले. त्यांच्या विरोधात होते ते न्या. महादेव गोविंद रानडे आणि गोपाळ कृष्ण गोखले. त्यांनी समर्थन दिल्याने बालविवाहविरोधी कायदा संमत झाला. हिंदू धर्मात राजा राममोहन रॉय, रानडे, गोखले, आगरकर, जोतिबा फुले यांसारखे समाजसुधारक होते. मुस्लीम धर्मात समाजसुधारणांना त्या वेळीही वाव नव्हता. मुस्लीम समाजाचे भवितव्य त्याहीवेळी मौला-मौलवींच्या हाती होते. मोर्ले मिंटो सुधारणांच्या नंतर मुस्लिमांतील कट्टरपंथीयांनी शरीयतच्या पालनावर व संरक्षणावर अधिक भर दिला. १९०६मध्ये याच कारणासाठी मुस्लीम लीगचा जन्म झाला.

१९१२ मध्ये भूपेंद्र बसूंनी विवाह कायद्यात दुरुस्त्या सुचवणारे विधेयक संसदेपुढे ठेवले होते. कुठल्याही जाती-धर्मांच्या, युवक-युवतींना आपल्या इच्छेनुसार विवाह करता यावा, हा याचा उद्देश होता. कट्टर हिंदू-मुस्लिमांचा या दुरुस्तीला कडवा विरोध होता. या दुरुस्तीच्या विधेयकाला जिनांनी समर्थन देऊन मुस्लीम कट्टरपंथीयांवर कठोर टीका केली होती. १९३७ मध्ये हिंदुस्थानात सुधारित शरीयतचा कायदा बनवला गेला. तेव्हापासून आजपर्यंत या कायद्याला त्यानंतर धक्का कुणीच लावला नाही. सर्व धर्मीयांनी आपल्या रूढी-रिवाजांप्रमाणे जीवन जगावे, त्यांच्या कुठल्याही धर्मांच्या वैयक्तिक कायद्यावर बंधन आणता कामा नये, त्यात सुधारणा केल्या जाव्यात, या मतांची ही मंडळी होती. महापंडित पी. व्ही. काणे, सर रंगनाथ झा, श्रीधर शास्त्री इत्यादी हिंदू विद्वानांनी हिंदू कायद्यात काळानुसार बदल व्हावेत या जाणिवेने १९२४-२५ मध्ये एक विधेयक आणण्याचा प्रयत्न केला. परंतु यासाठी १९४१ मध्ये उजाडावे लागले. हिंदू कायद्यात ते बदल करू इच्छित होते. त्यांनी केलेल्या शिफारसी संसदेत विचारार्थ ठेवल्या गेलेल्या होत्या. १५ ऑगस्ट १९४७ नंतर या समितीचे रूपांतर घटना समितीत झाले. हा सर्व दस्तऐवज घटना समितीचे लेखन मसुद्याचे अध्यक्ष व तत्कालीन केंद्रीय विधी-न्यायमंत्री असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपुढे ठेवला गेला. हिंदुस्थानी राजकारणाच्या इतिहासात ‘हिंदू कोड बिल’च्या नावाने हे प्रकरण प्रचंड गाजले. तेव्हा सनातनी हिंदूंनी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या नेतृत्वाखाली

एकत्र येऊन हे बिल मोडीत काढले. सनातन्यांनी हे बिल पूर्णतः समंत होऊ नये म्हणून घटनेतील ४४व्या अनुच्छेदाचा आसरा घेऊन समान नागरी कायद्याचीही चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न चालवला होता. यावेळी बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते; ‘हिंदू कोड ही वेगळी गोष्ट आहे आणि समान नागरी कायदा ही त्याहून भिन्न आहे. या दोघांची सरमिसळ करू नका.’

## खांडेकरांचा स्वप्नरंजनवाद, कुसुमाग्रजांचा उदारमतवाद

१९३० नंतर मराठी वाङ्मयात फडके, खांडेकरांचे युग अवतरले. दलितांच्या उद्धाराला, मध्यमवर्गाच्या विकासाला आणि सामाजिक प्रगतीला पोषक ठरतील अशा तत्त्वांची उद्दिष्टे खांडेकरांच्या लेखनामागे होती. खांडेकरांच्या कथा, कादंबऱ्यांचे नायक व्यावहारिक पातळीच्या जीवनसंग्रामात अयशस्वी झाल्याचे दिसतात. श्रीमंतांच्या हाकेला ओ देऊन जन्माचा जोडीदार न निवडता स्त्रीने फक्त हृदयाच्या हाकेला ओ द्यावी. (हृदयाची हाक) शहराची सुधारणा करून देशाची उन्नती करणे हा कांचनमृग आहे. खेडी सुधारली तर देश सुधारेल (कांचनमृग) उद्याचे नवे जग सुखी व्हायचे असेल तर जीवनात भोग, त्याग, काव्य आणि कृती, बुद्धी आणि भावना यांच्यात सुंदर मेळ पडला पाहिजे. (क्रौंचवध)... खांडेकरांच्या साहित्याची चिकित्सा आपणाला आदर्शवादी मूल्यांपर्यंत आणून सोडते. जीवन प्रत्यक्ष कसे आहे, त्यापेक्षा कसे असावे हा त्यांचा आदर्शवाद हे स्वप्नरंजन असते. खांडेकर परंपरेला आगरकर व लोकहितवादी, फुले ते आंबेडकर, आंबेडकर ते मार्क्स स्वप्नरंजनामुळे नीट स्पर्शताही आले नाहीत. कुसुमाग्रज ‘विशाखा’ या पहिल्या कवितासंग्रहात दिसतात. विशाखाची प्रस्तावना खांडेकरांनी लिहिली. तिचा शेवट करताना ते म्हणतात, ‘वाङ्मयीन मूल्यांचा काथ्याकूट करणारे, या संग्रहात हवे तेवढे दोष काढोत. शेक्सपियरचे दोनशे टीकाकार वाचून हल्लीचे मराठी वाङ्मय निःसत्त्व आहे असा आक्रोश करणारे प्राध्यापक या संग्रहाविषयी काहीही म्हणोत; काव्यपंथातल्या पुढल्या प्रवासातही खालील ओळी गात राहा,’

*कोट्यवधी जगतात जीवाणू जगती अन् मरती*

*जशी ती गवताची पाती*
*नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभांखाली*
*निर्मिती नवक्षितिजे पुढती*
*चला उभारा शुभ्र शिडे ही गर्वाने वरती*
*कथा या खुळ्या सागराला*
*अनंत आमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा*
*किनारा तुला पामराला*

खांडेकरांच्या स्वप्नरंजनवादाचा वारसा कुसुमाग्रजांनी किती घेतला, 'विशाखा'तील जाणिवेची कविता त्यांच्या उदारमतवादाचे उदाहरण होऊ शकते. 'सहानुभूती' या कवितेत ते म्हणतात,

*उभे भवती प्रसाद गगनभेदी*
*पथी लोकांची होय दाट गर्दी*
*दौलतीची नीत चालते दिवाळी*

या पहिल्या कडव्यानंतर रस्त्यात भीक मागणाऱ्या अपंगाचे वर्णन करून शेवटच्या कडव्यात म्हणतात,

*म्हणे राहीन दीन एक मी उपाशी*
*परि लाभू दे दोन घास याशी*
*चालू लागे तो दीनबंधू वाट*
*आणि धनिकांची वाहने पथात*
*जात होती ती आपुल्या नादात*

कोणी एक सहृदय माणूस भुकेल्या अपंगाच्या ओंजळीत जे टाकतो तिथे कवी तटस्थ होऊन त्या घटनेचे वर्णन करतो-अपंगाच्या ओंजळीत तो स्वतः खिशातले आपल्या श्रमाने मिळवलेले काही टाकताना दिसत नाही. एक हृदयभेदक दृश्य उभे करतो आणि कवी तटस्थ होऊन दृश्य टिपतो. उदारमतवादी माणसाच्या ज्या मर्यादा असतात त्या कुसुमाग्रज आपल्या कवितेतून सांगून जातात. केशवसुतांच्या काळापासून तो १९६० पर्यंत मराठी कवितेवर रोमँटिसिझमचा प्रभाव राहिला. सावरकर, कवी गोविंद आणि कुसुमाग्रज, दादासाहेब गायकवाड ही नाशिकच्या मातीतून मराठी साहित्य आणि समाजप्रवाहात मिळालेली अलौकिक रत्ने होती.

## कुठे आहे पुरोगामी महाराष्ट्र?

डॉ. नरेंद्र दाभोलकर-सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतील एक अग्रगण्य नेते होते. नेते म्हणण्यापेक्षा त्यांना झुंजारू क्रियाशील चळवळे, मुख्य कार्यकर्ते म्हणणेच अधिक सयुक्तिक होय. गेली चाळीस वर्षे त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी अभियान चालविले. महाराष्ट्रातील जवळजवळ चाळीस हजारांहून अधिक असलेल्या गावांपर्यंत त्यांची चळवळ पसरली.

डॉ. दाभोळकर हे खऱ्या अर्थाने सामाजिक सुधारक होते. डॉ. दाभोळकर अशी दुटप्पी भूमिका घेणारे नव्हते. समष्टीला विधायक द्रष्टेपणा देणारा आहे. राष्ट्रसेवा दलाने त्यांना मानव्याची दिलेली दीक्षा, यातून घडलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व, कबड्डीसारख्या खेळात त्यांनी मिळविलेले नाव, जीवनाकडे खिलाडू वृत्तीने पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन होता. सामाजिक चळवळीच्या कार्यकर्त्यांना उद्युक्त करणारी, त्यांनी उभारलेली निर्णायक लढाई धोकादायक होती. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने त्यांनी धर्ममार्तंड ढोंगीबुवा यांच्या विरुद्ध युद्ध पुकारले. चारशेपेक्षाही अधिक ढोंगी बुवांच्या भोंदूगिरीचा पर्दाफाश केला. त्यामुळे त्यांच्यावर अनेकदा जीवघेणे हल्ले झाले. शिंगणापुरातील त्यांच्यावर झालेला हल्ला असो अथवा अकोला जिल्ह्यातील काळे फासणे असो, दाभोळकर या प्रसंगांनी कधीच विचलित झाले नाहीत आणि निराश होऊन त्यांनी आपले कार्यही थांबविले नाही.

दाभोळकर विज्ञानाधिष्ठित लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनोनित केलेल्या सामाजिक लोकशाहीच्या प्रस्थापनेची अधिक ओढ होती. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीच्या निकडीतून ते धर्मचिकित्सेकडे वळले. धर्मनिरपेक्षवादाकडे आणि शेवटी मानवतावादाकडे. ते जाणत होते, आपल्या सार्वभौम स्वातंत्र्याची ६७ वर्षे उलटून गेल्यानंतरही आपला समाज मध्ययुगातल्या मानसिकतेतच अडकून पडला आहे. जगातले पाच-सहा मुख्य धर्म व सहा हजार उपजाती आणि आठशे मुख्य जाती यात हिंदुस्थानी समाज वाटला आहे. धर्म, संस्कृती, परंपरा यांच्या शोषणातून आणि दास्यातून या माणसाची सुटका करायची असेल.

पुरोगामी महाराष्ट्राची दाभोळकरांच्या हत्येमुळे कधीही भरून न

येणारी अशी हानी झाली आहे. कायम अर्थाने पुरोगामी कधी होती? ज्ञानोबारायाला आणि त्यांच्या भावंडांना अनाथ करून सोडणारा धर्ममार्तंड महाराष्ट्र. तुकोबाचा बळी घेणारा आणि गाथा इंद्रायणीत बुडविणारा महाराष्ट्र, चोखोबाला विठ्ठल मंदिराच्या पायरीखाली छिनून मारणारा महाराष्ट्र तेव्हाही प्रतिगामीच होता. अर्वाचीन महाराष्ट्रात ब्रिटिश राज्यकर्ते होते म्हणूनच सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला अभय मिळाले. आता एतद्देशीयांचे राज्य आहे. पण जातकलह, धर्मकलह चालूच आहेत.

## आता दलित शोषित जनताच देशाला वाचवेल!

केंद्रात ज्यांची सत्ता असते त्यांच्या पाच वर्षांच्या सत्ताकाळात किमान दोन वेळा तरी सत्ताधाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मता परिषद (एन.आय.सी.) भरवावी लागते. मुझफ्फर नगरची जातीय म्हणा. धार्मिक दंगल. ती सुरू होण्यासाठी किरकोळ कारणाचे निमित्त होते. मुझफ्फर नगर अगोदर याच स्वरूपाची रमण सिंगांच्या राज्यातील दंगल, त्याअगोदर आंध्र प्रदेशातील दंगल, काश्मीरमधील दंगल तर किती अचानक किरकोळ कारणांनी पेटली. या दंगलीमागचे पक्ष पुढारी एकाच पक्षाचे नाहीत. सर्वच पक्षांचे आहेत. प्रसंगी घातपातापर्यंत विरोधकांची, असंतुष्टांची मजल जाते. एवढेच कशाला केंद्रात ज्यांची सत्ता असते त्यांनी नेमलेले बारगीर एवढ्या अवैधानिक उचापती करत असतात की, या देशात भांडवली लोकशाहीचे राज्य आहे की हुकूमशाही, लष्करशाहीचे समर्थन करणाऱ्यांचे आहे हेच कळत नाही. कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्याची जबाबदारी राज्य सरकार टाळू शकत नाही. निवडणुकांच्या विजयासाठी राजकीय पक्षांनी अशा घटनांचे उदात्तीकरण करू नये. त्याने कोणालाच फायदा होणार नाही. असे राजकीय पक्ष, व्यक्ती दोषी आढळले तर त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. प्रत्येक ठिकाणी उद्‌भवणारी दंगल, त्यासाठी वापरले जाणारे लष्कर, एक दिवस याचा लष्करी कारवायांतून एखादा लष्करशहा पैदा झाला तर कुणाला जबाबदार धरायचे? सोमवारच्या या परिषदेचा गाजावाजा झाला नि सूपही वाजले. दलित शोषित जनतेलाच या दृष्टीने जबाबदारी राज्यकर्त्यांनी घ्यायला हवी.

## हा देश आपुला आहे म्हणून

'शासनकर्ता' जमात होण्याच्या नादात आज आंबेडकरी समाज, त्याचे राजीकय पक्ष, पुढारी, संघटना एवढ्या वाहवत चालल्या आहेत की, त्यामुळे दलितांच्या अस्तित्वाच्या दृष्टीने, भवितव्याच्या दृष्टीने मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. ब्रिटिशकालीन हिंदुस्थानात प्रत्यक्ष उपरोक्त मागणी आणि त्यासाठी राजकीय चळवळ डॉ. बाबासाहेबांनी सातत्याने केली किंवा त्यांना करावी लागली. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र शासनकर्ती जमात होण्याच्या दृष्टीने विधिमंडळ, संसद यावर दलित माणसाने निवडून जावे, यासाठी त्यांनी संविधानात तरतुदी करून ठेवल्या. शासकीय नोकरीत आणि शिक्षणात जे आरक्षण दलित माणसाच्या ऐहिक उत्कर्षासाठी दिले गेले. त्याचसोबत राखीव जागांच्या संकल्पनेनुसार विधिमंडळात, संसदेत दलित समाजाचे प्रतिनिधित्व कारण्याचेही संविधानाद्वारे अधिकार दिले. हे अधिकार असताना ब्रिटिशकालीन उपरोक्त मागणीसाठी मागे जावे कशाकरिता? राजकीय पक्षांचे एकमेव उद्दिष्ट दलितोद्धाराचे नसतेच मुळी. काँग्रेस पक्ष समग्र जनतेसाठी असल्याचे भासवतो. निवडणुक निकालांती बहुमत मिळाले तर स्वतःचे सरकार स्थापन करतो. पण सरकारचा अजेंडा मात्र एकमेव दलित उद्धाराचा नसतो. स्वतःला निधर्मी म्हणणारा, समाजवादाच्या घोषणा देणारा, चौसष्ट वर्षांच्या निवडणुकीच्या राजकारणात तावून सुलाखून निघालेला काँग्रेस पक्ष समस्त दलित शोषित समाजाचे भवितव्य घडविण्यासाठी संपूर्णतः राबत नसतो. चौसष्ट वर्षांच्या देशातील सार्वभौम स्वतंत्र सत्ताराजकारणाच्या पटलावर या डाव्यांची संख्या नगण्य असते. कारण जनतेत कष्टकरी-दलित शोषित जनतेत यांचे स्थानच उरलेले नसते. निवडणूक इच्छुक दलित पक्ष संघटनांची शोकांतिका होऊन जाते. खरेच निवडणुका न लढविता दलित समाजाला आपले भवितव्य घडविता येणार नाही का? याचा विचार आज आंबेडकरी चळवळीतील कोणीही करू शकण्याच्या मूडमध्ये नाहीत. संविधानाने अधिकार देऊनही ही अशी परिस्थिती. राजकीय अस्मिता दाखवावी. तर खैरलांजीसारखी घटना ओढवून घ्यावी. खैरलांजीच्या अमानुष घटनेनंतर रोज खैरलांजी घडत आहे. खैरलांजीच्या घटनेपासून राज्यात दरेक दिवशी दलितांवर अत्याचार

अन्याय घडताहेत. या देशावर अस्पृश्योद्धारक डॉ. आंबेडकरांनी खरे प्रेम केले. त्यांची देशभक्ती अधिक खरी होती म्हणून फुटीरतेची भूमिका कधी घेतली नाही. नाहीतर पाकिस्तानपूर्वीच दलितस्तान निर्माण झाले असते.

दलित पँथरमध्येही अशा अलगतावादी प्रवृत्ती होत्या. परंतु त्यांना त्या काळी असे अलगतावादी दलित राजकारण करण्यात यश आले नाही. कारण आमच्यासारखे सच्चे आंबेडकरवादी त्यांच्या पुढ्यात आव्हानासारखे उभे होते. आंबेडकर चळवळीतल्या पक्ष संघटनांची शोकांतिका लक्षात घेऊन, त्यांच्या मर्यादा ओळखून त्यांच्या लुटपुटीच्या लढाईच्या वल्गनांत न अडकता अन्याय, अत्याचाराच्या मैदानात उतरुन स्वतः मुकाबला करा. पँथरसारखी पुनःश्च 'टिट फॉर टॅट' अशी भूमिका घेतल्याशिवाय अत्याचार थांबणार नाहीत.

## आज भगवान बुद्ध असते तर!

बुद्धगयेतील बॉम्बस्फोट मालिका प्रकरणाला एक महिन्याहून अधिक काळ झाला आहे. धर्माचे एक मुख्य पवित्र स्थळ आहे. बुद्धगया हे जागतिक बौद्धधर्मीयांचे धर्मपीठच आहे. हा परिसर जगातील शोषित पीडितांना 'अत्तदीप भव' करून सोडणारा आहे. बुद्धविहाराचा कारभार पाहणाऱ्या प्रतिष्ठानमध्ये प्रतिष्ठानातल्या सदस्यांपैकी निम्मे सभासद हिंदूधर्मीय आहेत. स्वतःच्या धर्मनिष्ठा जपत ही मंडळी या बुद्धविहारामार्फत बुद्ध विचार तत्त्वज्ञानासाठी येथे खपताना दिसतात हे आश्चर्यकारक आहे! या प्रतिष्ठानाच्या कार्यकारिणीतील हिंदूधर्मीय कारभारी मंडळी, बुद्ध तत्त्वज्ञानाचे ब्राह्मणी धर्मात रूपांतर करताना इथे दिसतात काय? गेल्या दीड-दोन दशकांपासून मात्र काही बुद्धधर्मीय भिख्खूगण संघाच्या मनात असे नाहक प्रश्न उभे राहू लागले आहेत. त्यांना असे वाटते की, या प्रतिष्ठानामध्ये हिंदूधर्मीय कारभारी असल्यामुळे बुद्ध धर्म शिकवणूक मनापासून संवर्धन आणि संरक्षण होईल.

अस्पृश्यांच्या मुक्ती मोर्चात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करून बुद्ध धर्माचा स्वीकार करून पुन्हा बुद्ध धर्म हिंदुस्थानात प्रस्थापित केला. वैदिक धर्माचे पारंपरिक धर्मात म्हणजे हिंदू धर्मात रूपांतर झाल्यानंतर बुद्धाचा समावेश हिंदू धर्माच्या अवतार कल्पनेतल्या

दहाव्या अवतारात समावेश केला गेला. मग त्याचे पडसाद चक्क बोधगयेत बॉम्बस्फोट झाल्याबरोबर वैदिक धर्म म्हणजे हिंदू धर्म विरुद्ध बुद्ध धर्म हा तथाकथित प्राचीन धर्म संघर्ष आमच्या काळात उभे करण्यात शहाणपण कुठले? हिंदू धर्माची समीक्षा आंबेडकरांनी केली. संविधान तरतुदी करताना हे हिंदू धर्माशी सूडबुद्धीने वागले नाहीत. उलट त्यांनी धर्मांतरही याच मातीत जन्माला आलेला धर्म स्वीकारून केले. प्रत्येक धर्माने आपल्या धर्माच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करावा, पण दुसऱ्या धर्मावर कुरघोडी न करता, धर्मकलह न माजवता त्या त्या धर्माच्या अनुयायांनी कारभाऱ्यांनी वागावे, असे आंबेडकरांचे मत होते. आज बुद्ध असते तर नक्कीच त्यांनी अशी मागणी मान्य केली नसती. वैदिक धर्म बुद्ध धर्माची निर्भर्त्सना केली असेल, पण आज हिंदू धर्ममार्तंड त्यांच्या धर्म तत्त्वज्ञानानुसार का होईना, अखेर बुद्धाचा ऋणानुबंध मानू लागले. बोधीविहाराच्या कारभारात हिंदू धर्मनिष्ठा असतील तर असू देत, बुद्ध तत्त्वज्ञानाचा ते आपलाप करतात काय?

बुद्ध हयात असते तर ते म्हणाले असते, 'छान, असू देत की, माझ्या पूर्वाश्रमी धर्माच्या अनुयायांकडे बोधीविहाराचा कारभार!' बुद्धाच्या मूळ शिकवणुकीचे संवर्धन यात असलेले भिख्खू संघ तरी कुठे काटेकोरपणे करताहेत. धर्मक्षेत्रातही गटबाजी माजवीत गैर वागू लागले.

## पोपचे वागणे ख्रिस्ती नीतिमत्तेत न बसणारे!

कॅथलिक ख्रिस्तींचे सर्वोच्च धर्मगुरू पोप जॉन पॉल (द्वितीय) हिंदुस्थान देशाचा तीन दिवसांचा दौरा आटपून जॉर्जियामार्गे आपल्या सिटीतील मठाकडे पुन्हा परतले. धर्मांतराच्या प्रश्नावरून या दौऱ्याच्या विरोधात संघ परिवाराने घेतलेली आक्रमक भूमिका आणि सत्तारूढ भाजपने तिला विरोध करून पोप जॉन पॉल यांचा दौरा शांततेत पार पडला. याचे सर्व श्रेय पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी यांना दिले पाहिजे.

या दौऱ्यात हिंदुस्थानातील धार्मिक सहिष्णुतेबद्दल पोप यांनी समाधान व्यक्त केले. धर्मा-धर्मात भ्रातृभाव आणि सुसंवाद वाढविण्यावर भर देऊन धर्मांतराचेही त्यांनी स्पष्ट समर्थन केले. दिल्लीतील विज्ञान भवनात

झालेल्या आंतरश्रद्धा परिषदेत त्यांनी जाहीरपणे धर्मांतराची बाजू घेऊन, धर्ममत न पटल्यास त्या धर्माचा त्याग करणे, हा माणसाचा मूलभूत अधिकार आहे, असेही आग्रहाने प्रतिपादन केले. याशिवाय त्यांनी कॅथलिक समाजापुढील आव्हानांचा विचार करण्यासाठी आशियातील ख्रिस्ती धर्मप्रचारकांची महत्त्वाची बैठकही घेतली. तब्येत बरी नसताना, चालणे अवघड असताना महात्मा गांधींच्या राजघाटावरील समाधीचेही दर्शन घेतले असावे. गांधींच्या समाधीसोबत बुद्धाची कर्मभूमी असलेल्या गयेला आद्य शंकराच्या विविध अधिष्ठानांना त्यांनी भेटी दिल्या असत्या, तर ते अधिक सयुक्तिक झाले असते. दुसऱ्या धर्माविषयी त्यांचा आदरभावही व्यक्त झाला असता.

येणारे सहस्रक आशिया खंडात ख्रिस्ताचा संदेश रुजविणारे असेल, असे जाहीर करून ते व्हॅटिकनला परत गेले. ख्रिश्चन मिशनरी ग्रॅहम स्टेन्स आणि त्यांची दोन कोवळी मुले यांना ओरिसात जिवंत जाळून हत्या करण्यात आली. याबद्दल या दौऱ्यात पोप पॉल यांनी ब्र ही काढला नाही. पोर्तुगीज कॅथलिकांनी ४०० वर्षांपूर्वी गोव्यात केलेल्या हिंदुधर्मीयांच्या धर्मांतराचा आणि इन्क्विझिशनच्या अत्याचाराचा संघ परिवाराला जाबच विचारता आला नाही. वाजपेयी सरकारने पोपचा हा दौरा यशस्वी होण्यासाठी, जे संयमी आणि धीरोदात्त वागणे ठेवले; त्यामुळे पाश्चिमात्यांकडील ख्रिश्चन राष्ट्रे आणि राज्यकर्ते त्यांच्यावर नक्कीच खूश झाले असतील. 'थिटॉक्रॅटिक स्टेट' धर्माधिष्ठित राजकारण करणाऱ्यांना आणि तथाकथित धर्मनिरपेक्षवाद्यांनाही केंद्रात सत्ता मिळाल्यानंतर प्रत्यक्षात आणणे आणि त्याला विरोध करणे, एकूण समाजाचे स्वरूप पाहता आज तरी आपल्या देशात जमणे शक्य नाही. सत्तेसाठी भाजपही आपल्या धर्माधिष्ठित राजकारणापासून दूर जाताना दिसतो आहे. भाजपचा हा बदल अधोरेखित करावा असाच आहे. यापुढे मित्रपक्षांशिवाय केंद्रात बहुमत मिळाल्यानंतरही भाजपची अशीच अवस्था असेल. देशातील विविध धर्मांत आणि जातीत विभागलेल्या समाजाचे आंतर्विरोध आणि आंतरराष्ट्रीय रजकारणाचा दबाव भाजप असो वा अन्य कोणी पक्ष, त्यांच्यावर कायमच असणार. त्यामुळे धार्मिक आणि निखळ धर्मनिरपेक्ष वागणे केंद्रातील सत्ताधाऱ्यांकडून

होणे अशक्यच असावे. हा सर्व परिणाम कंपोजिटकल्चरचा आणि संमिश्र समाजाचा म्हणायला हवा. धर्माधिष्ठित राजकारणाविषयीचा दोष आज फक्त संघ परिवारालाच देण्याची आपल्याकडे पद्धती आहे. वसाहतवादी कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रात होणाऱ्या हस्तक्षेपाविरुद्ध प्रतिक्रिया उमटल्याचा इतिहास आहे. जनतेच्या सर्व तऱ्हेच्या श्रद्धांवर याचा परिणाम झालेला दिसून येतो. मग तो कुटुंब संस्थेतील वारसाहक्काचा प्रश्न असो व विवाहसंबंधाचा, त्याबाबत होणाऱ्या कायदेशीर हस्तक्षेपाला एतद्देशीयांकडून विरोधच झाला. तेव्हा धर्मश्रद्धा आणि समाजपद्धती यातले आंतरसंबंध लक्षात घेऊनच धर्मांधतेचे निदान केले पाहिजे. विशेषतः आशियात वसाहतवादी सामाजिक, सांस्कृतिक हस्तक्षेपांना विरोध करण्याची प्रेरणा धर्मश्रद्धा हीच होती. हा विरोध समूह पातळीवर, स्थानिक पातळीवर नंतर प्रांतीय व राष्ट्रीय पातळीवर भरडल्या गेलेल्या सर्वच समाजाने केला. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊनच आजच्याही धर्माधिष्ठित राजकारणाचे विश्लेषण व्हायला हवे. आपल्या देशात १९व्या शतकाच्या माथ्यावर मद्रास प्रांतात लेक्सलॉकी कायद्याला विरोध झाला. ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्यांना या कायद्याने मालमत्तेचा हक्क देऊ केला होता. याविरुद्ध आंदोलन झाले, ते मुंबई, बंगाल प्रांतात पसरले. या असल्या घटनांतूनच जमातीच्या राजकारणाची निर्मिती झाली. सामाजिक, राजकीय व प्रशासकीय उपाययोजनांसाठी एक ‘घटक’ म्हणून वसाहतवादी राजवटीने धर्माला मान्यता दिली होती. त्याच्यातूनच बहुसंख्याकांच्या आणि अल्पसंख्याकांच्या धार्मिक जमाती-राजकारणाची सुरुवात झाली. स्वतंत्र मतदारसंघाची निर्मिती याच परिस्थितीची देन होती. स्वातंत्र्याचा लढा लढविणाऱ्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चळवळीनेही आरंभापासून धार्मिक जमातीय दृष्टिकोन बाळगला. काँग्रेसची स्थापना झाल्या झाल्या गोवंश हत्याबंदीचा ठराव चर्चेसाठी घेण्यात आला होता. मुस्लीम नागरिकांच्या प्रतिनिधींनी विरोध केल्यामुळे तो टाळण्यात आला. धर्माधिष्ठित अनेक समस्या आणि प्रश्न काँग्रेसने आपल्या पटलावर वेळोवेळी घेतले. मलबार बंड असो, मोपल्यांचा वेडाचार, खिलाफतीच्या चळवळीला गांधींनी पाठिंबा देणे असो वा दुसऱ्या गोलमेज परिषदेत मुसलमानांना झुकते माप देऊन,

अस्पृश्यांच्या विशेष मिळू घातलेल्या हक्कांना व सवलतींना विरोध करणे असो, कम्युनल ॲवार्डपासून देशाची फाळणी होईपर्यंतचे राष्ट्रीय लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसचे राजकारण, धर्मश्रद्धा आणि जमातवादाकडे कायम झुकलेलेच होते. काँग्रेसच्या हिंदू-मुस्लीम ऐक्याच्या संकल्पनेनेच दोन्ही बाजूंकडील संकुचित धर्मवाद आणि जमातवाद वाढविला. सोरटी सोमनाथाच्या मंदिराचा काँग्रेसी जीर्णोद्धार असो वा इंदिरा गांधीप्रणीत सुवर्णमंदिरातले ब्ल्यू स्टारचे ऑपरेशन वा बाबरीचे टाळे उघडण्याचे राजीव गांधींचे राजकारण, काँग्रेसी धर्मनिरपेक्षवादाच्या आडून काँग्रेसी जमातवाद स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर कायम कार्यरत राहिला. ९५ सालापर्यंतचे काँग्रेसी नरसिंहाचे राजकारणही याच परंपरेतले नव्हते, असे कोण म्हणेल? मग आता संघ परिवारातल्या आक्रमक संघटनांनाच बोल का लावायचा! आज संघ परिवारातल्या काही संघटना इतिहासात झालेल्या चुका दुरुस्त करण्यात गुंतल्या आहेत. संघ परिवाराचे शीर्षस्थान भाजप आहे. तथाकथित धर्मनिरपेक्षवाद्यांकडून केंद्रात यापूर्वी दोनदा सत्तेवर आलेले भाजपचे सरकार त्यांनी कोसळवले. पहिल्यांदा किंचितसेही बहुमत नव्हते. दुसऱ्यांदा एका मताने भाजपाला सत्ता गमवावी लागली. दोन्ही वेळा सत्तेवर जाताना भाजपाचा अजेंडा धर्माधिष्ठित राजकारणाचा होता. मात्र नुकत्याच होऊन गेलेल्या मध्यावधी निवडणुकीपूर्वी मित्रपक्षांसकट राष्ट्रीय लोकशाही आघाडी निर्माण करून आणि धर्माधिष्ठित राजकारणाचा अजेंडा दूर ठेवून भाजपाने निवडणुका लढवून बहुमत मिळवून तिसऱ्यांदा सत्ता मिळविली. पाच वर्षांचा सत्ताकाळ निर्विघ्नपणे भाजपाला पार करता यावा आणि जनतेचे जीवनमरणाचे प्रश्न आणि आंतरराष्ट्रीय प्रश्न त्यांनी सोडवावेत एवढा निवांत वेळ उर्वरित संघ परिवारातल्या संघटनांनी सत्तारूढ भाजपाला अडचणीत आणू नये. इतिहासातील चुका दुरुस्त करण्याचे राजकारण कायम फलदायी असतेच असे नाही. ती एक फेज होती, ती संपली असे राजकारणातल्या सुज्ञांनाही वाटते. इतिहास ही घडून गेलेली घटना असते. इतिहास भूतकालीन झाला की, त्याला 'मृत' मानून समाजाने पुढे जायचे असते. 'दहशतीच्या जोरावर जो समाज इतिहासातली मेलेली मढी उकरू लागतो, तो समाज ऱ्हासोन्मुख समाज होय', असे न्यायमूर्ती

महादेव गोविंद रानडे यांनी म्हटले होते. त्यातले तथ्य आता केंद्रात भाजपाला बहुमत मिळून सत्ता मिळाल्यानंतर संघ परिवाराने ओळखावे.

इतिहासात जेत्याकडून केलेला देवदेवळांचा विध्वंस केवळ धार्मिकतेने प्रेरित होऊन केलेले कृत्य नसते, तर त्या विध्वंसामागे जेत्याचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याची सैतानी महत्त्वाकांक्षा असते. शक-हुणांनी हेच केले. इंग्रज, डच आणि पोर्तुगीजांनीही आपल्या देशात तेच केले. वसाहतवाद्यांचे आपल्या देशावर आक्रमण होण्यापूर्वी एतद्देशीयांच्या अनेक संस्थानात आणि राज्यांत आपला देश वाटला होता. त्यांच्यातही सत्तासंघर्षलढाया झाल्या, कुणी मांडलिक झाले, कुणी जिंकले ते हिंदुस्थानी असतानाही त्यांनीही परस्परांची देवदेवळे विध्वंसली. काहींनी तर संपत्तीच्या लुटीसाठी स्वतःचीही देवळे फोडली. केवळ धर्मांतरासाठीच देवळे फोडली गेलीत असे नाही. त्यामागे सत्ता प्रस्थापित करण्यासाठी इतरही कारणे आहेत. ब्रिटिश इतिहासकारांनी हिंदुस्थानच्या इतिहासाची जी दोन कालखंडात विभागणी केली आहे, ती विभागणीच एकांगी होती. इतिहासाचे हिंदू कालखंड इ. स. पू. १००० ते १२०० चा काळ. मुस्लीम कालखंड इ. स. १२०० ते ब्रिटिश प्रस्थापित होईपर्यंतचा काळ आणि तिसरा कालखंड ख्रिस्ती ब्रिटिशांचा आणि पोर्तुगीजांचा काळ. इतिहासाची मांडणीच जिथे विकृत करून टाकली, तिथे इतर गोष्टींबद्दल बोलायलाच नको.

इतिहासात जेते म्हणून आपल्या पूर्वजांवर आपल्या ८०० वर्षांच्या राजवटीत मुसलमान राज्यकर्त्यांनी जे अत्याचार केले, त्याची परंपरा काही अंशी १५० वर्षे देशावर राज्य करणाऱ्या इंग्रजांनीही चालविली आणि ४० वर्षांहून अधिक काळ गोव्यात पोर्तुगीजांनीही चालविली. या अत्याचाराला प्रत्युत्तर म्हणून आजच्या पिढीला सूड घेण्याच्या प्रतिक्रियेत गुंतवून ठेवणे, देशहिताला आणि प्रगतीलाही बाधा आणणारे आहे. झाले गेले गंगेला मिळाले म्हणून हे अत्याचार विसरून जा असे सांगणे बरे नाही. पण प्रत्येक संवेदनशील माणसाने या अत्याचाराचा निषेध करायला आणि नोंदवायला पाहिजे. हा निषेध उद्रेक मात्र हिंसेचा नसावा.

रक्तपातातून आणि हिंसाचारातून इतिहासातला अत्याचार धुतला जातोच असे नाही. हिंदुस्थानची संस्कृती वैश्विक आणि सार्वभौतिक समावेशकता आणि धार्मिक सहिष्णुतेवर आधारली आहे. तिचे

उत्तराधिकारी हिंदू, बौद्ध, जैनधर्मीयही आहेत आणि आपली धर्मांधता विसरू पाहणारे ख्रिश्चन आणि मुस्लीमही तिचे वारसदार होऊ शकतात. पण असे होताना दिसत नाही. यात निर्भय समाजापासून तो धर्मश्रद्ध समाजापर्यंत सर्वच धर्मांनी मानवी समाजाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. माणसाला सुसंस्कृत बनविण्याचे काम एका टप्प्यात धर्मानेच केले. आजचे बरेचसे धर्म अंधश्रद्धाग्रस्त होताना दिसताहेत. धर्म म्हणजे अंधश्रद्धा नव्हे. धर्माने काही काळ मनुष्यजातीला प्रगतीच्या मार्गाने पुढे आणलेच होते. राष्ट्रवादाच्या संकल्पानंतर धर्म मागे पडला. जगभर हे असेच घडले. सर्वधर्म महाकाव्येच होती. त्याचे संस्थापक द्रष्टेच होते. समाजाची विधायक रचना करणारे रचनाकार आणि महाकवी होते. या धर्मसंस्थापकांपैकी येशू ख्रिस्ताला त्यांच्याच सनातनी जनतेने सुळावर चढविले. आद्यशंकराचार्यांचा भारतवर्षात छळ केला. चार्वाक, बुद्ध, महावीराला आणि ज्ञानेश्वर, तुकाराम, कबीर, मीराबाईला छळले. सर्व धर्मात छळाच्या गोष्टी नाहीत, असे कोण म्हणेल? कॅथलिक धर्म कालही यापासून अलिप्त नव्हते. ख्रिस्ती धर्मातील विविध मते आणि संप्रदाय ख्रिस्ती धर्ममार्तंडांनीही चिरडल्याचा इतिहास आहे. ख्रिस्ताचा अंत घडवून आणल्यानंतर आणि ईसाई साधू-संत यांचा बळी घेतल्यानंतर, ख्रिस्ती परंपरा सुरू झाली. ज्यांनी बलिदान केले, छळ सहन करणे आणि धर्ममतासाठी हुतात्मा होणे यातून ख्रिस्ती मठांची स्थापना (Monasteries) झाली. सन ३१२ मध्ये रोमन सम्राट कॉन्स्टेन्टाइन याने येशूनंतर ३००-४०० वर्षांनी ख्रिस्ती धर्माला राजाश्रय दिल्यानंतर ख्रिस्ती धर्म वाढू लागला. रोमचा बिशप आणि पूर्व युरोपचा पेट्रियाक प्रस्थापित झाला. सन ८०० साली चार्लमेन राजाच्या कारकिर्दीत रोमची सत्ता स्थापन झाली. १०५४ सालात रोमचा धर्माध्यक्ष आणि कॉन्स्टेन्टिनोपालचा धर्माध्यक्ष यात वाद सुरू होऊन, धर्म बहिष्कृतीची परंपरा सुरू झाली. जर्मन संघातील पुढली कॅथलिक प्रोटेस्टंट संप्रदाय-फ्रान्समधला जॉन काल्विन रोमन कॅथलिक चर्च, ग्रीक ऑर्थोडॉक्स चर्च आणि राजेशाह्यांतली भांडणे, होली फादरच्या संकल्पना पोप झाल्यापासूनच्या आहेत. व्हॅटिकन सिटीचा रहिवासी पोप आणि वसाहतवादासोबत त्याचे उभारलेले धार्मिक साम्राज्य येशूच्या

शिकवणुकीनुसार अजिबात उभे राहिले नव्हते. ‘इन्क्विझिशन’सारखी षडयंत्रणा उभारूनच ती उभी राहिली. या इन्क्विझिशन यंत्रणेनेच जॉन ऑफ आर्कला पाखंडी ठरवून जिवंत जाळले. कॅथलिकांच्या या अधिकृत छळयंत्रणेने युरोप-अमेरिकाही भरडून काढली आणि वसाहतिक देशातील जनतेवरही अत्याचार करून धर्मांतरे घडविली. पोप नववा ग्रेगरी याने इ. स. १२३१ मध्ये पाखंडी लोकांचा बंदोबस्त करण्यासाठी या इन्क्विझिशनची स्थापना केली. व्यक्तिस्वातंत्र्याचा आणि भिन्न मताचा आदर या इन्क्विझिशनने कधी केला नाही. तिनेच रेड इंडियाची संस्कृती, त्याचप्रमाणे जगातील अतिप्राचीन माया आणि आयझेटिक संस्कृती नष्ट केली. अमेरिकेतील निग्रोंचा छळ केला. १९६६ साली ही छळयंत्रणा रोमन कॅथलिक चर्चने मागे घेतली. गोव्यातील ४०० वर्षांपूर्वीचा अत्याचार याच इन्क्विझिशनचा होता.

दया, क्षमा, शांती, करुणेचा धर्म म्हणून ख्रिस्ताची परिभाषा सांगितली जाते. पण जगाच्या राजकारणात या दृष्टीने महत्त्वाची भूमिका ख्रिस्ती परंपरेने निभावलेली दिसत नाही. पहिले महायुद्ध असो, दुसरे महायुद्ध, हिरोशिमा नागासाकीवर अमेरिकनांनी टाकलेला बॉम्ब असो वा व्हिएतनाम-अमेरिकेचे युद्ध, इराक, इस्त्रायल आणि आता अमेरिका इराकमधले युद्ध, बोस्नियातला, कोसोवोतला हिंसाचार असो वा यादवी, ते थांबविण्याची निर्णायक भूमिका व्हॅटिकन सिटीत राहणाऱ्या जागतिक रोमन कॅथलिकांच्या धर्मगुरूला बजावता आलेली नाही. धर्मांतरापुरता मानवी मूलभूत अधिकार आणि इतर वेळी त्याविषयी बोलायचे नाही हे ख्रिस्ती नीतिमत्तेतही न बसणारे असे आहे.

## कोण म्हणतो, टिळकांचा वारसा गांधीजींनी चालवला?

खिलाफत चळवळीपासून मुस्लीम-हिंदू संघर्षांचे परिणाम पुढे स्वातंत्र्यपलढ्याच्या चळवळीला सतत भोगावे लागले, या संघर्षाची परिणती अखेर देशाच्या फाळणीत झाली. एका देशाचे दोन तुकडे झाले. एक पाकिस्तान दुसरा हिंदुस्तान. स्वातंत्र्याला पन्नास वर्षे झाल्यानंतरही हा संघर्ष विझलेला नाही. त्याचे भोग आपल्या देशाला आजतागायत भोगावे लागताहेत. खिलाफत चळवळ ही खोटी, कालबाह्य होती. ती

पुढे आपोआप निकालात निघाली. पण या चळवळील सर्वंकष पाठिंबा देऊन, आपल्या देशाचे जे अतोनात नुकसान महात्मा गांधींनी केले; त्या गांधीजींनी या खिलाफतीच्या चळवळीला संपूर्ण पाठिंबा देऊन, स्वातत्र्यलढ्याला गालबोट लावले होते. गांधीयुगाचे उदात्तीकरण करणारे आजही निःपक्षपाती दृष्टीने या कृत्याचा निषेध करत नाहीत. ज्या टिळकांचा वारसा गांधीजींनी पुढे चालविला असे सर्वसाधारण म्हटले जाते, त्या म्हणण्यात तरी किती तथ्य होते?

आपल्या स्वातंत्र्यांचा लढा मुस्लीम-हिंदू संघर्षाने कायम विभाजतच राहिला. हिंदू-मुस्लीम ऐक्य घडवून हा लढा व्यापक आणि सर्वव्यापी करण्याची दृष्टी खऱ्या अर्थाने फक्त टिळकांकडेच होती. १९१४ साली टिळक मंडालेच्या तुरुंगातून सुटून आले आणि काँग्रेसचे आणि राष्ट्रीय लढ्याचे नेतृत्व अनायासे त्यांच्याकडे आले. त्या वेळी मुस्लीम लीगचे नेतृत्व टिळकांचे त्या वेळी सहकारी असलेले बॅ. जीना यांच्याकडे होते. मुस्लीम लीगचा जन्मच मुळी मुसलमानांना राष्ट्रीय आंदोलनापासून तोडून, त्या आंदोलनाविरुद्ध उभे करण्यासाठी झाला होता. जीना पुढे लीगचे अध्यक्ष झाल्यामुळे मुस्लीम लीग त्या काळात राष्ट्रीय लढ्याशी जोडली गेली. बॅ. जीना त्या वेळी अस्सल राष्ट्रवादी मुसलमान होते. याच वेळी युरोपात पहिले महायुद्ध सुरू झाले होते. इंग्रजांना या महायुद्ध काळात स्वातंत्र्य मिळविण्यासाठी धारेवर धरण्याचे काम, त्या वेळच्या हिंदू-मुस्लीम एकजुटीच्या जहाल राष्ट्रीय आंदोलनाने केले होते. १९१६ साली लखनौ करार टिळक आणि जीना यांच्या पुढाकाराने झाला. हा लखनौ करार हिंदू आणि मुसलमान यांच्या एकजुटीचे आणि राष्ट्रीय आंदोलनाच्या हिंदू-मुसलमानांच्या संयुक्त लढाईचे प्रतीक होते. या एकजुटीने ब्रिटिश राजकर्त्यांपुढे जबरदस्त आव्हान निर्माण केले होते. हे संयुक्त आव्हान पुढे गांधीजींच्या काळात खिलाफतच्या चळवळीला गांधीजींना पाठिंबा दिल्यामुळे मोडीत निघाले.

लोकमान्य टिळक १ ऑगस्ट १९२० रोजी निवर्तले. त्यानंतर राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व गांधीजींकडे गेले. एका वर्षात स्वराज्य, त्यासाठी असहकाराची चळवळ, सविनय कायदेभंग, बहिष्कार आणि टिळक स्वराज्य फंड इत्यादी घोषणा आणि कार्यक्रम करून, गांधीजींनी आपले

नेतृत्व प्रस्थापित करून, टिळक युगातील पुढारीपण निस्तेज आणि हतप्रभ करून टाकले होते. टिळक युगातील पुढारी गांधीजींना शरण तरी गेले अथवा बाजूला फेकले जाऊन विजनवास भोगत राहिले. लखनौ कराराचे एक शिल्पकार, टिळकांचे एक सहकारी बॅ. जीनाही या दूर फेकलेल्यांमधीलच एक होते. एका वर्षात स्वराज्य मिळविण्यासाठी गांधीजींची असहकारितेची आणि कायदेभंगाची चळवळ सुरू होती. त्याच वेळी अलीबंधूंच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानात खिलाफतीची चळवळ सुरू झाली होती. गांधीजींनी या चळवळीला संपूर्ण पाठिंबा देऊन जी ऐतिहासिक चूक केली ती आपल्याला आजतागायत भोगावी लागते आहे. गांधीजींनी खिलाफतीला पाठिंबा दिला होता आणि त्याच्या बदल्यात अलीबंधू मुसलमानांतर्फे स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीला पाठिंबा देणार होते. स्वराज्य आणि खिलाफत चळवळ काही काळ एकमेकांना पूरक ठरली आणि पुढे एकमेकांची वैरी झाली. टिळक युगातील लखनौ करार खऱ्या अर्थाने हिंदू-मुसलमान एकजुटीवर आधारलेला होता. गांधी युगातील हिंदू-मुसलमान ऐक्य त्या तुलनेत तकलादू होते. या दोन्ही वेळच्या हिंदू-मुसलमान ऐक्याचे दोन्ही पक्षाकडील पुढारी यात अंतर होते. जीना आणि अलीबंधू यांत समान असे काही नव्हते. ते होते मुस्लीम जातीयवादी चळवळीत. त्यांच्या तुलनेत तेव्हा जीना अधिक आधुनिक आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्रीय वृत्तीचे मुस्लीम पुढारी होते. फुटीर, जातीय प्रवृत्तीच्या इंग्रजनिष्ठ मुसलमान पुढारीपणाचा पराभव करून, त्यांनी मुस्लीम लीगचे नेतृत्व मिळविले होते. टिळक-जीनामधला लखनौ करार आणि त्यातून साधलेले हिंदू-मुस्लीम ऐक्य धर्मनिरपेक्ष होते. जातीयवादी नव्हते. यानंतर गांधी अलीबंधूंनी साधलेले खिलाफतीच्या अनुषंगाचे हिंदू-मुस्लीम ऐक्य हे जातीयवादी होते.

खिलाफतीची चळवळ ही कालबाह्य धर्मवेडावर आधारलेली होती. खिलाफत म्हणजे खिलाफतीची राजवट-खलिफा म्हणजे मुस्लिमांचा जागतिक धर्मगुरू. हा खलिफा तुर्की समाजाचा सुलतानही असे. परंपरेने जगातील मुसलमानांचा तोच धर्मगुरू समजला जाई. अरब साम्राज्याच्या ऱ्हासानंतर विजयी तुर्की सुलतानाच्या हाती राजकीय सत्ता आणि धर्मसत्ताही आली. या दोन्ही सत्ता सारख्याच जुलमी आणि

शोषक होत्या. या जुलमाला आणि शोषणाला बळी पडणारी कोट्यवधी ख्रिस्ती, ज्यू-मुस्लीम जनता ज्यात ९५% मुसलमान होते, या जुलमी साम्राज्याविरुद्ध सतत बंडे होऊनही ती सत्ता स्वीकारण्यात आली होती. या बंड करणाऱ्यांमध्ये तुर्कस्थान, अरबस्थान, खर्दिस्तान, इराण, जॉर्जिया, आर्मेनिया या देशांतील मुस्लीम जनता होती. युरोपात ब्रिटिश, फ्रेंच, जर्मन, रशियन या आधुनिक सत्तांचा उदय झाल्यामुळे जुलमी तुर्की साम्राज्याचा ऱ्हासकाळ सुरू झाला. यापूर्वी साम्राज्यविरुद्ध मुस्लीम प्रजाजनांची सतत बंडे होत राहिली आणि पहिल्या महायुद्धाच्या काळात, दारुण पराभव झाल्यामुळे तुर्की साम्राज्य मोडून पडले. महायुद्धानंतर पूर्व युरोपातील बाल्कन देश स्वतंत्र झाले. उत्तर आफ्रिकेतील आणि पश्चिम आशियातील अरब-यहुदी मुलुख विजयी झाले. ते इंग्रजांनी आणि फ्रेचांनी वाटून घेतले आणि यामुळे तुर्की साम्राज्याचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली आणि तेव्हापासून तुर्कस्थानाच्या सम्राटाने म्हणजे खलिफाने आपण जगातील मुसलमानांचा सर्वश्रेष्ठ खलिफा असल्याचा गहजब सुरू करून आपण अल्लाचे व त्याच्या शेवटच्या पैगंबराचे पृथ्वीतलावरील एकमेव प्रतिनिधी असल्याची हाकाटी चालविली. आपण एकटेच इस्लामचे रक्षणकर्ते आहोत. इस्लामच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी आपल्या एकट्यावरच येऊन पडली आहे. आज मी संकटात आहे म्हणजे इस्लाम संकटात आहे. जगातील मुसलमानांनी मुसलमानांचा खलिफा म्हणून मला वाचविण्यासाठी (धर्मयुद्धाची) जिहादची चळवळ सुरू करावी, असे आवाहन त्याने जगातील मुसलमानांना केले. देशादेशीच्या मशिदींमधून इमामांनी, मुस्तफांनी आणि मौल्ला-मौलवींनी या जिहादकरिता कुर्बानीसाठी बांग द्यावी असा त्याने फतवा काढला. या फतव्यामुळे जगभराच्या मुसलमानांमध्ये खळबळ माजली. प्रक्षोभ निर्माण झाला. हा प्रक्षोभ सर्वत्र सारखा नव्हता. खुद्द तुर्कस्थानातील केमाल पाशाच्या नेतृत्वाखाली उठाव होऊन खलिफाला सत्ताच्युत करण्यात आले. हा उठाव केवळ जुलमी राजवटीविरुद्धच नव्हता तर त्या राजवटीला इस्मालच्या नावाने पाठिंबा देणाऱ्या खिलाफतीविरुद्ध तसेच मुल्ला-मौलवीविरुद्ध होता. केमाल पाशाचे बंडखोर सहकारी केवळ राजकीय बंडखोर नव्हते, तर इस्लाम धर्मांधतेचे विरोधक आणि धार्मिक-सामाजिक सुधारणांचे

(शा.म.मु.) एन-०२७९—९ (११००—८-२०२४)

पुरस्कर्ते होते. सरंजामी राजवटीविरुद्ध आणि तिला पाठीशी घालणाऱ्या इस्लामी खिलाफतीविरुद्ध त्यांचे बंड होते. ते तुर्कस्थानातील आधुनिक लोकशाहीचे बीजारोपण करणारे लोकशाहीवादी लढवय्ये. तर असल्या खिलाफतीच्या चळवळीची पाठराखण करणाऱ्या अलीबंधूंशी समझोता करून गांधीजींनी धर्मांध मुस्लिमांशी हातमिळवणी करून स्वातंत्र्याच्या लढ्यालाच बांध आणला. पुढे ही खिलापत चळवळ चालविणारे अलीबंधूही दोन वर्षानंतर स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीतून बाहेर पडले व त्यांनीच हिंदुस्थानात मुस्लीम जातीयवादाची बीजे रोवली. गांधींशी फारकत घेतल्यानंतरचे अलीबंधूंचे राजकारण कट्टर मुस्लीम जातीयवादी झाले.

यानंतर हिंदुस्थानात सतत हिंदू-मुस्लीम असे दंगे होत राहिले. मुस्लीम समाज राष्ट्रीय लढ्याच्या प्रवाहातून अलग होऊन मुल्ला-मौलवींच्या राजकारणापाशी जोडला गेला. या सर्व राजकारणाची परिणती पुढे फाळणीत झाली.

राष्ट्रीय लढ्यांची चळवळ अधिक प्रभावी आणि यशस्वी करण्यासाठी टिळक-गांधीजींनी अपेक्षिलेले हिंदू-मुसलमान ऐक्य राष्ट्रीय लढ्याचा एक अविभाज्य भाग होते. या दृष्टीने हिंदू-मुस्लीम ऐक्याच्या या दोघांचयाही संज्ञा तपासून पाहिल्या तर यात लोकमान्य टिळकच अधिक पुरोगामी होते आणि पुरोगामी वारसा गांधीजींना त्यांची हत्या होईपर्यंत कधीच पेलता आला नाही. गांधीजींनी या संज्ञेचा पाठपुरावा केला, पण धर्मांध मुसलमानांच्या राजकारणाला सतत पाठीशी घालूनच.

खिलाफत चळवळ इस्लाम धर्मांधतेवर आधारलेली असल्यामुळे मोडीत निघाली. तुर्कस्थानात खलिफा पदच्युत झाला. त्याची सल्तनत आणि खिलाफत लयाला गेली. याचे दुःख त्या वेळी आपल्या देशातील मुसलमानात तीव्रतेने जाणवत होते. यापूर्वी राष्ट्रीय प्रवाहाशी ऋणानुबंध जोडलेला मुसलमान या खिलाफतीच्या चळवळीमुळे धर्मवेडाच्या आहारी जाऊन राष्ट्रीय लढ्यापासून, त्याच्या मूळ प्रवाहापासून दूर जात राहिला. मुल्ला-मौलवी आणि कडवे मूलतत्त्ववादी यांचे मुस्लीम समाजात प्रस्थ माजून समाजाचे नेतृत्व इंग्रजधार्जिण्या फुटीरतावादी मुस्लीम पुढाऱ्यांच्या हाती गेले. या पुढाऱ्यांच्या दबावाला, दहशतीला

बळी पडून जीनाही बदलले आणि ते फाळणीचे प्रमुख शिल्पकार झाले. गांधीजींनी जीनांना नाकारून आणि एकाकी पाडून अलीबंधुंशी जी युती करून, खिलाफतीच्या चळवळीला पाठिंबा दिला होता त्याचे उट्टे जीनांनी आत्यंतिक फुटीरतावादी होऊन काढले.

❖❖❖

# नामदेव ढसाळ - तन्वीर सिद्दिकी

*मी जन्माला घातलेला ‘सूर्य’ सांभाळता आला तर बघ*
*मी जाताना माझा ‘दिवस’ इथेच सोडून जाणार आहे*
- तन्वीर

दोन ओळींतच ढसाळांची समग्र समष्टी परावर्तित होते आहे. नामदेव ढसाळ आपल्यात नाहीत ही कल्पना करणंसुद्धा शक्य नाही. आज खऱ्या अर्थाने पोकळी निर्माण होणे म्हणजे काय असते याची पुरेपूर अनुभूती आली. मराठी साहित्याला मराठी कवितेला तिच्या मूळ रूपात जन्माला घालणारा असा महाकवी पुन्हा होणार नाही.

नामदेव ढसाळ नावाचा कोणीतरी नेता आहे हे फार लहान असतानाच कळलं होतं. पण त्या नावामागचा धगधगता अंगार कळण्याएवढी प्रगल्भता असण्याचे ते वय नव्हतंच. एफवायला असताना माणसाने पहिल्याप्रथम ही ढसाळांची दीर्घ कविता वाचली होती. कवितेचं असंही स्वरूप असू शकतं! या चक्रातच मी अडकून गेलो होतो. कविता ही नुसती गुणगुणण्यापुरती नसते. कवितेने शब्द पेटतात आणि तेच शब्द पेटवतात घरे-दारे आणि माणसेसुद्धा. हे ढसाळांच्याच कवितेतून मी शिकलो.

ढसाळांशी पहिली भेट झाली होती ती आयबीएन लोकमतच्या ग्रेट-भेट कार्यक्रमानिमित्त. आयबीएन-लोकमतमध्ये इंटर्नशिप करत असताना ढसाळांना आँखो देखी पाहण्याचा, ऐकण्याचा आणि त्यांच्यातल्या धगधगत्या ज्वालामुखीला अनुभवण्याचा तो पहिलाच प्रसंग होता. निखिल वागळेंच्या खोचक प्रश्नांना खुमासदार उत्तरे देताना त्यांची झालेली जुगलबंदी मला ढसाळ नावाचा फेनॉनेनॉ समजावत गेली. ढसाळ म्हणजे कुणी पानं-फुलं-वेली... पक्षी-चंद्र-तारे गिरवित बसणारा कवी नाही. ते एक अनोखेच रसायन आहे आणि तेथूनच ढसाळांना अभ्यासण्याचा माझा प्रवास सुरू झाला.

ढसाळ गेल्या अनेक महिन्यांपासून कॅन्सरशी झुंजत होते. सप्टेंबर महिन्यात त्यांच्याशी झालेली भेट माझ्या आयुष्याला निश्चितच वेगळं वळण देणारी होती. बॉम्बे हॉस्पिटलच्या नवव्या मजल्यावर त्यांनी स्वतः

चितारलेल्या मुंबईच्या नग्न लखलखाटाकडे डोळे भरून पाहणारे ढसाळ पहिल्याच नजरेत माझ्या काळजाला चिरून गेले. मुंबईच्या नागड्या वास्तवाच्या जखमा आपल्या कवितेतून रेखाटणारा हा महाकवी आज कॅन्सरशी लढा देतोय तरीदेखील त्यांच्या डोळ्यांतली चमक अजूनही मुक्त गगनात भरारी घेणारी आहे. त्याच क्षणाला मनात म्हटलं... बॉस, जिंदगी इसी चीज का नाम है... जियेंगे तो अपने दम पर और मरेंगे तो भी अपने दम पर...

'कलमनामा'चे संपादक युवराज मोहितेंनी ढसाळांशी माझा परिचय करून दिला तेव्हा मला बाकी काही विचारण्याआधी त्यांचा पहिला प्रश्न होता... ''काय रे काय-काय वाचतोस?'' मी उत्तरलो दादा जवळपास सर्वच वाचतो... उत्तर संपतंय ना संपतंय तोच त्यांचा आवाज गरजला... ''अरे हाड... जिंदगी वाचायला शिक. माणसं वाचायला शिक... माणसातल्या माणुसकीला वाचायला शिक आणि ती इतरांना शिकवायचं पण शिक... जर तुला माणूस वाचता नाय आला तर जिंदगी झाटभरची तुझी...'' माणसं वाचली पाहिजेत. त्यांच्यातल्या माणुसकीचा मळा समानतेच्या. सन्मानाच्या फुला-फळांनी फुलवला पाहिजे याचं सोप्या भाषेत शिक्षण देणारा त्यांचा सल्ला माझ्यातल्या विचार करण्याच्या वृत्तीला मुळापासून बदलवून गेला.

बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असताना दादांना भेटायला येणाऱ्यांची सतत रीघ लागलेली असायची. सकाळीच किमोथेरपीचा डोस संपवून संध्याकाळी दादा त्यांच्या चाहत्यांना भेटायला एकदम तय्यार होऊन बसलेले असायचे. पांढरा शुभ्र शर्ट, मस्त कडक इस्त्रीतील लुंगी, माथ्यावर हलकेच विसावलेला त्यांचा चष्मा, चेहऱ्यावरचा पिकलेला फ्रेंच कट, सोबतीला निरागस पण एकदम खळखळून हसणारे व्यक्तिमत्त्व ते कॅन्सरसारख्या प्रचंड भयंकरातून जात आहेत याची पुसटशी जाणीव देखील होऊ देत नव्हतं. माणसं आणि त्यांच्याशी गप्पा हे दादांचं खरं टॉनिक होतं. आपल्याला भेटायला येणारी माणसे हीच माझी संपत्ती. त्यांचं प्रेम हीच माझी कमाई असं सांगणारे दादा पायांना प्रचंड सूज असताना देखील तासन्तास व्हिल चेअरवर बसून लोकांशी गप्पा मारत राहायचे.

वाघाच्या त्वेषाने आणि पँथरच्या वेगाने जुलूमी व्यवस्थेवर आसूड

ओढणारा पँथर जेव्हा स्वतःच्या भूतकाळात रमायचा तेव्हा मात्र त्याच्यातला फक्त आणि फक्त नामदेव ढसाळ हा किती निरागस आहे हे जाणवूनच मन गदगदून जायचं. शाळकरी वयातच बसलेले जातीयतेचे दाहक चटके, त्यांचं बालपण, एकाच घरात चार-चार बिऱ्हाडं राहताना यायची गंमत, तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना आवडलेल्या मुली, त्यांच्या प्रेमात असलेल्या मुली, ढाले-ढसाळ वादांवर टिप्पणी करताना मी स्वतः कुठे कुठे चुकलोय हे सांगताना त्यांनी कधीच कोणताही अभिनिवेश बाळगला नाही. पुण्यात शंकराचार्यांसोबत झालेली झटपट, अनेक प्रकरणात झालेली जेल, भर रस्त्यावर बसलेली पोलिसांची थर्ड डिग्री, दाऊद साधासा चोर असताना त्याला सज्जड दम देऊन मिळवून दिलेला जामीन असो किंवा ढाले-ढसाळ वादात ज. वि. पवार यांनी कायमच ढालेंची बाजू घेतल्याचे मला आश्चर्य जरी असले तरी अजिबात दुःख नाही असे धीरगंभीर आवाजात सांगणारे ढसाळ पाहण्याचा अनुभव वेगळाच होता. बाबड्याचे प्रकरण असो किंवा दलित पँथर आणि शिवसैनिकांची आमने सामने झालेली राडेबाजी असो नाहीतर हिरव्या मटणावरचं त्यांचं प्रेम आणि आतड्यांच्या त्रासामुळे आत्ता चव चाखता येत नाही. हा सल बोलून दाखवणारा पँथर एकदम खराखुरा वाटायचा.

दादांबद्दल अजून काय बोलावं!! आमच्या पिढीसाठी ते एक चालतं बोलतं विद्यापीठ होतं. भाषेतून सांडणारा रखरखता अंगार होता. एक कार्यकर्ता म्हणून घडत असताना मनातलं आत्मभान दादांच्या कवितेनेच जागवलं होतं. स्वतःच्या कवितेकडे वळून पाहताना दादा अनेकदा म्हणायचे, सत्तरच्या दशकातली स्थिती वेगळी होती. तेव्हा प्रत्येकाच्या जखमा भळभळत असायच्या. त्या जखमांना धारधार शस्त्र बनवणं त्या काळाची गरज होती. बाबासाहेबांचा ‘संघर्ष करा’ हा नारा डोक्यात ठेवूनच आम्ही रचनात्मक साहित्याची निर्मिती केली होती. मात्र आज त्यापुढे जाण्याची गरज असतानाही अनेक नवकवी त्याच बाजातलं लिहितायेत. काहीतरी वेगळं लिहिण्याच्या नावाखाली सवंगपणाच जास्त करतायेत. अशा कवितांमध्ये ओढूनताढून कंटेपररी लिहिण्याच्या हव्यासापोटी लैंगिक अश्लीलताच जास्त डोकावतेय. अंडरवर्ल्डच्या कविता अंडरवर्ल्डच्या जाणिवेत जगल्याशिवाय समृद्ध बनत नाहीत. जाणिवा प्रगल्भ व्हायला हव्यात ह्या पोरा-पोरींच्या... कविता इंनोसंट असली

पाहिजे. अगदी अस्सल असली पाहिजे.

शेवटच्या दिवसांत ते पँथरच्या भल्या-बुऱ्या आठवणी लिहिण्यात गर्क होते. त्यांना भेटायला आलेल्या प्रत्येकाला त्यांच्या आगामी प्रकाशनातील पँथरच्या भल्या आणि बुऱ्या आठवणी स्वतः वाचून दाखवायचे. हॉस्पिटलमध्ये असताना त्यांनी प्रचंड कविता लिहिल्या आहेत. बॉम्बे हॉस्पिटलच्या रूम नंबर ९०९ मध्ये जणू काही लायब्ररीच उघडलीय असा आभास व्हावा इतकी पुस्तकं, लिखितं, पेपर्स पडून असायची.

मल्लिकाताई दादांनी लिहिलेल्या कवितांचे फाईलिंग करत असतानाचा उत्साह; मात्र मला कायम त्यांच्या मल्लिकाताईंच्या संबंधांवर दादांनी किंवा खुद्द मल्लिका अमर शेख यांनी काहीतरी बोलावं यासाठी खुणावत असायचा. शेवटी तो क्षण आलाच. चर्चगेटच्या दर्ग्यावरून आणलेली लाल गुलाबाची फुलं दादांना आम्ही देतो न देतो तोच दादांनी मल्लिका यांना हाक मारली आणि हातातली गुलाबाची फुलं मल्लिकाताईंना देत म्हणाले... धीस ब्युटिफूल रोझेस फॉर माय लवली लाईफ पार्टनर... आणि ती फुले स्वीकारताना मल्लिकाताईंनी त्यांना दिलेली स्माईल ही त्यांच्या अतूट प्रेमाचा ताजेपणाच दर्शवत होती. परंतु हा सीन पाहिल्यावर मात्र मीच काही काळ अचंबित झालो होतो. विद्यापीठात एम. एम.च्या पहिल्या वर्षात असताना मल्लिका अमर शेख यांचं ‘मला उद्‌ध्वस्त व्हायचंय’ हे आत्मकथन वाचलं. नामदेव ढसाळांची अगदी विरुद्ध बाजू डोळ्यांसमोर उभी राहिली होती आणि आत्ता जे पाहतोय ते वेगळे आहे की काय? पण जीव जाम खूश होता. दादांच्या आयुष्यातले एकूण एक पैलू त्यांच्या कवितेसारखेच अस्सलपणे उलगडत होते आणि त्या सर्व क्षणांचा मी साक्षीदार होतो. त्यांनी केलेल्या एकूण एक अनुभव कथनाचा मी काही काळ का होईना पण दादांच्या संमतीने झालेला एक भागीदार होतो.

पँथर नामदेव ढसाळचा यलगार हा कधीच ऊरबडवेपणा नव्हता. मानवमुक्तीसाठी पुकारलेलं मूर्तिमंत बंड होते ढसाळ. ते आयुष्यभर माणसाचं गीत गात राहिले. माणसावर सुक्त रचत राहिले. जखमेतून वाहिलेल्या रक्तांच्या थेंबाथेंबातून अगणित सूर्यांना जन्म देत राहिले. व्यवस्थेची उभी आडवी फाडणारा हा महाकवी कायम वैश्विक काव्य रचत राहिला. संबंध मानवी समाज हा फक्त मानवतेचा धागा पकडून आभाळ नावाच्या छताखाली एक व्हावा असं मानवतेचं तत्त्वज्ञान सोप्या

भाषेत समाजासमोर जसेच्या तसे उभे केले आणि स्वतःच्या भावविश्वात गुरफटलेल्या अभिजन वर्गाच्या मक्तेदारीला जोरदार हादरे दिले.

दादांचं व्यक्तिमत्त्व अगदी अस्सल होतं. बेदरकारपणे जगणाऱ्या दादांच्या सान्निध्यात येणाऱ्याला दादा अवघ्या पाचेक मिनिटांत आपलंसं करून घ्यायचे. त्यांना नव्याने भेटलेल्या कोणत्याही माणसाशी झालेली मैत्री काही क्षणांतच जुनी करून टाकण्याच्या त्यांच्या खेळकर स्वभावाने ते कायमच सर्वांच्याच गळ्यातले ताईत बनून राहिले होते. आज त्यांच्या जाण्यानंतरच पोकळी निर्माण होणे म्हणजे काय असते हे खऱ्या अर्थाने उगमत आहे. दादा स्वतःच एक महाकाव्य होते. परंतु त्या महाकाव्याला वाचणे जेवढे सोपे होते तेवढेच समजायला अवघडदेखील. त्यांचे संपूर्ण आयुष्य मुक्तछंदात रचलेल्या कल्पनारम्य काव्यासारखेच होते. म्हणून आत्ताही दादांच्या टीकाकारांना त्यांना कोणत्याही एका ठरावीक वैचारिक चौकटीत जबरदस्तीने बसवायला यश मिळालेलं नाही. त्यांच्या एकूण व्यक्तित्वातूनच अन्याय, अहंकार, वर्ण, लिंग, जात, धर्म वर्चस्ववादा-विरोधातील चीड प्रकर्षाने व्यक्त व्हायची. व्यवस्थेने अधिष्ठान प्राप्त करून दिलेल्या कोणत्याही विषमतेविरोधात आग पाखडणाऱ्या दादांच्या भाषेत प्रचंड संताप जरी असला तरी त्यात कधीही द्वेषभावना नव्हती. खाजगी बैठकांत बिनधास्त गप्पा मारतानादेखील एखाद्या विशिष्ट व्यक्ती समूहाबद्दल कधीच आकस दाखवला नाही.

नामदेव ढसाळ आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत मीडियाच्या लाइमलाइटमध्ये राहिले. त्यांचं आजारपण असो अथवा त्यांनी शोषितांच्या राजकारणावर व्यक्त केलेलं त्यांचं परखड भाष्य असो. मीडियाने कायम त्यांना बातम्यांमध्ये का होईना पण जिवंत ठेवलं. परंतु त्याच वेळेस नामदेव ढसाळांना आणि त्यांच्यातील वैश्विक दर्जाच्या कवीला कायमजातीच्या स्थितिवादी ओळखीत बांधून ठेवलं.

ढसाळ यांची कविता सर्व आयाम, सर्व क्षितिजं मोडणारी होती. त्यांचा आंबेडकरी तत्त्वज्ञानावर जेवढा विश्वास होता तेवढाच विश्वास जगभरातील सर्वच क्रांतिकारी महामानवांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानावर होता. त्यांच्या एकूणएक कवितांमध्ये आपल्याला कुठे ना कुठे तरी ते प्रतीत होतच आलं आहे. तरीदेखील त्यांच्या मृत्यूनंतर झालेल्या सर्वच बातम्यात त्यांना केवळ दलित कवी म्हणूनच उल्लेखले गेले. दलितपणाची

स्थिती, जुलूमी व्यवस्थेखाली दळणं-भरडणं त्या माणसानं कधीच सहन केलं नव्हतं ते आणि त्यांच्या क्रांतिकारी कविता कायमच बंडांचं निशाण फडकावणाऱ्या होत्या. नामदेव ढसाळांचा उदय ज्या कालखंडात झाला त्या काळातील स्थितिवाद आणि आत्ताचं त्यांचं स्थान यात प्रचंड फरक आहे. परंतु जातीय कोनातूनच त्यांची अस्मिता अधिक गडद करण्याचं काम इथल्या पारंपरिक माध्यमांनी अतिशय कसून केलं आहे. असा आरोप केला तर बिल्कूल वावगं ठरणार नाही.

असे शब्दछळ करणारे हे नवे नवे मुल्ला बनून बेंबीच्या देठापासून बांग द्यायला सरसावलेले असतात. आयुष्यात कधीच कोणत्याही चळवळीत प्रत्यक्ष सहभाग न घेतलेले हे लोक रस्त्यावरचं विद्यापीठ काय समजून घेणार! स्वतःमधली संकुचित वृत्ती लपवून आम्हीसुद्धा वेगळे आहोत हे दाखवण्याच्या कोडग्या अट्टाहासापायी जो समोर येईल त्यावर बिनबोभाटपणे अर्थहीन टीका करत बसणे हाच यांचा स्थायिभाव. घरदार सुखी असलं की, स्वतःची वृत्ती अभिजन बनत जाते मग नकळतपणे श्लील-अश्लीलतेचा वाद मनात उभा राहतो. जे शब्द तुम्हांला लिंगवाचक अथवा घाणवाचक वाटतात ते सारेच शब्द या रस्त्याच्या गल्लोगल्लीत वापरून गुळगुळीत झालेले असतात. म्हणून कामाठीपुऱ्यात माणसं राहणाऱ्या चाळीला ढोरचाळ म्हटलं तरी तिथले लोक माणसासारखे जगत असतात.

ढसाळांवर अलीकडच्या अनेक नव-बुद्धिजीवींनी शिवराळ वगैरे म्हटल्याचं फेसबुकसारख्या सोशल मीडियावर आढळून आलं होतं. या तथाकथित नवबुद्धिजीवींमध्ये सोशल मीडियावरील नवखे लेखक, नवखे इझमवादी यांचाच जास्त भरणा आहे. खरं तर या 'बुद्धीजीवी' वर्गाला 'दलित' स्थितिवाचक संकल्पनेचा हवा तसा उपयोग करून घ्यायला जमतं. परंतु प्रत्यक्षात शोषितांच्या भावविश्वात त्यांच्या अंतरंगात डोकावून पाहण्याची साधी इच्छाशक्तीदेखील कोणी उराशी बाळगून असल्याचं गेल्या दोन ते तीन दशकांत फारच अभावाने आढळलं आहे. आपल्या पुढ्यात आलेलं नेमक्या वेळी निभावून नेण्याची स्वार्थवृत्ती बळावली आहे. म्हणून ढसाळांचं धगधगतं कोणी जाणून घेत नाही आणि आपल्या देशात माणूस मेल्यानंतरच त्याची किंमत कळते, असं म्हणतात. माणूस हयातीत असताना कोणी विचारत नाही. पण तो गेल्यावर मात्र सर्व येतात. या

दांभिकपणाला काय म्हणावं? आज ढसाळ नाहीत. त्यांच्या-सारखे कवी किती निर्माण होतील, माहीत नाहीत. पण शोषितांचे, पीडितांचे भाव विश्व उलगडून देणाऱ्या ढसाळांना आपण भाषेच्या नियमात बसवू शकत नाही.

कवी नामदेव ढसाळ यांचं व्यक्तित्व मुळातच विद्रोही आहे. ते स्वतः दलित समाजातील एक कवी आहेत आणि त्या समाजात दलितांची होणारी आर्थिक, सामाजिक कुचंबणा ते आपल्या काव्यातून साक्षात करतात.

*''रक्तात पेटलेल्या अगणिक सूर्यांनो*
*तुमची आयबहीण*
*आजही विटंबली जाते हाराहारातून*
*रक्त पेटलेल्या अगणित सूर्यांनो*
*आता या शहराशहराला आग लावीत चला''*

कारण आतापर्यंत अंधारात तुमचं जीवन खर्ची गेलं. आता डॉ. बाबासाहेबांच्या विचाराच्या रूपाने 'विजेचा लोळ' आपल्यात येण्याकडे धावून आलाय. म्हणून अंधारयात्रिक होण्याचं आता तरी नाकारा. आता सूर्योन्मुख व्हा, असं ते आवर्जून समाजाला सांगतात. किती दिवस तुम्ही लाचारीचे जीवन जगणार? तुमची प्रगती तुम्हालाच करावी लागेल. आपणच क्रांती घडवून आपलं राज्य स्थापू, पण तुम्ही कार्यरत व्हा. अजूनही त्यांच्यावर विसंबून राहू नका. तुम्हाला जर इदीच्या बकऱ्याप्रमाणे बळी जायचं असेल तर खुशाल जा.

*''जिवाचे नाव लवडा ठेवून जगणाऱ्यांनी*
*खुशाल जगावे*
*मी तसा जगणार नाही''*

मी मात्र असं मिळमिळीत आयुष्य जगणार नाही. असं कवी उद्दामपणे सांगतो. आजपर्यंत या समाजात जे किळसवाणं जीवन कवी जगला. ते जीवनच बदलवण्याची भाषा आपल्या कवितेत बोलतो.

भाषेच्या शुद्धीकडे लक्ष राहत नाही. तेव्हा कवीसमोर कवितेच्या सुज्ञ रसिक मंडळींचाही विचार नसतो. आजपर्यंत या समाजाने दिलेल्या वागणुकीविरुद्ध कवी आगीचे गरळ ओकत जातो. आपल्या समाजातील भाषाच तो कवितेत वापरतो.

विजय तेंडुलकर म्हणतात, नामदेव ढसाळांच्या भाषेने मराठी

काव्यसृष्टीला समृद्ध केले. त्यांनी आपल्या वर्गांच्या भाषेतच कविता लिहिल्या. त्यामुळे मराठी काव्यसृष्टीचा त्या विशिष्ट वर्गाच्या भाषेशी परिचय कवी करून देतात त्या जगाकडे आजपर्यंत कुणाचं लक्षच गेलं नव्हतं. त्या जगाची कवितेला ओळख करून देतात. वर्णलढ्यापेक्षा वर्गलढ्याचं स्वरूप त्यांच्या कवितेत अधिक तीव्रतेने व्यक्त होतं. आर्थिक कुचंबणेमुळे होणारे हाल, वेश्याव्यवसायाकडे लागणाऱ्या मुली, पोटाकरिता कुंटणखान्याची रखवाली करणारे बाप, पोटाकरिता दारू, गांजा, अफिम यांचा व्यवसाय करणारी माणसं यांचंच जीवन कवी साकार करतो. जसं जगले ते जगणंच 'गोलपिठा'त कवी वाचकांपुढे साक्षात् करतो.

नामदेव ढसाळांनी आपल्या काव्यलेखनाला सुरुवात 'लिट्ल मॅगेझिन'मधून केली. लिट्ल मॅगेझिन्समधील कवी मंडळी सर्व नकारवादी होती. 'गोलपिठा'तील काही कवितांवर या वरवरच्या उपऱ्या नकाराची छाप पडलेली आढळते. ह्या कवींच्या कवितेत लिंग योनीवाचक शब्दांची खैरात असे. ढसाळांच्या कवितेतही खूपदा लैंगिक संभोगाशी संबंधित शब्द ते वापरतात. त्यामुळे त्यांच्या कवितेवर अश्लीलतेचा आरोपही केला जातो. पण 'गोलपिठा' या काव्यसंग्रहात जेव्हा कवी या लिंग योनीवाचक शब्दाचा उपयोग करतात, तेव्हा ते शब्द तिथे चपखल बसतात. छिनाल घर, गांडीचे कानवले, वागचट गवशी, भ्रष्ट डोवडी, रांडकी पुनव, गांडू बगिच्यांना इत्यादी प्रतिमा ते वापरतात. भोसडा, लवडा, फोदा, ढुंगण, डेंग, डेंगण्या इत्यादी शब्दांचा सर्रास वापर ते आपल्या कवितांमधून करतात. ज्या शब्दांचा शिष्ट समाजात इतरांसमोर किंवा उघड-उघड वापर करीत नाहीत, त्यांनाही ते आपल्या कवितेत स्वाभाविकपणे वापरतात. ती त्यांच्या वर्गाची भाषा वाटते. कवी ज्या समाजात जगला त्या समाजात या शब्दांना अश्लील म्हणत नाहीत. इतर काव्यसंग्रहात या शब्दांचा त्यांनी वारंवार उपयोग केलेला आहे, पण ते शब्द, त्या प्रतिमा त्या कवितेला अर्थपूर्णता आणून देत नाहीत. कधी कधी तर असं वाटतं की, कवी या स्पेशल शब्दांचा उपयोग स्वतःच्या भाषेची विशेषता म्हणूनच वापरतो आहे. पण ढसाळ यांच्या कवित्वाला 'गोलपिठा'नंतरच्या काव्यसंग्रहात उतरती कळा लागली. सामाजिक समस्या व्यक्त करताना ते आपल्या कवितेच्या माध्यमातून भाषणाद्वारे

आपले विचार दलितांपर्यंत पोहचवण्याचे कार्य करू लागले. जास्तीत जास्त कवितांतून भाषणबाजी करू लागले. त्यांच्या भाषेने विधानांचं स्वरूप प्राप्त केलं.

राजकीय पातळीवर त्यांना स्थैर्य लाभलेलं नाही. व्यक्तित्व दोलायमान अवस्थेत आढळतं. समाजसुधारकच आहे. तिथे त्यांनी ठाम अशी राजकीय भूमिका घेतलेली नाही. मार्क्सच्या विचारांनी प्रेरित होऊन क्रांतिद्वारे दलितांचं राज्य स्थापण्याचं स्वप्न ते बघतात. 'प्रियदर्शिनी'मध्ये इंदिरा गांधींची स्तुती करतात. 'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता' मध्ये आमच्या समाजाला अंधारातून काढू शकेल असा आता एकही नेता नाही, असं डॉ. आंबेडकर यांच्याकडे गाऱ्हाणं करताना आढळतात. तू नसल्यामुळे कुणाची पूजा बांधावी, असं विचारतात. प्रियदर्सिनीमध्ये इंदिरा गांधींना आज तूच उद्धार करू शकतेस, असं म्हणणारे कवी ढसाळ हे आहेत. 'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता' मध्ये पूजा कुणाची बांधावी हा प्रश्न ढसाळांना पडतो. राजकीय पातळीवर कुठलीही ठोस भूमिका ते स्वीकारताना आढळत नाहीत. मार्क्सवादी कवींनीही अंत्यजांना जाणीवपूर्वक उपेक्षिले. काळजीपूर्वक जातीयतेची समस्याच नाकारली. त्यांना वेशीवरील अंधार दिसला नाही असं नाही, पण मुद्दाम त्याकडे दुर्लक्ष केले. दलित साहित्याचा प्रवाह मराठी साहित्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जीवनदृष्टी स्वीकारली. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' अशी जीवनदृष्टी असल्याने या साहित्याने समाजातील सर्व समस्यांकडे लक्ष दिलं.

माणसातील माणुसकीला आव्हान करीत हे साहित्य अवतरलं. या साहित्याने विद्रोहाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. नामदेव ढसाळांची 'गोलपिठा'तील कविता दलित साहित्याचा मानदंड आहे. दलितांचं, अस्पृश्यांचं, शेतमजुरांचं होणारं शोषण याविरुद्ध या कवीने विद्रोह व्यक्त केला. कवी ढसाळांनी अंत्यजाच्या जीवनाचं भयानक वास्तव आपल्या कवितेत स्वरूप केलं. मराठी भाषेला त्या दलितांच्या, पीडितांच्या बोलीनेच सजवलं. या रांडव मराठी भाषेला दलितांचं, अस्पृश्यांचं, वेश्याचं दुःख ऐकवलं. या सोज्ज्वळ भाषेला 'गोलपिठा'तील वर्गबोलीचे अलंकार घातले.

❖❖❖

# संदर्भसूची

● कऱ्हाडे सदा : दलित साहित्याच्या निमित्ताने, अभिनव प्रकाशन मुंबई, १९८२. ● कवठेकर बाळकृष्ण : दलित साहित्य : एक आकलन, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, १९८१. ●कवठेकर बाळकृष्ण : वाङ्मयीन चर्चा आणि चिकित्सा, नवसाहित्य प्रकाशन, बेळगांव, १९७८. ●कुरुंदकर नरहर : भजन, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८२. ●खरात शंकरराव : दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती, इनामदार बंधू प्रकाशन, पुणे - १९७८. ●जाधव रा. ग. : निळी पहाट, श्रीविद्या प्रकाशन, पुणे. दु. आ. १९७९. ● जाधव रा. ग. : निळी क्षितिजे, अमेय प्रकाशन, नागपूर, १९८२. ●जाधव. रा. ग. : नववाङ्मय प्रवृत्ती व प्रमेय, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९. ●जाधव रा. ग. : साहित्य आणि सामाजिक संदर्भ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. १९७५. ●जोशी प्र. न. : मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास (अर्वाचीन काल), प्रसाद प्रकाशन, पुणे, १९७९. ●ठकार निशिकांत : कविता : स्वरूप आणि विवेचन, स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे. १९७५. ●डांगळे अर्जुन : (संपा.) दलित साहित्य : एक अभ्यास, साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७८. ●ढसाळ नामदेव : आमच्या इतिहासातील अपरिहार्य पात्र : प्रियदर्शिनी, दलित पँथर प्रकाशन, मुंबई १९७६. ●ढसाळ नामदेव : आंबेडकरी चळवळ आणि सोशॅलिस्ट कम्युनिस्ट, आंबेडकर प्रबोधिनी, मुंबई १९८१. ●ढसाळ नामदेव : तुही इयत्ता कंची तुही इयत्ता, आंबेडकर प्रबोधिनी प्रकाशन, मुंबई, १९८१. ●ढसाळ नामदेव : मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले, मागोवा प्रकाशन, पुणे. १९७५. ●ढसाळ नामदेव : गोलपिठा, नीलकंठ प्रकाशन, पुणे, दु. आ. १९७५. ●पंडित नलिनी : स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांचा प्रश्न, साधना प्रकाशन, पुणे, (वर्ष नमूद नाही.). ●पवार दया : बलुतं, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, ति. आ. १९८२. ●पाटील म. सु. : दलित कविता, लोकवाङ्मय प्रा. लि. मुंबई १९८१. ●पाटणकर : सौंदर्य मीमांसा, मौज प्रकाशन, मुंबई १९७४. ●पाठक वा. भा. : आधुनिक मराठी काव्याचे

अंतःप्रवाह, ठोकळ प्रकाशन, पुणे १९६४. ●फडके भालचंद्र : दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९७७. ●फडके भालचंद्र : दलित साहित्याची प्रकाशयात्रा, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९८०. ●बागुल बाबूराव : जेव्हा मी जात चोरली होती. अभिनव प्रकाशन, मुंबई, दु. आ. १९७६. ●बागुल बाबूराव : दलित साहित्याचे क्रांतिविज्ञान, बुद्धिस्ट पब्लिकेशन, नागपूर, १९८९. ●मनोहर यशवंत : उत्थानगुंफा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर १९७७. ●मनोहर यशवंतः दलित साहित्य सिद्धांत आणि स्वरूप, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९७८. ●मनोहर यशवंत : स्वाद आणि चिकित्सा, धनंजय प्रकाशन, नागपूर, १९७८. ●मनोहर यशवंत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतन काव्य, सुनील प्रकाशन, नागपूर, १९८२. ●माळी गजमल : नागफणा आणि सूर्य, पृथक प्रकाशन, जून, १९७९. ●मांडे प्रभाकर : दलित साहित्याचे निराळेपण, धारा प्रकाशन, औरंगाबाद, १९७९. ●मेश्राम केशव : (संपा.) विद्रोही कविता, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९७८. ●मेश्राम केशव : समन्वय, परचुरे प्रकाशन, मुंबई, १९७८. ●रसाळ सुधीर : कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशन गृह, मुंबई १९८२. ●राजाध्यक्ष विजया : कवितारती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७९. ●वठेर प्रल्हाद : अनुभव आणि आकार : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९७९. ●सरदेशमुख त्र्यं. वी. : अंधारयात्रा, मौज प्रकाशन गृह, मुंबई १९६८. ●सरदेशमुख त्र्यं. वी. : प्रदेश साकल्याचा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७९. ●सहस्रबुद्धे अविनाश : समाज आणि साहित्य, लोक वाङ्मयगृह प्रा. लि. मुंबई, १९८२.

**नियतकालिके :** ●आम्ही : दीपावली विशेषांक, १९७३. ●दवंडी : त्रैमासिक, जून-जुलै-ऑगस्ट, १९८२. ●पूर्वा : मे, १९८२. ●वऱ्हाडमानी : दिवाळी विशेषांक, १९७९. ●संचेतना (हिंदी) : दलित साहित्य विशेषांक, दिल्ली, १९८१. ●हिंदोळ : दिवाळी अंक, १९८२

❖❖❖

# साहित्यकृती

**कविता संग्रह :** ● मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले (१९७५) ● आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शनी (१९७६) ● गोलपिठा (१९७२) ● तुझे बोट धरून चाललो आहे ● तुही इयत्ता कंची (१९८१) ● खेळ (१९८३) मी मारले सूर्याच्या रथाचे घोडे सात ● या सत्तेत जीव रमत नाही (१९९५) ● मी भयंकराच्या दरवाजात उभा आहे (निवडक कवितांचा संग्रह) ● गांडू बगीचा ● निर्वाणा अगोदरची पीडा

**चिंतनपर लेखन :** ● सर्व काही समष्टीसाठी ● बुद्धधर्म : काही शेष प्रश्न ● आंबेडकरी चळवळ ● आंधळे शतक ● दलित पँथर - एक संघर्ष (हे पुस्तक नामदेव ढसाळ यांच्या मृत्युनंतर त्यांच्या पहिल्या मासिक स्मृतिदिनी प्रकाशित झाले.)

**कादंबरी :** ● निगेटिव्ह स्पेस ● हाडकी हाडवळा ● उजेडाची काळी दुनिया

**नाटक :** ● अंधार यात्रा

**ढसाळांवरील पुस्तके :** ● विद्रोही कवी नामदेव ढसाळ (सतीश काळसेकर, गंगाधर पानतावणे, चंद्रकांत पाटील, शरणकुमार लिंबाळे आदींचे लेख; संपादक- प्रमोद लांडगे)

**पुरस्कार व सन्मान :** ● महाराष्ट्र राज्य पुरस्कार - गोलपिठा १९७२ ● सोव्हिएत लँड नेहरू पुरस्कार - १९७५-७६ ● महाराष्ट्र राज्य कवी केशवसुत पुरस्कार - १९८३ ● पद्मश्री पुरस्कार - १९९९ ● बहिणाबाई चौधरी पुरस्कार ● पद्मश्री सहकार महर्षी विखे पाटील साहित्य पुरस्कार ● साहित्य अकादमी स्वर्ण जयंती : जीवनगौरव पुरस्कार - २००५ ● गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार - २००६ ● डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार ● बुद्ध रोहिदास विचार गौरव - इ. स. २००९

**ढसाळांच्या नावाचे पुरस्कार :**

● साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल दर वर्षी 'द बुकगॅलरी' आणि 'मुक्त शब्द' यांच्यावतीने 'शब्द साहित्य पुरस्कार' दिले जातात. इ.स.

२०१४ पासून 'नामदेव ढसाळ शब्द पुरस्कार' दिला जातो. त्या त्या वर्षांतील पहिला ढसाळ शब्द पुरस्कार हिंदी कवी विष्णू खरे यांना जाहीर झाला आहे. ● नामदेव ढसाळ स्मृती गौरव समितीच्या वार्षिक कार्यक्रमात समितीतर्फे दरवर्षी नामदेव ढसाळ यांच्या नावाने एका कवीला गौरवण्यात येते. इ. स. २०१६ रोजी पहिला पुरस्कार आंबेडकरी कवी लोकनाथ यशवंत यांना मिळाला होता.

**बाह्य दुवे :** ● नामदेव ढसाळ एक वादळी व्यक्तिमत्त्व. - संजय पवार - सह्याद्री वाहिनी ● दलित पँथरची चाळीशी. रिपोर्ताज आय.बी.एन. लोकमत ●पद्मश्री नामदेव ढसाळ

✶ ✶ ✶

## -: सौजन्य आणि आभार :-

१) नामदेव ढसाळ यांची कविता : जगण्यातील समग्रतेचा शोध - वसंत पाटणकर, शब्द पब्लिकेशन, मुंबई.

२) कविता शिकवलेल्या कविता आवडलेल्या (आकलन, आस्वादन, अर्थनिर्णयन, रूपसंवेदन, समीक्षण, अध्यापन) - प्रा. एस. पी. पाटील, अनघा प्रकाशन, ठाणे

३) नामदेव ढसाळांच्या कवितेतील विद्रोह - डॉ. इंदिरा आठवले, प्रकाशक-अर्जुन देसाई, एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर

४) सर्व काही समष्टीसाठी - नामदेव ढसाळ, परम मित्र पब्लिकेशन्स, ठाणे.

५) नामदेव ढसाळ : जीवन परिचय - संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश १९२०-२००३ पर्यंतचा कालखंड, संपा. प्रभा गणोरकर, उषा टाकळकर, वसंत आबाजी डहाके, जया दडकर, सदानंद भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

६) तुही इयत्ता कंची? तुही इयत्ता..., नामदेव ढसाळ ,१९८१, आंबेडकर प्रबोधिनी.

❖❖❖